बायबल अध्ययन साहित्य

“चला, आपण परमेश्वरास ओळखू; अरुणोदयाप्रमाणे ..... भूमि शिंपणाऱ्या वळवाच्या पर्जन्याप्रमाणे आम्हाकडे येईल. ” होशेय ६:३

बायबल शिक्षणाचे तत्व

उद्देश

दर आठवडयाला प्रत्येक भागीदाराने देवाच्या वचनासोबत सातत्याने वेळ घालवावा ही आमची प्रार्थनापूर्वक इच्छा आहे. हयासाठी की, त्यांनी परमेश्वर जो ज्यांना उत्पन्नकर्ता आहे हयांस ओळखने शिकुन त्यासोबत चालावे.

मुल्य

- देवाचं वचन आपल्या जीवनातील प्रश्नांना पाया म्हणुन स्थापित करणे.
- स्त्री आणि पुरुषांना देवाच्या प्रेमाची समज राखण्या करीता उत्तेजन देणे आणि दर आठवडयांत आपल्या मनांत ख्रिस्ताचे प्रतिबिंब पाडणे.
- जसे पिता आम्हाला स्वत:कडे ओढतो तसे देवाच्या वचनांस शिकण्या करीता इच्छा चेतावणे.
- दर आठवडयातील वर्गामधिल सेवेकरीता देवावर अवलंबून राहण्याकरिता प्रार्थनेचा सराव करणे.
- इतर विश्वास बाळगणाऱ्या प्रत्येकाला सत्य शोधण्यास देवाच्या वचनाचा अभ्यास करण्याकरीता आमंत्रीत करणे.
- इतर विश्वास बाळगणाऱ्या प्रत्येकाला सत्य शोधण्यास देवाच्या वचनाचा अभ्यास करण्या करीता आमंत्रित करणे.
- प्रिती आणि दास स्वरुप मधिल उद्देशांची एकता प्रतिबिंबित करणे.
- नेमलेल्या कार्याकरीता देवाच्या पाचारणास तैयार करण्याकरीता प्रत्येक पुढाऱ्यांस प्रशिक्षण देणे.

ध्येय

- प्रत्येक सदस्य देवासोबत नियमित वेळ घालवित आहे. (प्रश्नांची उत्तर देण्यात) हे बघणे.
- दैनंदिन जीवनात बायबलचा संबंध जोडण्याची योग्यता वाढविणे.
- नियमीत इतरांसाठी प्रार्थना करणे.
- उत्तरांसाठी देवाच्या वचनाकडे अधिकाधिक वळणे.

- **चर्चेमध्ये प्रत्येक सदस्याला सहभाग घेण्यास उत्तेजित करणे.**
- **देवाने काम केले आणि काय करीत आहे हे मोकळया मनाने सांगणे.**
- **देवाची प्रिती पसरविण्यासाठी संधीच्या शोधांत असणे.**

मार्क चा परिचय

लेखक :

प्रारंभिक मंडळीच्या वडीलांनी एकमताने खात्री दिली की हया शुभवर्तमानाचा योहान मार्क हा लेखक आहे कारण तो पेत्राच्या अगदी जवळचा होता. खरेतर पेत्राने प्रेमाने मार्कला १ पेत्र ५:१२ मध्ये स्वतःचा 'पुत्र' म्हंटले आहे. अनेक धर्म शास्त्रज्ञ हा विश्वास ठेवतात कि पेत्राच्या साक्षीरुपी लेखानुसार मार्कने हे लिहीले आहे, त्यामुळे त्याच्या पत्राचा प्रेषितीय अधिकाराची खात्री पटली. धर्मशास्त्रात मार्क हे विशेष चारित्र्य आहे आणि धर्मग्रंथातील हातभार लावणारा तो १२ शिष्यांच्या संगतीतला सोबती नव्हता आणि तो सुरुवातीला मंडळीचा पुढारी देखील नव्हता. खरेतर, आम्हास जसे ठाऊक आहे की मार्क एक तरुण असा असुन पौल व बर्नबा हयांच्यातील ताटातूटीचे कारण ठरला. अशी प्रतिष्ठा राखणारा अशा प्रकारचा लिखाणाचा मानकरी कसा ठरणार, परंतु आपल्या देवाला हया कार्याकरीता मार्क योग्य दिसून पडला आणि जसे आपण त्याचे जीवन पाहतो, तेव्हा देवाचे तारणाचे कार्य आपण ह्यामधून मागे सोडलेले पाहतो. प्रेषित १२:१२ मध्ये,आम्हास योहान मार्कचा अधिकृत परिचय मिळतो. आम्हास कळते कि मार्कची आई, मरीया, हिचे यरुशलेम मध्ये मोठे घर होते जे शिष्यांसाठी संगतीची खोली होती. हया भागात वर्णन केल्याप्रमाणे एक गट हया खोलीत पेत्राच्या बंदिवासातून सुटण्यासाठी प्रार्थनेकरीता एकत्रित आला होता. जेव्हा पेत्र प्रवेश द्वारावर दिसला, तेव्हा काम करणाऱ्या एका मुलीने त्याचा आवाज ओळखला, हे आम्हास दर्शविते कि खरोखर ती सामुहिक एकत्र करण्याची जागा हाती आणि त्यापेक्षा जास्त म्हणजे पेत्र तेथील मित्र व नियकमीत भेटी देणार होता. परंतु त्यापूर्वीचा उल्लेख मार्क हया पुस्तकातच आढळतो. अध्याय १४:५१-५२ सांगते, "कोणी एक तरुण" गथसमेने बागेत सर्व शिष्य पळून गेल्यावर काही अंतरावरुन बघत होता. कित्येक धर्मशास्त्रज्ञ असा विश्वास बाळगतात की तो तरुण मार्क हाच होता आणि म्हणून त्या भयानक दृष्याचा लेख आम्हासाठी लिहून ठेविला. मार्कविषयी आपण नंतरच उल्लेख पुष्कळ वर्षांनी वाचले जेव्हा पौल आणि बर्नबा हयांच्या यरुशलेम ते अंत्युखियास प्रवासात त्यांच्यासोबत जातो, आणि तो त्याचा

पहिला मिशनरी प्रवास होता. आपण कल्पना करु शकतो कि पौलासोबत सेवा करणे हया संधीविषयी जो मोठे दर्शन प्राप्त होता त्या आणि बर्नबा जो उत्साहित करणारा होता हया संधीविषयी तो कीती आभारी असेल, परंतु मार्क अशा कडक मिशनरी जीवनासाठी तैयार नव्हता. प्रेषित १३:१३ सांगते की मार्कने पंफुल्या येथे तो संघ सोडला आणि परत येरुशलेमेस गेला. काही शस्त्रज्ञ सांगतात की मार्कने अगोदरच एक मंडळी स्थापिली होती आणि हया घटनेपूर्वीच तो स्वतःच्या मिशनरी प्रवासात निघाला, तेव्हा त्याचा फरारीपणा त्याच्या घरच्या सेवेशी जुळलेला होता, परंतु वचन हयाविषयी स्पष्ट नाही.

हे नक्कीच स्पष्ट होते की प्रषितांची कृत्येचा लेखक, तसेच पौल आणि बर्नबा दोघेही असे भाकित करतात की योहान मार्क याने प्रभूच्या सेवकरीता स्वतःला अविश्वासयोग्य असे प्रकट केले. हया पत्रामुळे बर्नबा आणि पौल हयांच्या मधात मतभेद निर्माण झाला. त्यांच्या दुसऱ्या मिशनरी प्रवासाकरीता बर्नबाची मार्कला त्याच्या पाचारणाची दृढता आणि वाढती परिपक्वतामुळे पुन्हा घेण्याची इच्छा होती. तरी सुध्दा पौलाचा त्या मुलावर विश्वास बसेना ज्याने त्यांना सोडून फरारीपण स्विकारला होता. दोन्ही मनुष्य हयाविषयी गंभीररित्या असहमत झालीत आणि एकमेकांपासून वेगळे झाले. पौलाने सिलास घेऊन वेगळा मार्ग धरीला आणि बर्नबाने मार्कला घेऊन दुसरा मार्ग स्विकारला. भांडणाविषयी देखील, दोन्ही गटांना परमेश्वराचा आशिर्वाद देऊनच पाठविण्यात आले (प्रेषित १५:३६-४१)

जरी पौलाचा नकार मार्कला दुःखदायी होता, तरी तो अल्पावधीचा होता. कलसै. ४:१० आणि फिलेमोन २४ हया दोन्हीमध्ये मार्कविषयी पौल "सहकर्मी " असा उल्लेख करतो. जसा पौल २ तिमथी. ४: ११ मध्ये लिहीतो तो "सेवेसाठी मला उपयोगी" होता. यशुने पेरलेले बी उगवायला काही वर्ष जरी लागले असतील परंतु बर्नबा, पौल व पेत्र हे वर आले, परंतु फळ प्रकट होते ! तो तरुण जो वाटेच्या किनाऱ्यावर बसुन होता, जो काही अंतरावरुन ख्रिस्ताला पाहून पळून जातो... तो तरुण ज्याचे अपयश मोठया बारकीने लिहीले गेले, तो जो अति विशिष्ट पौल व बर्नबा हयांना मिशन क्षेत्रात सोडून पळ काढतो तोच परिवक्व झाला त्याची साक्ष आणि सेवा पृथ्वीवर दुरपर्यंत पोहचली. हे शुभवर्तमान सांगण्याकरीता देवाची मार्कविषयी निवड हि असाधारण ठरते. परंतु १२ शिष्यांच्याही बाबतीत तसेच ठरते, परंतु केवळ पौलाचीच नव्हे ! कधीतरी त्याच्यापैकी काय

अपयशी ठरले नाही ? आपण मार्कची विश्वास यात्रा बघण्याची संधी मिळविले तेव्हा आम्हाला देवाच्या सिध्द धैर्याबद्दल आश्चर्य वाटायलाच पाहीजे. ज्यावरुन तो प्रिती करतो त्यामध्ये स्वतःस गुंतवूण त्यांना परिपक्वतेत वाढवितो.

आपल्या विश्वास यात्रेत तुम्ही कोठे आहात ? काय तुम्ही त्या तरुणा समान आहा जो खिस्ताला दुरुनच बघत होता ? काय तुम्ही सेवा करण्याची इच्छा बाळगता, परंतु तसे करण्यास धैर्य आणि परिपक्वतेचा आत्मविश्वासात कमी पडता ? काय तुम्ही आपल्या विश्वासात अपयशी ठरलात आणि तुम्हाला दुसऱ्यासंधीची गरज आहे ? काय देवाने तुम्हाला तरुण, असुरक्षित सेवक दिला की त्यादवारे तुम्हास आलिंगण व प्रोत्साहन मिळाले ? देव आमच्या चुकींना देखील सोडवितो. त्यांच्या त्यागाने पापास गिळले आणि त्यांच्या प्रभावावर विजय मिळविला आहे. तुमच्या सोबतच्या त्याच्या व्यवहाराबद्दल देवाला धन्यवाद दया. ज्याप्रमाणे त्याने स्वतःला तुम्हावर प्रकट केले आणि त्याचा उद्देष जो तुम्हासाठी आहे त्याबद्दल देवाला धन्यवाद दया. तुमच्या विश्वासी प्रवासाबद्दल त्याला धन्यवाद दया आणि जेथे तुम्ही आहात तेथूनच त्याच्या अज्ञाधारकतेमध्ये चालणे म्हणजे काय ते विचारा.

प्रेक्षक :

असे सांगीतले जाते की मार्क हे पुस्तक रोम मधून वेगवेगळया राष्ट्रातील ख्रिस्ती प्रेक्षकांसाठी (गैर यहूदी) आणि तसेच जुन्या करारातील ज्या लोकांची ही पृष्ठभूमी नव्हती अशाकरीता लिहीले गेले. जे रोम लिहतो की मार्कने जो शिष्य होता तसेच पेत्राचा अनुवादक त्याने रोममधील बंधु वर्गातील लोकांच्या विनंतीवरुन जे त्याने पेत्राकडून ऐकले होते ते लिहीले. (लाईव्हज् ऑफ इलस्ट्रीयस मेन ८;१९९४: ३:३६४) सहाय्यक पुरावा प्रमाणित करतो की हे ग्रीक, त्या काळातील जगातील मध्य प्रांतातील सर्वसामान्य भाषा मध्ये लिहीले गेले, इतर भाषा जसे अरामी केवळ यहुदी लोकांना सामान्य होती. त्यास जोड म्हणून, वंशावळ आणी भविष्यवाणी त्यामधून वगळले गेले होते, यहूदी प्रथा आणि अरामी भाव पाठापुरताच स्पष्ट करण्यात आला होता, जुन्या करारातील शास्त्र भागाची वचने हे ग्रीक मध्ये भाषांतरीत होती.

काळ :

कदाचित काळ, खरेतर प्रेक्षकांच्या भू-भागातील महत्वापेक्षा अधिक महत्वाचा आहे. लिहीण्याची निश्चित तिथी ही सुनिश्चित नाही, परंतु कित्येक विद्वान सहमत होतात की हे ख्रि. पू. ५५-६५ मध्ये मंदिर नाश होण्यापूर्वी लिहीले गेले. तो काळ ख्रिस्तीलोंकासाठी गडबडीचा होता. संपूर्ण रोमभर ख्रिस्तीलोकांवर हल्ले होत होते. ख्रि.पू. ६२ मध्ये याकोबाची हत्या करण्यात आली, त्या पाठोपाठ ख्रि. पू. ६४-६८ च्या दरम्यान पेत्र देखील वध करण्यात आले. सतावामुळे ख्रिस्तीलोक इतरत्र पसरत गेले आणि प्रत्यक्ष साक्षीदार विरोध करुण प्रेषित कमी होत गले. विदेशी भागात जसे सुवार्तेचे बी पेरले होते, पाखंडी विचाराचे लोक देखील उठले आणि यहूदी लोकांमध्ये या शिक्षेने भय परसले. खरोखर, हया वास्तविकतेमुळे प्रेषितांची शिकवण तसेच येशू ख्रिस्ताचे व्यक्तीत्व अशी सेवा टिकवून ठेवण्याकरीता अत्यंत तातडीने साहीत्य लिहून ठेवणे ही काळाची गरज होती. त्यामुळे येशुच्या जीवनावरील अधिकृत माहीती देणारा मार्क हा ठरला. तसेच मंडळीचा मुळचा दस्तोऐवज ठरला, लुक आणि मत्तय हयांनी हया साहित्याचा वापर केला.

मुख्य विषय :

सर्व लिखित सुवार्तेमध्ये मार्क सर्वात लहान आहे आणि सहज समजण्याजोगे आहे. मत्तय आणि लुक समान त्याची कथा ख्रिस्ताच्या वाडवडिलानपासुन आणि जन्म आणि थेट त्याचे मानवीपणा आणि अभिषेक (मसिहा म्हणून) सुरु होते. त्याने आम्हास येशू सेवकची "सुवार्ता" चा वृत्तांत दिला.

मुख्यविषय १०:४५ मध्येच शामील आहे, "कारण मनुष्याचा पुत्रहि सेवा करुन घ्यावयास नाही तर सेवा करावयास व पुष्कळांच्या मुक्तिसाठी आपला जीव खंडणी म्हणून अर्पण करावयास आला आहे."

उत्तम लोक आणि अधिकारी स्थापन करण्याहेतुने शिष्यांची सेवा जी त्याचे भौतिक राज्य स्थापन करण्यासाठी होते, त्याने सतत त्याच्यासमोर त्यागमय प्रिती आणि कळवळा असलेली, पक्षपात नसुन जी वंधस्तभाकडे नेणारी सेवा होती ती ठेवली. प्रत्येक अध्यायात हया दोन विचारातील खोलवरपणा दिसून पडतो. त्याने शिकविले आणि प्रकट केले की भाऊ-बहीण ते असतात जे ख्रिस्तावर प्रिती करतात. त्याने गर्दी परत घालवून देणे पसंत केले नाही, परंतु त्यांना जेऊ घातले.

त्याने लेकरांचे असे म्हणून स्वागत केले की देवाच्या राज्यात कोणतीही धर्मसत्ता नाही. गरीब विधवेचा सन्मान राखीत, त्याने म्हंटले की शेवटचे ते पहिले होतील आणि पहिले ते शेवटचे होतील. येशू स्वतः सेवा करवुन घेण्याकरीता नव्हे तर सर्वांची सेवा करण्याकरीता आला ! मार्ककृत शुभवर्तमान स्पष्टपणे काळजी वाहणारा देव जो, जे त्याला स्विकार करतात त्यांना सामर्थ्याने पुनःस्थापित करतो हे प्रकट करते. मार्कच्या स्वतःच्या जीवनामध्ये हे किती सुंदररित्या तारणकथे मध्ये मांडले आहे.

मार्क

प्रकरण पहिले : अध्याय १

विषयवाक्य : येशू आपल्या पृथ्वीवरील सेवेला सुरुवात करतो.

दिवस १

वाचा मार्क १:१-८

१. वचन एक शुभवर्तमान हया शब्दाचा उपयोग करते, ज्याचा सोपा अर्थ आहे "चांगली बातमी".

१ करिंथ १५:१-८ आणि रोमकरांस १:१५-१६ नुसार शुभवर्तमान काय आहे ?

२. याहोन बाप्तिस्मादात्या द्वारे कोणती जुन्या कराराची भविष्यवाणी पूर्ण ठरते ? (यशया ४०:३, मलाखी ३:१)

३. योहानाने कोणता संदेश दिला ? पश्चाताप हया शब्दाचे अर्थ काय ?

४. लुक ३:१-२० द्वारे योहान बाप्तिस्मादात्या विषयी तुम्ही काय शिकता ?

५. योहानाचा संदेश आणि येशूचा संदेश हयांतील अंतर कोणता ?

दिवस २

वाचा मार्क १:९-१३ आणि मत्तय ४:१-११

१. येशूच्या बाप्तिस्मा वेळी तुम्ही पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याला पाहू शकता काय ?

२. रानात येशूला कोणी नेले ? का ?

३. येशूची काळजी कोणी घेतली ?

४. येशूने परीक्षेवर विजय कसा मिळविला ? हयातून तुम्ही काय शिकता ?

दिवस ३

वाचा मार्क १:१४-२०

१. योहान बंदिवासात गेल्यानंतर, येशूने आपल्या शिष्यांसोबत आपली सेवा सुरु केली.

२. येशूने शिष्यांना केव्हा आपल्या मागे येण्यास बोलाविले, त्या पाठोपाठ त्यांस कोणते वचन देण्यात आले ?

३. आज येशूच्या मागे चालणे हयाचा तुम्ही काय अर्थ समजता ?

दिवस ४

वाचा मार्क १:२१-२८

१. येशू कोठे गेला ? तो कोणता दिवस होता ? येशूने काय केले ?

२. लोकांची प्रतिक्रिया काय होती ?

३. धार्मिक पुढाऱ्यांपेक्षा येशूची शिकवण कशी भिन्न ठरते ?

दिवस ५

वाचा मार्क १:२९-४५

१. वचन २९-३४ मधून कोणत्या दोन घटनांविषयी तुम्ही शिकता ?

२. दुष्ट आत्म्यांना जर बोलायची परवानगी असती तर ते काय बोलले आसते ? लुक ४:४१

३. येशूच्या प्रार्थना जीवनांतुन तुम्ही काय शिकू शकता ?

४. वचन ४१ द्वारे येशूचे कोणते गुणवैशिष्टये तुम्ही बघता ?

५. कुष्ठरोगाने बरा झालेल्या मनुष्यात नकारात्मक आणि सकारात्मक कोणते परिणाम होते ?

६. परतुन बघा आणि येशूच्या दैनंदिन जीवनातील क्रियांची यादी बनवा.

दिवस ६

प्रकरण १: "येशू वाट असलेला मसिहा"

पाठ : मार्क १

मुख्यवचन : १:१५ "काळाची पूर्णता झाली आहे. व देवाचे राज्य जवळ आले आहे. पश्चाताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा."

विषयवाक्य : येशू आपल्या पृथ्वीवरील सेवेला सुरवात करतो.

जिवनतत्व : येशू हा तारणाचा कर्ता आहे आणि आपल्या आरोग्याचा स्त्रोत.

सारांश : *योहान बाप्तिस्मा दाताची सेव,ा ख्रिस्ताचा बाप्तिस्मा, ख्रिस्ताची परीक्षा, शिष्यांचे पाचारण, आणि आरोग्य.*

जुन्या करारातील भविष्यवाणीने ख्रिस्तापूर्वी येणाऱ्या विषयी जो त्याच्यासाठी मार्ग तैयार करेल, प्रतिज्ञा केली होती. यशया ४०:३ सांगते, "घोषाणा करणाऱ्याची वाणी एक्‌ू येते की, *अरण्यात परमेश्वराचा मार्ग सिद्‌ध करा, आमच्या देवासाठी रानांत सरळ राजमार्ग करा*". हा शास्त्रलेख योहान बाप्तिस्मा दात्याची सेवा ख्रिस्ताचा चुलत भाऊ आणि एलिझाबेथ चा पुत्र हयामध्ये पूर्ण झ ाली. (लुक १:५७-६०) त्याने स्वतः हा शास्त्रलेख पूर्ण झाल्याचे सांगीतले जेव्हा त्याला स्वतः विषयी विचारण्यात आले. योहान १:२३ मध्ये त्याने धार्मिक पुढाऱ्यांना सांगीतले की खरोखर तो अरण्यात ओरडणाऱ्याची वाणी आहे. योहानाला पवित्र आत्म्याचे सामर्थ्य ठाऊक होते. त्याला जूनाकरार माहित होता आणि त्याला त्याचा हेतू ठाऊक होता. योहानाचा संदेश एक प्रकारे पश्चात्तापाचा होता. दिशा परिवर्तीत, अंतःकरण परिवर्तीत, आपयश आणि पापांविषयी इतरांना दोषी न ठरविणारे आणि स्वबचावात्मक नाही. सुवार्ता निव्वळ कबूली आणि क्षमा नसून परिवर्तनासाठी बाप्तिस्मा होय. वचन ८ मध्ये तो जमावास म्हणतो, "मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने केला आहे, तो तर तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने करणार आहे". पश्चात्ताप म्हणजे जेथे परमेश्वर आमची भेट घेतो आणि आम्हास शुदध करतो. येशू पडदयावर होताच परंतु त्याच्या आगमनासाठी अंतःकरण्याची तैयारी आवश्यक होती. ही एक यशया ४० च्या पूर्ततेची दिर्घवाट होती. त्यासमानच प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तिची ही जबाबदारी आहे. की त्यांनी इतरांनी ख्रिस्ताजवळ येण्यास मार्ग तयार करावा. देवाची तारणारी प्रिती ही त्यांची गरज आहे. हे समजण्यास तुम्ही इतरांची कशी मदत करता ?

काय तुमचे जिवन देवासह वाटचाल प्रकट करते की ते मिळविण्यात इतरांनी इच्छा बाळगावी ?

येशू यार्देनत आला आणि योहानादवारे बाप्तिस्मा घेतला. येशू जसा पाण्याच्या वर येत होता त्याने स्वर्ग उघडलेले पाहीले. आणि देवाचा आत्मा त्याजवर कबुतरासारखा उतरत आहे असे त्याने पाहिले. तेव्हा स्वर्गातील वाणीने त्याचे ईश्वरत्व व अभिषेक हयाची खात्री पटवीली, आणि हे शब्द कानी पडले, हा माझा प्रिय पुत्र आहे हयाच्याविषयी मी संतुष्ट आहे. तेव्हाच योहानास खात्री पटली की जो येणार होता हाच तो मसिहा आहे. पृथ्वीवरील सेवेविषयी देवाचा आत्मा

त्याजवर सामर्थ्याने उतरला आणि आत्माने त्याला अरण्यात परिक्षेकरीता घालविले. त्याची देहात, प्राण आणि आत्म्यात परिक्षा झाली. बाप्तिस्मा आणि परीक्षा ही दोन कृत्ये त्याला सेवेसाठी तैयार करणारी होती. पवित्र आत्मा आम्हांस सेवेकरीता अभिषेक करतो आणि सहसा त्यापाठोपाठ परिक्षा देखील होते. काय हयाचा तुम्हांस अनूभव आहे ? काय देवाने तुम्हांस देऊ केलेल्या सेवेविषयी परिक्षांना तुम्हांस सशक्त बनवू दिले आहे ? त्याचप्रमाणे, ख्रिस्तदेखील सतावलेले शोधित होता आणि जे त्यास प्रतिउत्तर देतील, असे देव आमचे दु:ख वाया जावू देत नाही. तो आमचे दु:ख आम्हास त्याज जवळ आणण्यास वापरतो. येशूची अधिकृत सेवा शिष्यास पाचारण देऊन कळवळयाने भरुन दुष्ट आत्माने ग्रसित मनुष्यास सोडवित शिमोनाची सासू बरी करीत आणि कुष्ठ रोग्यांस शुध्द करीत झाली. त्याने त्यांना सांगीतले की "कोणासही सांगू नका". तो विलक्षण प्रकारास बढावा देऊ इच्छित नव्हता तसेच सुटका, रोग मुक्तता हयांना प्रसिध्द करु इच्छित नव्हता, परंतु लोक आश्चर्य चकीत होते आणि सर्व प्रांतात बातमी पसरली. येशूने जमावाची अपेक्षा बाळगली नाही. परंतु तो स्वत:स त्यापासून राखून देखील ठेवू शकला नाही. त्याने प्रसिध्दी पासून पाठ फिरवीली. तसे नाही जसे की आज आम्ही "कित्येक असे" रोग मुक्त प्रचारक बघतो. निश्चित देव आजही आरोग्य देतो, परंतु शारीरीक आरोग्य हे निव्वळ तात्पुरते आहे. येशूने वारंवार लोकांना त्यांच्या आत्मा व प्राण हयांच्या आरोग्य विषयी सांगीतले जसे, पाप पासुन, द्वेशापासुन दोष शोधने वैर, लालसा, चुगली करणे, राग, चिंता आणि नैराश्य हयापासून मुक्त होणे. आध्यात्मीक सुटका ही सार्वकालीक सुटका होय. काय तुम्ही येशूकडे तुमच्या अध्यात्मीक बंधन आणि जखमांना घेवून जातो ? काय तुम्ही त्याजवर रोग मुक्त करण्याच्या कार्यावर विश्वास बाळगता ? हया अध्यायात आम्हाला इतर शुभवर्तमानासमान अत्यंत महत्वाची माहिती पुरविण्यात आली आहे. वचन ३५ सांगतो की येशू पाहाटे उठला आणि एकांतात प्रार्थना करण्यास गेला जर येशूला अशा वेळेस गरज होती जतर आम्हास ती कीती जास्त नसावी ? देवाकडून आम्ही कसे ऐकणार आणि जर त्याच्या सोबत वेळ घालविणार नाही तर ज्या मार्गानी तो उत्साहित होतो त्यावर कसे चालणार ? येशूला हे चांगल्या प्रकारे ठाउक होते आणि संपूर्ण शुभवर्तमान वृत्तांत आम्ही हे बघतो की त्याने पित्यासोबत वेळ घालविण्यात वेळ काढला.

काय तुम्ही देवाला तुमच्या दिवसाकरीता तुम्हाला तयार करु देता ? काय तुम्ही त्याचे ऐकण्यास वेळ घालविता ?

येशू तारणाचा लेखक आणि आमच्या आरोग्याचा स्त्रोत होय.

मार्क

प्रकरण दुसरे : अध्याय २

विषय वाक्य : येशु रोग्यांना बरे करीतो, पाप्यास क्षमा करतो आणि धार्मीक गर्वाला आव्हान देतो.

दिवस १

वाचा मार्क २ : १-१२ आणि लुक ५ :१७-२६

१. येशु मागे कोण चालत होते आणि ते कोठुन आले होते ? (लुक ५ : १७)

२. वचन ३:५ मध्ये असे काय आहे की, जे येशु विश्वास असे बघतो आणि प्रमाणित करतो.

३. आज आम्ही जे विश्वासाने उत्पन्न होते ते कसे ओळखतो ?

४. वचन ५ मध्ये धार्मीक पुढाऱ्यांसोबत येशुच्या शब्दांनी समस्या कां उद्‌भवली ?

५. वचन ८ मध्ये आपण येशुचे महत्वाचे गुण बघतो ? ते कोणते ?

६. वचन १० मध्ये कोणत्या नावाने येशु स्वतःस म्हणवितो ? त्या नावाचा तुम्ही कोणता अर्थ समजता ?

७. धार्मीक पुढारी आणि भिड व्दारे मिळालेल्या प्रतिक्रीयेतील कोणते अंतर तुम्ही समजता ?

दिवस २

वाचा मार्क २ : १३-१७

१. हया शास्त्र भागात येशुने कोठे जेवन करण्याच ठरविले ? तो कोणा सोबत होता ?

२. हया वचनांमधील येशुची कृती आणि शब्द हयांची यादी बनवा.

३. वचन १७ मध्ये कोणत्या कारणास्तव / कोणासाठी तो आला असल्याचे येशुने म्हटले ?

दिवस ३

वाचा मार्क २ : १८-२२

१. जेव्हा आम्ही उपवास ठेवतो तेव्हा देवाला कशाची काळजी असते ?

(यशया ५८:३-७, मत्तय ६:१६-१८)

२. मत्तय २३ आणि मार्क ७ : ६-७ मधील अधिक मिळविलेले ज्ञान वाटा.

३. येशुने बुधल्याचा दृष्टांत का सांगितला ?

दिवस ४

वाचा मार्क २ : २३-२८

१. निर्गम ३४:२१ मधुन परुशी कोणत्या व्यवस्थेचा विषय उचलतात ?

२. वचन २७ -२९ मधुन येशु कोणत्या वागणुकीस त्यांच्या लक्षात आणुन देतो ?

३. शब्बाथाचा हेतु कोणता ?

४. आज येशुच्या अनुयायांना हा विषय कसा लागु पडतो ?

दिवस ५

वाचा मार्क ३ : १-६

१. वचन ४ मध्ये येशुने एक प्रश्न विचारला त्या दिवसातील पुढाऱ्यांना तो काय प्रकट करु इच्छित होता ?

२. हेच दृष्य लुक ६ : ६-११ मध्ये दिसते. पुढाऱ्यांनी येशुचे भय का बाळगले आणि त्याचा घात करण्याचा विचार केला ?

३. हा शास्त्रभाग यशया ५८:१३-१४ सोबत तुलना करीत. कोणते सत्य येशु सांगत आहे. असे तुम्हास वाटते ?

४. यशया मध्ये हया वचनाचे प्रतिज्ञा जुळलेली तुम्ही बघता काय ?

दिवस ६

प्रकरण २ : "धार्मीक पुढाऱ्यांतर्फे विरोध "

पाठ : मार्क २ आणि लुक ५ : १७-२६

मुख्यवचन : मार्क २ : १७ "निरोग्यांस वैद्याची गरज नसते, तर रोग्यांस असते; नितीमानास नव्हे तर पाप्यांस बोलवावयास आलो आहे."

विषय वाक्य : येशु रोग्यास बरे करीतो, पाप्यांस क्षमा करीतो आणि धार्मीक गर्वास आव्हान देतो.

जिवन तत्व : जरी गैरसमज आणि विरोध असला तरीही आम्ही येशु मागे चालण्याकरीता बोलविलेले आहोत आणि मनुष्य किंवा रुढी मागे नव्हे.

सारांश :- *लकवाग्रस्त मनुष्यांस बरे करणे, धर्मनिंदा लेव्यास पाचारण आणि पाप्यासोबत संगती.*

उपवासाविषयी प्रश्न, शब्बाथ विषयी वादविवाद.

गालीलांत जरी येशु प्रसीध्द होता तरीही अध्याय २ मध्ये आपण कफर्णहुम येथे धार्मीक पुढाऱ्यांतर्फे येशुचा विरोध वाचतो. त्याचे शब्द आणि कृत्यांमुळे निश्चित त्या दिवासातील धार्मीक पुढारी विरोधामुळे कोपविली गेली परंतु त्यांच्या व्दारे ख्रिस्ताला आम्हास जे धार्मीक स्वातंत्र मिळवुन दयायचे होते त्यासाठी उदाहरण दाखल ठरतात. कफर्णहुम येथे येशु एका घरात वचन शिकवित होता. तेव्हा छतावाटे एक पक्षघाती मनुष्य त्याच्या समोर सोडण्यात आला. त्याने मनुष्यास त्याच्या पापक्षमेव्दारे उत्तर दिले. कदाचीत त्याने शास्त्र्यांना चेतविण्याकरीता असे केले. कारण शास्त्र भाग सांगते की, त्यांना असे वाटले की, त्याच्या कृतयामुळे तो इशनिंदा करीत आहे. ते अगदी बरोबर होते की केवळ देवच पापांची क्षमा करु शकतो. परंतु येशुच्या अधीकारांश खारीज करण्यात त्यांच्या मनात असा विचार आला. त्यांचे पाप त्यांच्या इंतकरणातील संशय आणि गर्व होता. हयावर येशुने त्यांचा सामना केला आणि त्या मनुष्यास बरे करीत आध्यात्मीक आणि भौतिक जगावर त्याचा अधिकार प्रमाणित केला. देव आमचे अंतकरण बघतो आणि केवळ आमचा स्वभाव आणि आमचे शब्दच नव्हे तर तुमच्या अंत:करणातील पापाविषयी आपल्या पवित्र आत्मा व्दारे तुमच्याशी त्याने कधीही सामना केला आहे काय. असे विचार आणि भावना जे तुम्ही इतरांशी व्यक्त करु शकता किंवा नाही करु शकता ? सर्व पाप अंतकरणातुन सुरु होतात. काय तेथे वस्ती करणाऱ्या सर्व गोष्टी बाबतीत तुम्ही देवसह प्रामाणिक आहात ?

वचन १३ मध्ये सुरु करुन आपण अधिक दुसरे कृपा आणि सामना विषयी वाचतो. येशु समुद्र किनाऱ्यावर गेला आणि सगळा लोकसमुदाय त्याच्या जवळ आला. तो शिक्षण देत असता त्याने लेविला पाहीले आणि त्यास बोलविले येशुने लेविमध्ये ते पाहीले जे कुणीही पाहिले नव्हते. तो तुम्हामध्ये देखिल काहीतरी बघतो. तो लेविला ओळखत असे. तो जाणुन होता की लेवी आपल्या जीवनात तृप्त नव्हता. ''माझ्या मागे ये'' या शब्दानेच मात्र त्यांचे जीवन परावर्तीत करण्याकरीता आवश्यक होते. नाव सुध्दा बदलेले येशु मागे येण्याकरीता तुम्ही काय सोडविण्यास तयार आहात ? त्या सायंकाळी येशु लेवी आणि त्याच्या काही मित्रांसोबत रात्रीच्या जेवण्यास एकत्र बसला. जेव्हा शास्त्री व पुरुषांनी हे पाहीले तेव्हा त्यांनी शिष्यांना प्रश्न विचारला. येशु अशा प्रकारचा पापी लोकांसोबत का होता ? जकातदार हे नेहमी निम्न जातीचे समजले गेले

कारण ते नेहमी आवश्यकते पेक्षा जात बोलत असे आणि लोकांसोबत प्रामाणिक नसत. येशुने त्यांच्या प्रश्नांचे उत्तर दिले की, तो हया साठी आला आहे. त्यांनी जीवनाचा योग्यरित्या पाहीले नाही. हयांच्या शिवाय वैदयाने कोठे असावे ? आम्ही देवाकडे वळुन बदलण्यापुर्वी आपली गरज जाणायला पाहिजे. वचन १८-२२ मध्ये येशुस प्रश्न विचारण्यात आला कारण योहानाचे शिष्य आणि परुशी जेवनापासुन उपवास करणे त्यांना गरज नाही उपसाची वेळ तेव्हा येईल जेव्हा येशु जो वर आहे. तो पर्यंत उपवास करणे त्यांना गरज नाही उपसाची वेळ तेव्हा येईल जेव्हा येशु जा वर आहे त्यांच्या सोबत बसणार त्यांनतर तो त्यांना कोरे कापड, बुधले असे वेगवेगळे दृष्टांत देवुन त्यांच्या असमजपणाचा समाधान करीत होता. शिष्यांना उपास करण्याची गरज नव्हती कारण जे त्यांना उपासातुन मिळवायचे होते ते पहिलेच त्यांच्या सोबत उपस्थित होते.

पुन्हा एकदा, वचन २३-२८ मध्ये येशुला त्यांच्या शिष्य आणि धार्मिक रुढीं विषयी निष्ठेसाठी प्रश्न विचारण्यात आला. शाब्बाथ दिवशी शेतातून जातांना त्याचे शिष्य वाटेने कणसे मोडू लागले आणि खात होते. हे कर्म समजले गेले आणि म्हणुन, शब्बाथाचा नियम मोडले समान झाला. येशु ने ज्या शब्दांनी उत्तर दिले ते आम्ही लक्षात ठेवावे. २:२७ सांगते, "शब्बाथ मनुष्यासाठी झालेला आहे. मनुष्य शब्बाथासाठी झालेला नाही. त्याच्या दये मध्ये आणि कृपेमध्ये, देवाने विश्रांती करीता आम्हाला हा दिवस दिलेला आहे". परंतु निष्ठेने, कठोरतेने कर्तव्य म्हणुन नव्हे. त्या दिवसातील धार्मिक पुढाऱ्यांनी शब्बाथाभोवती अनेक नियम मांडून दिले जेणे करुन तो विश्राम दिवस नसावा. तो ओझे समान ठरला. ती देवाची रचना नव्हती. मत्तय ११:२८ सांगते येशु ज्याने म्हटले, "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्या कडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन." हा शाब्बाथाचा हेतु होता की, आपले कष्ट आम्ही येशुवर सोपवावे आणि त्याचा विसावा आपण मिळवावा. हया कारणास्तव येशु हा शास्त्रभागाचे समापण हया शब्दांनी करतो म्हणुन मनुष्याचा पुत्र शाब्बाथाचाही प्रभु आहे.

काय तुम्ही आभारी नाही की, ख्रिस्त आपला अधिकार आमच्या चांगुलपणासाठी उपयोगी आणतो ? तो आपल्या अपेक्षेने आम्हावर ओझे टाकीत नाही आणि आमच्या पापाबद्दल आम्हास लज्जित करत नाही. जे मागतात त्यांना तो क्षमा करील आणि जे शोधतात त्यांस विसावा देईल. त्यामध्ये विसावा मिळवून काय तुम्ही त्याच्या आज्ञाधारकतेमध्ये जगू इच्छिता ?

जरी गैरसमज आणि विरोध असला तरी सुध्दा आम्ही ख्रिस्ताच्या मागे चालण्याकरीता बोलाविलेले आहोत आणि मनुष्य किंवा परंपरेच्या नव्हे.

प्रकरण तिसरे : अध्याय ३

विषयवाक्य : येशुने लोकांच्या गरजेनुसार सेवा केली, जरी त्यासमयातील प्रथा आणि तत्वांचा विरोध झाला.

दिवस १

वाचा मार्क ३:७-१९

१. हया अध्यायात कोणत्या लोकांचा समुदाय येशूला भेटायला आला ?

२. येशूविषयी आत्मे काय जाणुन होती आणि त्यांनी गप्प असावे असे त्याला का वाटले ?

(मार्क ३:१३-१९, मत्तय १०:२-४, लुक १६:१४-१६, प्रेषित १:१३)

दिवस २

वाचा मार्क ३: १३-१९

१. वचन १३ नुसार ते बारा येशुचे शिष्य कसे झाले ?

२. वचन १४-१५ नुसार बारा शिष्य मागील येशूचा हेतू कोणता होता ?

३. शिष्य म्हणून बोलाविण्यात आलेल्या मनुष्याची नावे लिहा ?

४. अशा पाचारणाचा वैयक्तिक आणि हया समयाचा अर्थ तुम्ही कसा लावणार.

दिवस ३

पलिकडील वचने वाचा

१. जे त्याचे प्रतिनिधीत्व करतील अशा पुढाऱ्यांना निवडण्याकरीता येशू कोणत्या गुणधर्मांना बघणार ?

२. येशूने कशा शिष्यांची निवड केले हयाचे वर्णन आहे आणि जे त्याच्या मागे चालले त्याविषयी आपण काय शिकतो ? (मार्क ९:३०-३२, १०:३५-३९, १४:५०, ६६-७२ हे देखील बघा)

३. हया वचनातुन तुम्ही शिष्यत्वाविषयी अधिक काय शिकू शकता ?

अ. मत्तय १०:१६-२४, १६:२४-२५

ब. मार्क १०: १७-२३

क. लुक ९:५७-६२, १४:२५-३३

ड. योहान १५ : १८-२७

दिवस ४

वाचा मार्क ३:२०-३०

१. येशुच्या कार्याचा कोणी विरोध केला आणि आरोप कोणते होते ? (लक्षात असू दया की ईश्वर निंदा म्हणजे अपमानास्पद तऱ्हेने देवाच्या विरुध्द बोलने)

२. त्याचा विरोधातील आरोपावर येशूने कसे उत्तर दिले ?

३. देवाच्या आत्माच्या विरोधात बोलने हयास यशूची ईश्वरनिंदा असा आरोप त्यांनी का केला ?

४. येशूचे हे शब्द .. अंतकरणात जे भरुन गेले आहे तेच मुखावाटे निघणार तुम्हास विलक्षन का वाटतात ? (मत्तय १२:३४)

दिवस ५

वाचा मार्क ३:३१-३५

१. हया वचनांनुसार त्याच्या जवळच्या लोकांमुळे गैरसमज झाला. तुमचा ख्रिस्ता मधील विश्वासाचा परिणाम म्हणून काय तुम्हास असा अनुभव आहे ?

२. येशूला नकार आणि गैरसमज झाला, काय हया स्वतः येशूच्या अनुभवामुळे तुम्हास दिलासा मिळतो ?

३. देवाच्या घराण्याचे सदस्य म्हणून तुम्हास समाधान आणि उत्तेजन मिळते काय ?

४. देवा विषयी तुमच्या समर्पणास पुढे जाण्यास आज तुम्ही कशाची सुरुवात करु शकता ?

दिवस ६

प्रकरण ३: "येशू आपले कळकळीचे अंत:करण प्रकट करतो."

पाठ : मार्क ३

मुख्यवचन : मार्क ३:३५, "जो कोणी देवाच्या इच्छे प्रमाणे वागतो तोच माझा भाऊ, तीच माझी बहीण व तीच माझी आई."

विषयवाक्य : येशू ने लोकांच्या गरजे नुसार सेवा केली, जरी त्या दिवसातील प्रथा अणि तत्वाचा विरोध झाला.

जीवनतत्व : ख्रिस्ताचे अनुयायी हया नात्याने आपण त्याच्या सत्यास, त्याच्या प्राथमिकतेस आणि सेवेकरीता त्याचे उदाहरण हया संबंधातले असावे, तरी ते इतरांसाठी मुर्खपणा ठरेल.

सारांश : *शब्बाथ दिवशी मंदिरात येशू एका मनुष्यास बरे करतो, परुशी येशू विरुध्द सापळा रचतात, येशू दुष्ट आत्मांचा सामना करतो, येशू बारा जणांना निवडतो, येशू कुटूंबाची पूर्ण व्याख्या सांगतो, शास्त्री आणि परुशी ईश्वर निंदा करतात.*

मार्क अध्याय ३ मध्ये, आम्ही बघतो कि येशू विषयी जमावादारे, धार्मिक पुढाऱ्यांदवारे आणि त्यांच्या स्वत:च्या मित्राद्वारे गैर समज झाला. शब्बाथ दिवशी मंदिरात येशूने एक चमत्कार केला त्याने हात वाळलेल्या एका मनुष्यास बरे केले आणि तेथे उपस्थित लोकांना त्याने प्रश्न विचारला कि शब्दाथ दिवशी कोणाला बरे करणे योग्य की अयोग्य जेव्हा त्यांनी त्याला उत्तर दिले नाही त्याने त्या मनुष्याला त्यांच्या मनाच्या कठिनपणा मुळे खिन्न होऊन त्या सर्वांकडे रागाने पाहीले. आणि बरे केले. लगेच पुरुशांनी जे रोमसोबत विश्वासू होते. अशा हेरोदियांबरोबर भेटून येशूला कशे नाश करावे त्या विषयी मसलत करत बसले. लुक ६:११ सांगते की शास्त्री आणि परुशांचे डोके फिरले आणि येशूचे काय करावे हया विषयी ते विचार करु लागले. येशूने ज्या प्रमाणे स्वत:ला राखले त्यामुळे त्यांच्या प्रथांना, त्यांच्या अधिकारांना आणि त्यांच्या नितीमत्वाला धोका उत्पन्न झाला. पित्या जवळ दिन होऊन जाण्यापेक्षा आणि कृपेच्या गरजेपेक्षा ते कटुतेने, स्वार्थी हेतूने आणि गर्वाने वागले. याकोब ४:६ सांगते की, देव गविष्टांना विरोध करतो आणि दिनांवर कृपा करतो. आपन हयांची बरीचशी उदाहरण बघतो जेव्हा येशूने धार्मिक पुढाऱ्यांचा सामना केला आणि तरी सुध्दा पाप्यांकरीता स्वत:ला उपलब्ध केले.

केवळ धार्मिक पुढारीच अशा जाळयात अडकले नव्हते. येशूने स्वतःचे मित्र आणि कुटूंब तो कोण होता, हे समजझण्यास अपयशी ठरले. त्यांना वाटले की, तो वेडा झाला आणि आपण वचन २०-२१ आणि ३१-३५ मध्ये बघतो की, ते त्यास धरावयास आले. त्याने आपन बघतो की, देवाचे कुटूंब या संकल्पनेने उत्तर दिले. ३:३५ जो कोणी देवाच्या इच्छे प्रमाणे वागतो तोच माझा भाऊ, तीच माझी बहिण व तीच माझी आई. पित्याने जे कुटूंब तुम्हास दिलेले आहे, काय त्यामध्ये तुम्ही समाधान व उत्तेजना मिळविता ? जरी त्याच्या आप्तजणांनी त्याला नाकारले तरीही येशूच्या हेतू प्राप्त करण्यात काहीही अळथळा आला नाही. त्याने १२ मनुष्याचा असंभवनीय गट त्याच्या मागे चालविण्या करीता निवडला. हि माणसं येशू सोबत त्याचे साक्षीदार असे सेवक होण्याकरीता बोलविलेल्या समयाच्या तयारी करीता अनुभव प्राप्त करण्याकरीता बोलविले होते. तो ज्या विषयी बोलत होता त्याचा अनुभव घेण्याकरीता त्याची गरज होती. केवळ ज्याने येशू चा अनुभव घेतला तोच त्याचा साक्षीदार होऊ शकतो. ज्यांना येशू सोबतचा अनुभव प्राप्त आहे, अशा स्त्री आणि पुरुषांनी सांगीतलेल्या घटनेचे काहीही स्थान होऊ शकत नाही. जीवंत देवासह संबंधाद्वारे बदललेल्या जीवनातील संदेशात अधिक सामर्थ असते.

जेव्हा येशूला काही अत्यंत महत्वाचे किंवा अतिशय जड असे कार्य असायचे तेव्हा तो सहसा पेत्र याकोब आणि योहानाला जे त्याचे आंतरिक वर्तुळातील होते त्यांना सोबत घेत असे, असे जाणवत होते, कि तो त्यांना तया बारावर पुढारी असे समजायचा. शिमोनाला त्यानी नाव दिले पेत्र, किंवा खडक, याकोब आणि योहानास त्याने गर्जनेचे पुत्र हे नाव दिले. याकोब हा पहिला हुतात्मा (शहीद) हयाने अनेकांसाठी उदाहरणे सोडली. योहान जो शवटचा ठरला, यर्वाची माहिती गोळा करणारा ठरला. त्याचे शेवटचे प्रकाशन हे योहानकृत शुभवर्तमान योहानाचे तीन पत्र, आणि प्रकटिकरण.

येशूने काही चांगल्या मनुष्यांना पाचारण दिले. त्याने त्यांच्या सोबत वेळ घालविला आणि आपली साक्ष देण्याकरीता त्यास सेवे करीता आकार दिला. काय तुम्ही येशू सोबत त्याज पासून शिकण्यास आणि त्याच्या मते चालण्यात इच्छा बाळगता ? काय तुम्ही त्यास समर्पित आहात ? जेव्हा आम्ही स्वतः सत्याला समर्पित करतो, तेव्हाच तो आम्हास सार्वकालिक आशिर्वादाकरीता माध्यम बनवितो.

ख्रिस्ताचे अनुयायी म्हणून आपण त्याचे सत्य त्याची प्राथमिकता आणि सेवेकरीता त्याचे नमूने म्हणून जुळून राहावे. जरी ते इतरांसाठी मुर्खपणाचे ठरेल.

प्रकरण चवथे : अध्याय ४-५

विषयवाक्य : येशू अंधकाराच्या आणि भयाच्या राज्यावर सत्याद्वारा विजय मिळवीतो.

दिवस १

वाचा मार्क ४:१-२०

१. हया भागात कोणते शब्द, वाक्यरचना किंवा कल्पना पुनः मांडण्यात आलेल्या आहेत

२. ज्या मनुष्यांसोबत आणि मनुष्यांच्या जीवना सोबत येशू बोलत होता. त्या विषयी आपण काय शिकतो ?

३. वचन ९-१२ पासून दोन प्रकारच्या लोकांचे त्याच्या परिस्थिती आणि भिन्नते विषयी वर्णन करा.

४. बी पेरणारा आणि जमिन कोण व काय आहे ?

५. तुमच्या बद्दल कोणत्या जमिनिचे वर्णन खरे ठरते आणि त्याद्वारे येशू तुम्हास काय सांगत आहे ?

दिवस २

वाचा मार्क ४:२१-३४

१. हया दोन दृष्टांतातून तुम्ही देवाच्या सत्या विषयी काय शिकता ?

२. वचन २४ पासून येशूची शिकवण ऐकने याला लाभ (किंवा प्रतिज्ञा) कोणती ?

दिवस ३

वाचा मार्क ४:३५-४१

१. वादळा दरम्यान आणि नंतर शिष्यांमध्ये पसरलेल्या वेगवेगळा भय तुम्ही स्पष्ट करु शकता काय ?

२. वादळाचा तुम्हास कधी अनुभव आलेला आहे काय ? त्या वादळाद्वारे देवाने तुम्हाला काय शिकविले ?

३. तुमच्या जीवनातील वादळातून तुम्हाला देवाने काय शिकविले, हे तुम्ही इतरांना सांगण्याची इच्छा बाळगाल काय ?

दिवस ४

वाचा मार्क ५:१-२०

१. हया शास्त्रभागातून भूतग्रस्ता विषयी आपन काय शिकू शकतो ?

२. येशू त्या मनुष्यास भेटल्या वर त्या मनुष्यात कोणते शारिरीक, भावूक, मानसिक, आध्यात्मिक आणि सामाजिक बदल घडत गेले ?

३. अशा चमत्कारास कोणता प्रतिसाद मिळाला ?

दिवस ५

वाचा मार्क ५:२१-४३ (२४-३४)

१. हि स्त्री कोणत्या प्रकारच्या वादळास सहन करत होती ? तिचे ते वादळ किती दिवसापर्यंत राहीले ?

२. मदती करीता ती कोठे गेली ? जेव्हा तुम्ही वादळांचा सामना करीता तेव्हा मदतीसाठी सर्वप्रथम तुम्ही कोठे जाता ?

३. येशू मध्ये तुम्ही कोणते गुण बघता ?

४. याईर कोण होता आणि तो येशू जवळ का आला होता ?

५. समुदायापेक्षा येशू परिस्थितीला वेगळे कसा बघतो ?

दिवस ६

प्रकरण ४ : "येशु आपल्या राज्याचे सामर्थ्य प्रकट करतो "

पाठ : मार्क ४ आणि ५

मुख्यवचन : मार्क ४:२०, "चांगल्या जमिनीतील पेरलेले हे आहेत की, ते वचन ऐकून ते स्वीकारतात; मग कोणी तीसपट, कोणी साठपट, कोणी शंभरपट असे पीक देतात "

विषयवाक्य : येशू अंधकाराचे आणि भयाच्या राज्यावर सत्याद्वारा विजय मिळवीतो.

जीवनतत्व : ख्रीस्ताचे अनुयायी भयात नव्हे परंतु विश्वासात चालने निवडतात आणि येशू जे बी आपल्या अंतःकरणात पेरणी करु इच्छितो ते चांगले बी मिळवितात.

सारांश : *बी पेरणीचा दाखला, राज्याला दाखला, येशू वादळ शांत करतो, येशू सैन्य असलेल्या भूतग्रस्तांस सुटका देतो, येशू एका स्त्रीचा रक्तस्त्राव नाहीसा करीतो, येशु एका मुलीला जीवंत करतो.*

येशुची सेवा प्रत्येक स्तरावर वाढत होती.त्याची प्रसिध्दी पसरत होती, त्याचा विरोध वाढत होता, त्याच्या चमत्कारातील सामर्थ्य वाढत जात होते. आणि त्याच्या संदेशातील कठीणपणा वाढत होते, जशी येशूची बातमी आणी त्याचे चमत्कार त्या प्रदेशात वाढत जात होते, लोकसमुदाय त्याला भेटायला येत होता. सर्वप्रथम जिज्ञासेपोटी धार्मिक पुढारी बाहेर निघून आले.लोक त्याला बघण्याकरीता आणि त्यानंतर ते त्याला आव्हान देऊन अडकविण्यासाठी आले. लोक त्याचे अहभुत कार्य बघण्याकरीता आणि त्याची शिकवण ऐकण्याकरीता येऊ लागले दुदैवाने त्याची चुकीचे मार्गदर्शन मिळालेली अपेक्षा तो शिकवत असलेल्या शिक्षणात अडथळे बनु लागले. तो आध्यात्मीक जीवनातील राज्यात सेवा पुरवीत होता. आणि स्वतःच्या त्यागाद्वारे स्वातंत्र्य परंतु अनेकानी त्याच्या स्वातंत्र्यास समजले नाही किंवा त्याचे स्वागत केले नाही. त्या कारणास्तव, येशू समुदायासोबत दृष्टांतात आणि रहस्यात बोलला जेणेकरुन जे विश्वास ठेवतील ते त्याला शोधतील. येशूने हे सत्य बी चा दाखला देऊन उदाहरण दिले ! त्याने बी ची तुलना देवाच्या

वचनासोबत केली आणि वेगवेगळया प्रकारची जमीन म्हणजे अंत:करणातील माती देवाचं वचन पसरविले गेले, परंतु जी अंत:करने पवित्र आत्माद्वारे तैयार केली गेली होती तेच वचन ग्रहण करतील आणि फळदायी हंगाम आणतील. हे समजण्यासाठी हे कठीण सत्य आहे.

१ करिंथ. २:१०-११, ४:१ सांगते की शारिरीक मनुष्याकरीता देवाचं वचन हे रहस्य आहे, परंतु देवाच्या आत्म्याद्वारे ते प्रकट होते. विश्वास हे देवाचं वचन आहे, परंतु देव आपल्या प्रामणीक उत्तरास सन्मानित करण्याची इच्छा बाळगतो, मार्क ४:२४-२५ मध्ये आपण वाचतो की जे आपण वाचतो ते आम्ही लक्षात घेतले पाहिजे कारण ज्या मापाने आपण मापून देऊ त्याच मापाने आपल्यासाठी मापले जाईल. "कारण ज्याला आहे त्याला दिले जाईल व ज्याला नाही त्याचे असेल नसेल तेही त्याच्यापासून काढून घेतले जाईल. " देवाची इच्छा आणि आपला प्रतिसाद दोघेही एकत्र कार्य करतात. जर आपण सत्याला शिधीतो, तेव्हा आपल्या कल्पनेपलीकडे आपण शोधून काढतो. काय पवित्र आत्म्याला तुम्ही आपल्या अंतकरणात काम करण्याकरीता प्रार्थना करीता, जेणेकरुन तुम्ही तैयारीने देवाचं वचन मिळवावे ? ज्ञान मागा, विश्वासासाठी प्रार्थना करा, मेहनतीने अभ्यास करा हयासाठी की तुमचे अंत:करण उत्कृष्ठ मातीने भरले जावे.

मार्क अध्याय ४ चा शेवट मार्क ५ ची सुरुवात आम्हास भय विषयावर शिकविते.प्रथम समुद्रावाटे जातांना शिष्य वादळाचा सामना करतात. जीवनाचे वादळ सर्वावर येते. ते आंतरीक वैरी किंवा बाहय शक्ति, वागणूक, सवयी, आजार, मृत्यू आणि कठोरपणाद्वारे येऊ शकतात.येशूची उपस्थिती अंतर घडवून आणते.येशू सर्व गोष्टीचा प्रभू आहे.तो रोगमुक्त करणारा आणि सोडविणारा आहे.सर्व परिस्थिती व वादळ जे आपल्यावर योतात त्यावर अधिकार व संगतीची गरज असते. वादळात संघर्ष व भयामध्ये असतांना देवाच्या कोणत्या चारित्र्यास तुम्ही धरुन राहणार ?

जसा येशू समुद्राच्या पलीकडे गरसेकरांच्या देशात आला त्याने एका मनुष्यास कबरेतून येतांना पाहिले. सहसा तो साखदंडाने बांधून ठेवलेला असायचा आणि दगडांनी ठेवलेला त्याला आढळला.येशू बघताच, तो धावला व पाया पडला, येशूने त्या सर्व २,००० भूतांना त्याच्यातून काढले व डुकरांमध्ये पाठविले. जे समुद्रात जाऊन पडले . आश्चर्यकारक म्हणजे त्या भागातील

लोकांनी सतावलेला व क्रोधी मनुष्यास येशून सुटका मिळवून दिल्यानंतरही आभार नाही मानले. ते येशूला सोडून जाण्याविषयी विनवणी करत होते !

त्यांचा नफा डुकरांसोबत चालला गेला होता, आणि दुर्देवाने त्याच्या गावातील एका नागरीकापेक्षा ती डुकरे जास्त मौल्यवान होती.हया मनुष्याने येशुच्या मागे सेण्याची विनंती केली.परंतु त्याला आपली गोष्ट त्याच्या कुटूंबीयांना व इतरांना सक्तीच्या रुपात सांगण्यात आले की, येशूसोबत असता त्याचे जीवन बदलले, परीवर्तीत झाले. आम्हा प्रत्येकाजवळ कृपेची कथा आहे जी सर्व जगाने जाणून घेतली पाहिजे.

जेथे येशू सोडतो त्यांना समाधानी असणे म्हणजे शिक्षणाची एक प्रक्रिया होय. फिलिपै : ३:१२ मध्ये पौल म्हणतो कि त्याने सर्व परिस्थितीमध्ये समाधानी असणे शिकले आहे. जेव्हा आपण लहान-लहान जाणवणाऱ्या गोष्टिमध्ये देखील विश्वासयोग्य राहतो. त्यामुळे येशूला आनंद पोहचतो. प्रभूने तुम्हाला कोणत्या लहान-लहान गोष्टी सोपविलेल्या आहेत ?

भया संबधी आपला धडा पूढे सभास्थानाचा अधिकारी , याईरसोबत सुरु राहतो. तो भयात येशू जवळ येतो . तो येशूजवळील इतरां समान नव्हता. तो धार्मिक वर्गाचा एक भाग जो येशूचा विरोधी होता, त्यातून होता.

परंतु त्याने येशुच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला आणि त्यामुळे तो नम्रतेने येशूच्या पायी पडला.मत्तय ९:२३-२६ पुन्हा सांगते की कसा त्याच्या विश्वासाने त्याची मुलगी वाचली.विश्वासाने जे येशूकडे वळतात त्याच्यासाठी तो आरोग्याचे स्त्रोत ठरतो.तरी सुध्दा येशू जाणतो की आपण विश्वासात कमजोर आहोत आणि त्याने जे प्रमाणिक होणे ज्यांनी आपल गरज आणि संशय मान्य केला त्यांना पारितोषिक दिले. जीवनातील कोणत्या क्षेत्राकडे तुम्हास आरोग्याची गरज आहे ? आज जर तुम्ही त्याजवर विश्वास ठेवाल तेव्हा कोणत्या दयनीय परिस्थितीवर येशू तुम्हास मदत पोहचविल अशी आशा धरता ?

येशूचे अनुयायी विश्वासात त्याच्या मागे चालतात, भयांत नव्हे आणि येशू जे आपल्या अंत:करणात पेरतो असे चांगले बी प्राप्त करतात.

मार्क

प्रकरण ५ : अध्याय ६

विषयवाक्य : **येशू आपला अधिकार शारिरीक आणि आध्यात्मीक वास्तविकतेवर प्रकट करतो.**

दिवस १

वाचा मार्क ६:१-६

१. आपल्या गावी येशूला कसे स्विकारण्यात आले ?

२. हया शास्त्रभागातून प्रतिक्रीयामागील कारण कोणती ?

दिवस २

वाचा मार्क ६:७-१३

१. येशूने आपल्या शिष्यांना कोणती निर्देश दिलीत जेव्हा त्यान त्याने त्यांना बाहेर पाठविले ?

२. येशूने त्याच्या प्रवासात कोणतीही वस्तू सोबत घेऊ दिली नाही असे तुम्हास का वाटले ?

३. गाव आणि शहराकडे शिष्यांनी कोणता संदेश नेला ?

४. एकटे पेक्षा जोडीने काम करणे तुम्हास उत्तम वाटते काय, का ?

दिवस ३

वाचा मार्क ६:१३-२९

१. योहान बाप्तिस्मादेणाऱ्याचा शिरच्छेद कसा आणि का करण्यात आला, ती गोष्ट पुन्हा सांगा.

२. हया शास्त्रभागात योहान बाप्तिस्मा देणाऱ्याचा शिरच्छेद घटना का नमूद केली असावी असे तुम्हास वाटते ?

३. येशू मागे चालण्यातील जोखीम कोणती आहे ?

४. तुमच्या येशूमागे चालण्यामागील निर्णयात अडचणीचा अनुभव कधी आला आहे का ?

दिवस ४

वाचा मार्क ६:३०-४४

१. येशूने आपल्या शिष्यांना एकांतात का चालण्यास सांगीतले ? काय आमच्यासाठी देखील हे महत्वाचे आहे ?

२. येशूने समुदायासाठी व गरजांसाठी कळवळा कसा दर्शविला ?

३. डोंगर माथ्यावर लोकांनी कोणता चमत्कार बधितला ?

४. समुदाय येशूमागे चालत राहिला काय हयामुळे येशूला वैताग आला ?

५. वचन ३४ नुसार त्याने लोकांना कोणत्या दुष्टीने पाहिले ?

६. येशूने शिष्यांना काय करावयास सांगीतले ?

दिवस ५

वाचा मार्क ६:४५-५६

१. वचन ४५ मध्ये शिष्यांना रात्री मचव्यात कोणी पाठविले ?

२. येशूने अशा वादळाच्या वेळी शिष्यांना का पाठविले असावे असे तुम्हास वाटते ?

३. वचन ५२ पासून, शिष्य आपल्या विश्वासात कोठे होते ?

४. काय येशूने तुमच्या विश्वासाला आव्हान देण्याकरीता कोणत्या कठीण परिस्थितीत जाऊ दिले आहे?

५. हया अध्यायात आपण ख्रिस्ताविषयी वेगवेगळया प्रतिक्रीया बघतो. कोणाची तुम्हास अधिक आवडली : समुदाय, धार्मिक पुढारी किंवा शिष्य ?

६. येशूकडे तुम्हास काय आकर्षित करते ?

७. थोडा वेळ प्रार्थनेकरीता काढा की देवाने जसे येशुविषयी तुमचे ज्ञान वाढत जात आहे तसा विश्वास देखील वाढवावा.

दिवस ६

प्रकरण ५ : "गैरसमज, हुतात्मा (शहीद) आणि चमत्कार ख्रिस्तांच्या नशिबाची पहिलेच सुचना देतात."

पाठ : मार्क ६

मुख्यवचन : मार्क ६:५० "धीर धरा, मी आहे ; भिऊ नका."

विषयवाक्य : येशू आपला अधिकार शारिरीक आणि आध्यात्मिक प्रकट करतो.

जीवनतत्व : जीवनातील वादळात ख्रीस्ताचे अनुयायी देवाकडे पाहतात.

सारांश : *येशू नाकारला गेला, १२ जणांना पाठविण्यात आले, योहानाची हत्या झाली, ५००० जणांना जऊ घातले, येशू पाठयावर चालतो, आणि येशू गनेसरेत येथे रोग्यांना बरे करतो.*

येशू आपल्या गावी परत येतो. आणि त्याचे शिष्य त्याच्यामागे योतात इतर गावाप्रमाणेच तो सभास्थानांत शिकवू लागतो, परंतु ते दुखावले गेले आणि त्याचा अधिकाराविषयी व खरोपणाविषयी त्यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या पापी अविश्वासामुळे तो मर्यादित राहीला. जर आमचा जिवनाविषयी दृष्टीकोण रुंद आहे आणि आम्ही आपल्या इंद्रियाद्वारे जे काही तपासू शकतो तिथपर्यंत मर्यादित आहे. तेव्हा आमचे जिवन मर्यादित आहे, तेव्हा आमचे जिवन मर्यादित असणार आणि आध्यात्माकरीता दुर्बळ असणारा नैसर्गीक शब्दांच्या आधारावर जीवन कधिही स्पष्ट केले जाऊ शकणार नाही.आपल्या दृष्टीने मर्यादित राहू नये.त्याऐवजी चला वर बधू या आणि देवाविषयी वास्तविकतेत कल्पनेपलीकडे दृष्टी लावूया. त्याचे सामर्थ्य आणि स्त्रोत हे अमर्यादित आहेत. काय तुमची कृत्ये इतरांना येशूचे व्यक्तीमत्व आणी अलौकीकतेविषयी विचार करावयास भाग पाडते ?

समुदायाद्वारे मर्यादित होऊन, येशू खेडोपाडी शिकवत फिरला.तो आपल्या शिष्यांना जोडीने अधिक सामर्थ्य व शांतीसह पाठवू लागला. तो आजदेखील आपल्या नावाने आपल्या सेवेकरीता पाठविण्याकरीता सुचना देतो आणि तैयार करतो ? काय तुमचा विश्वास आहे की त्याची तरतुद पुरेशी आहे ?

येशूचे नाव आणी कार्य जशी वाढत गेली हेरोद राजाने ते ऐकले आणी असा विचार केला की योहान बाप्तिस्मा देणारा ज्याच्या शिरच्छेद होता तो मृतांतून पुन्हा जिवंत झाला आहे.योहान बाप्तिस्मा देणाऱ्याचा मृत्यू ही येशूच्या मृत्यूची आगावू सूचना होती. आणि शिष्यत्वाची किंमत प्रकट करणारी होती. जेव्हा येशूने योहानची बातमी ऐकली, तेव्हा त्याने शिष्यांना एकांतात विश्रांतीसाठी नेले, परंतु समुदायाने त्याच्या योजनेत व्यत्तय आणला. विश्रामाऐवजी लोकांना पाहून येशूला त्याचा कळवळा आला वचन ३४ सांगते की त्याने त्यांना मेंढपाळाशिवाय मेंढरे असे पाहिले त्याने पुष्कळ गोष्टी त्यांना शिकवील्या आणी निव्वळ पाच भाकरी व दोन मासे हयाद्वारे ५,००० लोकांना भोजन दिले.

लोक समुदायास रात्रीचा निरोप देत येशू डोंगरावर प्रार्थना करण्यास गेला आणी त्याच्यापुढे शिष्यांना बैथसैदा येथे पाठविले.काही वेळाने, त्याने त्यांना पादळी वाऱ्यांना संघर्ष करतांना पाहीले म्हणून तो त्यांना भेटावयास निघाला.तो पाण्यावरुन चालला आणी जेव्हा तो त्यांच्या जवळ पोहोचला.त्याने वादळ शांत केले.शास्त्र भाग सांगते की ते सर्व घाबरुन गेले, भाकरीची गोष्ट त्यांना उमगली नव्हती, त्याने अंतकरण कठीण झाले होते. काय हे विलक्षण नव्हे ?अनेक मार्गानी येशूने स्वत:ला त्याजवर प्रकट केले असले तरी त्याचे अंतकरण कठीण झाले होते.ते सतत त्याच्यामागे चालले, जरी त्यांनी त्याला देवाचा पुत्र असे जाणले नाही आणी त्याने त्याचा विश्वासला सतत आव्हाण दिल, आणी खऱ्या व तारणाऱ्या विश्वासाकडे त्याचे नेतृत्व केले. आपण जसे प्रत्येक चमत्कार बघतो, प्रत्येक आरोग्य बघतो तेव्हाआपण येशूच्या शिक्षणातील खजिना बघावा. आपण जवळून हे बघावे, शारीरीक आणी परिस्थिती नुरुप जे आध्यात्मिक खरेपणाने प्रकट आहे. हया गोष्टीमध्ये आपण देवाच्या चारित्र्याविषयी शिकतो. आपण बघतो की, शारीरीक आणी आध्यात्मिक वास्तविकतेवर त्याचा अधिकार आहे. आपण हे देखील बघतो की तो आपल्या सामर्थ्याचा उपयोग जो गरज पुर्ततेकरीता त्याजवर भरवसा ठेवतात.त्यासाठी करतो, आपण बघतो की आपल्या जीवनातील वादळांसमोर त्याची उपस्थिती पुरेशी आहे. त्याने जसे आपल्या शिष्यांना म्हटले, धिर धरा मी आहे, भीऊ नका ! हेच तो आज आम्हास देखील सांगत आहे.

ख्रीस्ताचे अनुयायी जीवनाच्या वादळात देवाकडे बघतात.

मार्क

प्रकरण ६ : अध्याय -७

विषयवाक्य : येशु अंत:करणाचे सत्य प्रकट करतो.

दिवस १

वाचा मार्क ७:१-१३

१. कोणाचे नियम किंवा प्रथांचे पालन करण्यात शिष्य अपयशी ठरत होते ?

२. वचन ६ मध्ये येशू धार्मीक पुढाऱ्यांना कोणत्या नावाने बोलविले ?

३. येशु त्यांना काय शिकवण्याचा प्रयत्न करीत होता ?

दिवस २

वाचा मार्क ७:१४-१६

१. वचन १५ मध्ये येशु लोकसमूदायाला काय म्हणतो ?

२. त्याचा अर्थ काय लावीता ?

३. येशुने असे का म्हटले, ज्या कोणाला ऐकावयास कान आहेत ते ऐका ?

४. देवाचे सत्य ऐकण्याकरीता कोण आम्हास कान देतो ?

दिवस ३

वाचा ७:१७-२३

१. वचन १७-२३ मध्ये येशु आपल्या शिष्यांना आपली शिकवण कशी स्पष्ट करत आहे ?

२. प्रथेनुसार येशुचे शिष्य का जगले नाही ?

३. काय तुमच्या जीवनात अशा काही प्रथा आहेत. ज्यामध्ये तुम्ही देवाच्या सत्यापेक्षा मनुष्यांच्या प्रथा जगत आहात ?

दिवस ४

वाचा मार्क ७:२४-३०

१. सोर येथील स्त्रीने येशुने काय करण्याची इच्छा बाळगली ?

२. येशूने कसे उत्तर दिले ? तिच्याकरीता त्याचा काय अर्थ होता ?

३. येशूने तिची विनंती मान्य का केली ?

४. हया स्त्रीपासून आपण काय शिकतो ? (मत्तय १५:२१-२८ देखील बघा)

दिवस ५

वाचा ७:३१-३७

१. वचन ३१-३७ मध्ये, बहिऱ्या मनुष्याला बरे करण्याकरीता येशूने कोणते कृत्य केले ?

२. त्याच्या नेहमीच्या नसणाऱ्या पध्दतीमुळे लोक समुदायाने कसे उत्तर दिले ?

३. येशूने बहिऱ्या मनुष्यास बरे केल्यानंतर वचन ३६ मध्ये त्याने हे कोणालाही सांगू नये असे निक्षून का सांगीतले ?

दिवस - ६

प्रकरण ६ : "येशू शिकणाऱ्या अंत:करणांना शोधतो."

पाठ : मार्क : ७

मुख्यवचन : मार्क ७:१५, "तुम्ही आपला संप्रदाय पाळण्याकरीता देवाची आज्ञा मोडण्याचा छान मार्ग शोधून काढला आहे."

विषयवाक्य : येशू अंत:करणाचे सत्य प्रकट करतो.

जीवनतत्व : ख्रिस्ताचे अनुयायी अंतकरणापासून ऐकतातआणी पालन करतात.

सारांश : *येशू धार्मिक पुढाऱ्यांच्या ढोंगाला उत्तर देतो, हेल्लेणी स्त्रीवर येशुस कळवळा येतो, येशू बहिऱ्या-तोतडया माणसाला बरे करीतो.*

परमेश्वर नेहमी आमच्या वागणूकीपेक्षा अंत:करणाविषयी हितचिंतक राहीला आहे. जे खरोखर त्याजवर प्रेम करतात. त्यांच्या भक्तीची त्याला फार अपेक्षा, इच्छा असते.परंपरा

मनुष्याद्वारे बनविण्यात आली.विश्वासयोग्यत व धार्मिकतेचे जतन करण्यापेक्षा ते मनुष्याच्या प्रकटीकरणाची जोपासना करण्याकरीता उपयोगात आणल्या जाते.इब्री संस्कृतीतच हा विषय नव्हता, परंतु आज देखील आहे. परंपरा आपण कसे पालन करतो.त्यानुसार चांगली किंवा वाईट ठरु शकते. लक्षात घ्या की यरुशलेमवरुन काही लोक येशूला धरण्यास आले होते.त्याची प्रसिध्दी पसरत गेली आणि यरुशलेमेस पोहोचली आणि त्यामुळे मुख्य याजक आणी शासक व्यथित झाले होते.पुढाऱ्यांनी येशु आणि शिष्यांना निक्षून पाहिले होते. आणि त्यानी पाहिले की त्यांच्यातील काहींनी संप्रदायानुसार जेवणापूर्वी हात धुतले नव्हते. ती त्यांची प्रथा होती, एक संस्कार म्हणून हात बाहेरच्या बाजूला धरलेली असावी, पंजावरती वर्तुळाकार आकारात ओंजळ आणी त्यावर पाणी ओतले जाई. पहिल्याने दुसऱ्यावर हलके चोळणे आणि त्यावर पाणी ओतले जाई. पहिल्याने दुसऱ्यावर हलके चोळणे आणि शेवटी दुसरे पहिल्या हातावर चोळतात. कालांतराने याजकांनी हे नियम बदलली आणि पुनः परिवर्तीत केली त्यामध्ये अधिक भर टाकत. त्यांनी मनुष्याला शेकडो मानवीय कायदे नियम पालन करण्याकरीता प्रथा लावून दिले.व्यवस्थेतील मुख्य हेतू विसरला गेला होता.त्याचे मुख्य लक्ष्य आज्ञाधारकाचे आणि नितिमत्वाचे बाहयस्वरुप प्रकट करणे होते.हयामुळे येशू हया अध्याय हा विषय उचलून धरतो. त्याने संप्रदायाचा परिणाम जो त्याच्या जीवनावर पडला होताः ज्याद्वारे ढोंग अस्तित्वात आले. त्याकडे लक्ष दिले. मत्तय १५:१२ मध्ये शिष्यांनी म्हटले, "हे वचन ऐकून परुशी नाराज झाले, हे आपल्याला कळले काय ?" येशूने यशयाच्या शब्दाची पुनरावृत्ती केली.जी सांगतात की त्यांचे शब्द बरोबर होते.परंतु वागणूक चूकीची होती आणि सांसारीक तत्वांनी वेश बदलून धार्मिक मनन असे बदलले.त्यांनी देवाची आज्ञा टाळली आणि मनुष्याच्या प्रथांना चिकटून राहिहले.येशूने हा विषय स्पष्ट केला की खरी शुध्दता आंतरिक आहे, बाहय नव्हे.त्याच्या त्यागपूर्ण मृत्यूत विश्वासाद्वारे आपण शुध्द आहोत.परंतु आपण काय खातो किंवा खात नाही त्याद्वारे नव्हे.

येशूचे अनुयायी असणे हे आम्हावर नव्हे परंतु त्याच्या नितिमत्वावर अवलंबून आहे. काय संप्रदाय सत्यापासून विभक्त करण्याजोगे तुम्ही देवाचे वचन चांगल्याप्रकारे जाणता ? काय तुम्ही आपल्या अंतकरणापासून देवावर प्रीती करीत, त्याचे पालन करता की आपल्या निष्ठावान नियमांवर प्रिती करता?

हयानंतर येशू सोर प्रांतात गेला आणि निश्चित तेथे एक हेल्लेनी स्त्री त्याजकडे आली.
तिच्या मुलीला अशुध्द आत्मा लागला होता आणी वारंवार येशुची मदत मागीतली.त्याने तिच्या आशेचा भंग केला नाही, परंतु इस्राएलसाठी आपले विशेष कार्याची प्राथमिकता दर्शविली.तिची समज यहुदयांच्या पलीकडे गेली.येशु तिच्या, त्याच्यावरील विश्वासाने विस्मीत झाला.तिच्या मुलीला बरे केले.येशूला नम्रता आणि विश्वासातील सत्यताचा सम्मान आहे. प्रभूचे उत्तर मिळविण्याकरीता तुम्ही कोठपर्यंत जाण्याची इच्छा बाळगता ?
अनेक लोक हया भागाचा येशूचे यहूदी राष्टाकडे लक्ष असा उल्लेख करतात.हे जरी सत्य असले, परंतु मोठया संदर्भाचा विचार केल्यास सत्यातील अधिक खजिना आपणास सापडतो.हे फार विलक्षण आहे की येशूने संप्रदायावर शिक्षण संपविताच तो लगेच गैर यहुदी प्रांतात सोर आणि सिदोन कडे वळला.तो आपल्या शिष्यांना महत्वाचा धडा शिकविला होता.तो लोकांविषयी आणि जाती समुहाविषयी जे त्याने भोजनाविषयी शिकविले त्यानुसार उदाहरण देत होता.लोकांमध्ये भेद नाही, जातीमुळे ते शुध्द अशुध्द ठरत नाही.तेव्हा येशूने आपल्या शिष्यांना गैरयहूदी शहरांकडे घेऊन गेला जेणेकरुन त्याचे यहुदी संप्रदायातील बघण्याचा दृष्टीकोन आव्हान प्राप्त करावा.त्याची इच्छा होती की त्यांनी लोकांना देव जसा पाहतो तसे पाहावे. विश्वास संप्रदाय, जाती, वर्ग, लिंग आणि भूगोल हया- हयांच्या पलिकडे रचला जाऊन देवाच्या अंतःकरणाकडे जातो. देव जो सर्वाचा निर्माणकर्ता आहे, आपल्या निर्मितीच्या भिन्नतेच आल्हादिय आहे, परंतु सर्वात जास्त तो मनुष्याच्या अंतकरणाच्या हितचिंतक आहे.

ख्रिस्ताचे अनुयायी अंतःकरणापासून ऐकतात आणि पालन करतात.

मार्क

प्रकरण ७: अध्याय ८

विषयवाक्य : येशू आपली ओळख आणि पाचारण प्रकट करतो.

दिवस १

वाचा मार्क ८:१-९

१. मार्क ६:३०-४४ मधिल '५००० लोकांना जेवण' पुन्हा वाचा.

२. ५००० लोकांना जेवन आणि ४००० लोकांना जेवन हयामध्ये काही अंतर तुम्ही बघता काय ?

३. लोकसमुदायास जेऊ घालण्याकरीता कोणत्या गोष्टीने येशू प्रवृत्त झाला ?

दिवस - २

वाचा मार्क ८:१०-२१

१. हया वचनांमध्ये परुंशांचे खमीर म्हणजे येशूने कशाचा अर्थ लावला असे तुम्हास वाटते ?

२. जे काही येशूने आपल्या शिष्यांच्या उपस्थितीत केले त्यापासून त्यांनी जे पाहिले, लक्षात घेतले आणि समजले त्यातून त्याने कशाची अपेक्षा ठेवीली ?

३. जे काही तुम्ही वाचले, अभ्यासले, पाहिले आम्ही ऐकले त्यापासून देवाची तुमच्यापासून कोणती अपेक्षा आहे ?

दिवस - ३

वाचा ८:२२-२६

१. हया रोगमुक्ततेत आणि इतरांविषयी जे आपण वाचले त्यातील कोणती भिन्नता पाहता ?

२. आरोग्याकरीता एक विशिष्ट पद्धती किंवा नमूना येशूने स्थापित केला नाही, तुम्हास काय वाटते ?

३. शारीरिक आंधळेपणा आणि आध्यात्मिक आंधळेपणा हयामध्ये कोणती समानता बघता ?

४. २ इतिहास १६:९, स्तोत्र ५१:१०, १६-१७ आणि यिर्मया २४:७ नुसार; देवाची आपल्या लेकरांच्या अंत:करणाबाबद इच्छा काय आहे ?

दिवस ४

वाचा ८:२७-३३

१. वचन २९ मध्ये येशूच्या प्रश्नाचे उत्तर देण्याकरीता सुक्ष्मदृष्टी पेत्रास कोठून प्राप्त झाली ?

२. हया प्रश्नाचे तुम्ही कसे उत्तर देणार ?

३. येशूने जेव्हा आपल्या मित्रांना नाकारले जाणे, मृत्यू आणि पुनरुत्थान विषयी सांगीतले तेव्हा पेत्राने कसे उत्तर दिले ?

४. ज्याप्रमाने पेत्राने उत्तर दिले त्याकरीता पेत्र कोणत्या गोष्टीने प्रवृत्त होता ?

५. पवित्र आत्म्याचा परिणामाचे तुम्ही कसे स्वागत करता आणि सैतानाचा प्रभाव कसा टाळता ?

दिवस - ५

वाचा मार्क ८:३४-९:१

१. येशू नुसार शिष्य बनण्याकरीता कशाची गरज आहे ?

२. शिष्यत्वाची किंमत तुम्ही समजू शकले काय ?

३. जर तुम्ही येशूसोबत लोकसमुदायाचा भाग असते, तेव्हा त्याला तुम्ही कोणता प्रश्न विचारला असता ?

दिवस - ६

प्रकरण - ७ : "येशू विधर्मी लोकांकडे जातो"

पाठ	**: मार्क ८**
मुख्यवचन	**: मार्क ८:३७ " मनुष्य आपल्या जीवाबद्दल काय मोबदला देऊ शकेल ?"**
विषयवाक्य	**: येशू आपली ओळख आणि पाचारन प्रकट करतो**
जिवनतत्व	**: ख्रिस्ताच्या अनुयायांनी पृथ्वीवरील अस्तित्वापेक्षा सार्वकालिकतेस जास्त मुल्यवान समजावे.**

सारांश : *येशू ४००० लोकांना भोजन देतो, आणि स्वत:च्या मृत्युचे भविष्य करतो.*

अध्याय ८ येशुच्या सेवेतील परिवर्तनाचे वर्णन करते जेव्हा तो विधर्मी जनांकडे वळतो.पुन्हा एकदा, येशू लोकसमुदायास शिक्षण देत होता.३ दिवसानंतर तो लोकांविषयी काळजी व्यक्त करते जे जेवले नव्हते आणि कित्येक लांब अंतरावरुन त्याच्या सोबत प्रवास करत होते.७ भाकरी आणि थोडे मासे हयाद्वारे त्याने ४००० लोकांना भोजन दिले.हे यहुदी इतर जागेवर घडले जसे, ५००० लोकांना जेवन दिले हे यहुदी भागात घडले. हया चमत्कारानंतर लगेच परुशांनी येशुला चिन्हांची मागणी केली. विव्हळ होऊन त्याने नाकारले. कल्पना करा तो निराश झाला असावा की त्याच्या शिष्यांनी काळजी प्रवासासाठी भाकरी घेणे विसरले !त्याने त्यांना दोनदा लोकसमुदायास जेवन देण्याचे आठवण करुन दिले, परंतु तरीसुध्दा ते कोण जेवन घेण्यास विसरले हयावर आपसांत वाद घालू लागले.किती सहज आपण देवाची तरतुद विसरुन जातो.आपला विश्वास केवळ पुढील कष्टापर्यंतच राहतो.ज्याने संपूर्ण विश्व शून्यातून रचिले तो आमच्यासाठी जे आम्ही आतापर्यंत पाहिले नाही त्यातूनही उपाय करु शकतो.

ज्याने एका मुलाच्या डब्यातून जेवन बहुगुणीत करुन दाखविले तो आम्ही जे काही त्यास सोपवून त्यांस देखील बहुगुणीत करील. काय तुमचा विश्वास इतका रुतलेला आहे की तो कोण आहे किंवा तुमच्याजवळ काय आहे किंवा काय नाही आहे ?

त्यांच्या प्रवासांत येशू आणि त्याचे शिष्य बेथसैदा येथे पोहचल्यावर काही लोकांनी एका आंधळयाला येशू कडे आणले.त्यांच्या त्याला बरे करण्याच्या विनंतीवरुन त्याने त्या आंधळयास गावा बाहेर नेले.लक्षात असु दया की येशूची प्रत्येक कृती शिष्यांना काही शिकविण्याकरीता होती.येथे त्याने विश्वासाविषयी शिकविले, जी प्रभू पासून काही मिळविण्याकरीता अत्यंत महत्त्वाची सामुग्री होती.विश्वास म्हणजे अदृश्य देवांच्या कृत्यांवर भरवसा असा विश्वास की तो नेहमी तुम्ही पाहू शकत नाही तरीही तुमच्या जीवनात काय करण्यात तैयार आहे. आंधळा मनुष्य काहीही पाहू शकत नव्हता. लोकसमुदायाचा विश्वास होता, परंतु त्याने केलेल्या कृतीवर येशूच्या सामर्थ्यावर तो टिकलेले होता.दुसरीकडे मनुष्याचा विश्वास देवावर जो देवाचा पुत्र स्वरुपात काम करीत होता, त्यावर केंद्रीत होता.येशूने केलेला प्रत्येक चमत्कार हे कलात्मक कार्य होते.

लक्षणीय म्हणजे हा विशिष्ट चमत्कार लगेच घडला नाही.परंतु सततच्या प्रक्रि येने तो घडला.त्याच प्रमाणे आपल्या विश्वासाची वाढ ही एक प्रक्रिया होय. आपण जे देवाने दिले; आपण कोणासोबत आहोत, आणि आपल्या जवळ काय आहे त्याद्वारे सुरु करतो.येशू मोठे प्राप्त करण्याकरीता लहानाचा उपयोग करतो.

हया अध्यायाचा शेवट एका नाटयमयतन्हेने येशूची ओळख आणि हेतू उघडकीस येण्याद्वारे होतो. तो वचन ३१ मध्ये शिकवीले की तो पुष्कळ दु:ख भोगील नाकारला जाईल आणि शेवटी आपले जीवन सोपवून देईल परंतु ३ दिवसांनी तो पुन्हा उठले. हयामुळे एक महत्वाचा प्रश्न आम्हासर्वांसाठी उद्भवतो आणि तो निश्चित उत्तरला गेला पाहिजे. मी कोण आहे असे तुम्ही म्हणता ? वचन २९ मध्ये पेत्र एकटा सत्याने उत्तरला आपण ख्रिस्त आहां उलटपक्षी उदाहरण असे घडले की जेव्हा येशूने येणाऱ्या गोष्टीं विषयी सांगीतले जेव्हा बोलला त्यानंतर सर्वांत जास्त पेत्रानेच त्याला नाकारले. येशूने पेत्राद्वारे कार्य करणाऱ्या सैतानाला रागविले आणी मग शिष्य आणि लोकसमुदायांस स्पष्ट केले की जे सुवार्तेकरीता आपला प्राण गमावतील ते निश्चित सार्वकालीक जीवनाकरीता त्यांस मिळवितील, परंतु जे पृथ्वीवरील जीवणास सार्वकालीक सुवार्तेच्या सत्यापेक्षा महत्व देऊन जगतील ते आपल्या प्राणांस गमावतील. ख्रीस्त अनेकासाठी आपला प्राण दयावयास आला आणि जे त्याच्या मागे होऊ इच्छितात ते पृथ्वीवरील अस्तित्वापेक्षा

सार्वकालीकतेत जास्त किंमत दयावी. वचन ३७ मध्ये अतिशय तिक्षतेने लिहीले आहे. मनुष्य आपल्या जीवाबद्दल काय मोबदला देऊ शकेल ?

ख्रिस्ताच्या अनुयायांनी पृथ्वीवरील अस्तित्वापेक्षा सार्वकालीकतेला जास्त महत्व दयावे.

मार्क

प्रकरण ८ : अध्याय - ९

विषय वाक्य : येशू आपल्या गौरवास प्रकट करतो आणि खरे मोठेपण शिकवितो

दिवस - १

वाचा मार्क ९:२-१३

१. डोंगरावर काय घडले ?

२. जेव्हा रुपांतर घडले तेव्हा येशू डोंगरावर काय करीत होता ? (लुक ९:२८-३०)

३. तिन शिष्यांसाठी देवाचा निरोप कोणता होता ?

दिवस - २

वाचा मार्क ९:१४-२९

१. डोंगराच्या पायथ्याशी कोणते दृश्य होते ?

२. शिष्यांच्या विश्वासापेक्षा भूतग्रस्त मुलाच्या वडीलांचा विश्वास कसा भिन्न होता ?

३. कोणती वागणूक किंवा क्रिया अविश्वासात विश्वासाच्या पायरीत परावर्तीत करु शकते ?

दिवस - ३

वाचा मार्क ९:३०-४१

१. कोणत्या तिन गोष्टी येशूने सांगीतल्या ज्या त्याच्यासोबत घडणार होत्या ?

२. शिष्य कोणत्या गोष्टीवर वाद घालीत होते ?

३. आपली संस्कृती मोठेपणास कसे मोजते ?

४. काय आपल्या संस्कृतीत येशूला मोठे समजावे ?

दिवस - ४

वाचा मार्क ९:३५-४१

१. देव मोठेपणास कसे मोजतो ? (मत्तय ५:१९, २०:२५-२८ देखील बघा)

२. तुम्हाकरीता कोणीतरी कसे सेवकाचे अंतःकरन प्रस्तुत केले आहे ?

३. सहनशिलता आणि आदराविषयी येशू काय शिकवतो. (३८-४१)

दिवस - ५

वाचा मार्क ९:४२-५०

१. मिठ व अग्नि हयांच्या वेगवेगळया गुणवैशिष्टयांची यादी बनवा.

२. हया शास्त्रभागातून कोणते आध्यात्मिक तत्व आपण शिकतो. (मत्तय ५:१३, लुक १४:३४-३५ बघा)

दिवस - ६

प्रकरण ८: "उंच डोंगरावरील अनुभव"

पाठ : मार्क ९

मुख्यवचन : मार्क ९:३५, "जर कोणी पहिला होऊ इच्छित असेल तर त्याने सर्वात शेवटला व सर्वांचा सेवक झाले पाहीजे."

विषयवाक्य : येशू स्वतःचे गौरव प्रकट करते आणि मोठेपणा हयावर शिकवितो.

जिवनतत्व : येशूचे अनुयायी हे पहिले आणि प्रथम सेवक आहेत.

सारांश : *येशूचे रुपांतर, तो एक भूतग्रस्त मुलगा बरा करतो, तो आपल्या मृत्यूविषयी ताकीद देतो, आणि मोठेपणावर शिकवतो.*

येशूने पेत्र, याकोब आणि योहान हयांना आपणाबरोबर एक उंच डोंगरावर नेले. जेव्हा येशू प्रार्थना करीत होता, तेव्हा त्याच्या मानवीयतेत सार्वकालिकतेची झलक दाखविण्यात आली. त्याचा चेहरा चमकू लागला, त्याची वस्त्रे पांढरीशुभ्र झाली. आणि त्याचे सर्व अस्तित्व तुझ्याजवळ

होते त्याच्यायोगे तू आपणाजवळ माझे गौरव कर येशू म्हणाला योहान १७:५ मध्ये नंतर मोशे आणि एलिया त्यांच्यासमोर प्रकट झाले आणि ते येशू सोबत बोलले, मोशेची उपस्थिती जुन्या कराराची व्यवस्था प्रकट करणारी होती आणि एलिया संदेष्टयांना प्रकट करणारा होता हयांनी भविष्यवाणीच्या पूर्ततेची खात्री दिली. दुसऱ्यांदा, पित्याने येशूचे त्याचा पुत्र असण्याची खात्री दिली.(पहिले त्याच्या बाप्तिस्मासमयी घडले, जेव्हा त्याने म्हठले, हा माझा पुत्र, मला परमप्रिय आहे, हयाच्याविषयी मी संतुष्ट आहे.) तो त्यांच्यासोबत बोलला आणि त्यांना म्हणाला की येशू त्याच्या मुलगा आहे आणि त्यांनी त्याचे ऐकावे. मसिहा आला आहे !

जेव्हा येशूने केवळ पेत्र, याकोब आणि योहान हयांनाच डोंगरावर जाण्याकरीता आणि एलिया व मोशेशोबत भेटण्यास निवडले, उरलेले इतर शिष्य दुष्टावर विजय मिळविण्यात संघर्ष करीत होते. त्यांच्या त्रासांत भर म्हणून शास्त्री त्यांच्याविरोधांत वाद घालित होते.शिष्यांसोबत मोठा लोक समुदाय जमला होता.लहानपणापासून एका मुलाला दृष्ट आत्मा लागल असता ते मुलाची मदत करण्यात असमर्थ होते.पित्याचे येशूस नम्र प्रामाणिकपणा शिष्याकरीता एक सिद्ध उदाहरण ठरले असेल. माझ्या अविश्वासांची मदत पुरवा तो येशूस म्हणाला. काय ते हयासोबत संघर्ष करीत नव्हते ? जेव्हा आपण फळ न देणाऱ्या हंगामातून जातो, जेव्हा आपली प्रार्थना निरुत्तर ठरते, काय आपण देवाच्या कार्याविषयी संशय बाळगत नाही ?येशू त्या वडीलास, शिष्यांना आणि आम्हास देखील बोलतो जेव्हा त्याने म्हटले, विश्वासधरणाऱ्यांस सर्वकाही शक्य आहे. डोंगरावर येण्याकरीता केवळ तिघांची निवड करतांना कदाचित असे जाणवले की ते येशूचे अगदी प्रिय होते जेव्हा त्याने त्यांना निवडले. आपण निश्चित म्हणू शकत नाही.

परंतू वचन ३४ आम्हास सांगते की ते आपणांस मोठे कोण हया विषयावर वाद घालु लागले.आपले उदाहरण म्हणून एका बालकांस उपयोगात आणित, ख्रिस्ताने स्पष्ट केले की सर्व लोकांना किंमत आहे देवाच्या दृष्टीत मौल्यवाल आहेत.लहानातला लहान, अगदी खालचा अगदी नम्र आणि साधारण देखील. जे सर्व प्रथम बनू इच्छितात त्यांनी शेवटचे बनावे आणि सर्वाचे सेवक असावे.योहाना येशूला सांगतांना खंडण करतो की त्यांनी येशूच्या नावांत भुते काढतांना एका मनुष्यास अडविले.पुन्हा येशू आपल्या शिक्षणांत पुढे गेला.देवाच्या दृष्टीतील मोठेपण जगाच्या दृष्टीतील मोठेपणाच्या विरुध्द आहे. आपण सर्व इब्री लोकांस पत्र लिहीणाऱ्या

लेखकासोबत सहमत होऊया त्याने म्हटले की सर्व सृष्टीमध्ये ख्रीस्त हा सर्वोच्च आहे, तरीही तो सेवा करण्यास व आम्हाकरीता स्वत:ला देण्यास आला.

त्याचप्रमाणे आम्हाला देखील इतरांची सेवा करायची आहे, आणि तसे करीत असतांना आपण देवाची सेवा करणार येशू त्याच्यासोबत कोणी लेकराला अडखळण न बनण्याविषयी ताकीद देत आहे.

पुढे ती बोलने सुरु ठेवतो की जे काही पाप करण्यास प्रवृत्त करते ते वधस्तंभावर खिळण्यात यावे शरिराच्या वासना सोबत जसे कडवा, द्वेष, गर्व, वैर, मागे बोलने, चुगली, लोभ आणि इतर पाप हयासोबत भयानक तऱ्हेने वागले पाहीजे. हया सर्व गोष्टींना आपण मारुन टाकावे. कारण जर आपण जर आपल्या दैहीक वासनेला मारणार नाही तर ते आम्हास आध्यात्मिक मृत्युस कारणीभूत ठरेल. आपल्या पापाविषयी आपण प्रामाणिक असायला पाहीजे; आपल्यातील मोठेपणा आपण गमावू नये. आपल्या पापावर पापकबूलीद्वारे देवाचा उजेड चमकू देऊया आणि योग्य तेऱ्हेने जगूया.

समाप्त करतांना, आपण सर्वांना मौल्यवान वागणूक देऊन देवाची प्रितीतील निर्मिती समजावी. आम्ही जीवन आणि मानवीयता गंभीरतेने घेतो, आणि इतरांविषयी उत्तम हिताची चिंता वाहतो. जो व्यक्ती हे करतो कदाचित जगाच्या लोकांच्या दृष्टीत मोठा नसावा परंतू देवाच्या दृष्टीत एक मोठा ठरेल. तेव्हा आपले जीवन त्याच्या दैवी सामर्थ्याने सार्वकालिक व्यर्थ ठरणार नाही, देवाची मुले म्हणून पाचारणात आम्हास जीवन जगण्यास जे आवश्यक ते सर्व देण्यात आले आहे. (२ पेत्र १:३)

ख्रिस्ताचे अनुयायी हे पहिले आणि सर्वात प्रथम सेवक आहेत

मार्क

प्रकरण ९ : अध्याय १०

विषय वाक्य : **येशू त्यांचे अंत:करण सेवेचे जीवन व त्रासाकरीता तयार करतो.**

दिवस - १

वाचा मार्क १०:१-१२

१. परूशांच्या प्रश्ना मागिल कारण कोणते?

२. विवाहा विषयी देवाच्या हेतु बाबत येशूचे शब्द काय प्रकट करतात?

दिवस - २

वाचा मार्क १०:१३-१६

१. वचन १५ मध्ये येशू काय म्हणत होता ?

२. लहान लेकरांमधील वैशिष्टयांची यादी बनवा जी देवाच्या राज्यांत प्रवेश मिळविण्यास सोपी ठरवितात ?

३. येशू लेकरांविषयी प्रिती कशी दर्शविले ?

दिवस - ३

वाचा मार्क १०:१७-२७

१. स्वर्गात धन मिळविण्यात आणि येशू मागे चालण्यास हया तरुण अधिकाऱ्याच्या आड काय आले ?

२. त्यांची बातचित वाचल्यानंतर पुन्हा वचन १७-१८ ला पुन्हा वाचा येशू त्याला काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे ?

३. वचन २७ मधील प्रतिज्ञा कोणती ?

४. ख्रीस्तामागे चालण्याकरीता काय कोणता खूप मोठा त्याग आहे ?

५. ख्रीस्त जेथे कोठे तुम्हास घेऊन चालतो, त्याच्यामागे चाल्याण्यापासून काही तुम्हास थांबवित आहे काय ?

दिवस - ४

वाचा मार्क १०:२८-३४

१. यरुशलेम वाटेवर जातांना येशूने शिष्यांना काय म्हटले ज्यामुळे त्यांच्यात भय पसरले ?

२. याकोब आणि योहान हयांच्या प्रश्नांविषयी आपण काय शिकू शकतो ?

३. इतर शिष्यांनी कशी प्रतिक्रीया व्यक्त केली ? का ?

४. येशु ज्या प्याला विषयी बोलत होता त्या विषयी तुम्हास काय वाटते ?

५. येशूच्या दृष्टीतील मोठेपणा कसा दिसतो ?

६. हया अध्यायात येशुने अनेकदा जगीक कल्पनेतील मोठेपणाविषयी म्हटले ? तुम्ही किती बघता?

७. मुख्य वचन मार्क १०:४५ पाठांतर करण्याच्या प्रयत्न करा आणि इतरासोंबत वाटा.

दिवस ५

वाचा मार्क १० :४६ -५२

१. शारीरीक आंधळेपणा किंवा आध्यात्मिक आंधळेपणा पैकी कोणता गंभीर आहे ?

२. बार्तिमयची कोणती वागणुक आणि क्रिया आम्हास आव्हान देते ?

३. या शास्त्रभागातुन येशुची इच्छा आहे दृजे तुम्ही ऐकावे ते सांगु शकता ?

दिवस ६

प्रकरण ९ : "यहुदीया आणि यरुशलेमेतील सेवा"

पाठ : मार्क १०

मुख्यवचन : मार्क १०:४५, "कारण मनुष्याचा पुत्र ही सेवा करुन घ्यावयास नाहीतर सेवा करावयास व पुष्कळांच्या मुक्तीसाठी आपला जीव खंडणी म्हणुन अर्पण करावयास आला आहे."

विषय वाक्य : "येशु त्यांच्या अंत:करणाना सेवेचे जिवन आणि त्रासा विषयी तयार करतो."

जिवनतत्व : तरुण किंवा वृध्द, श्रीमंत किंवा बेघर आम्ही सर्व ख्रिस्तासोबत पापाविषयी दोष ठरतो, आध्यात्मिक दारिदयात स्वत:स वाचविण्यास असमर्थ

सारांश : *येशु घटस्फोटाविषयी शिकवितो, तो लहान लेकरांना आर्शिवाद देतो, तो पुन्हा आपल्या मृत्यु विषयी भविष्यवाणी करतो, तो याकोब आणि योहानाची एक चुक दुरुस्त करतो आणि आंधळा बार्तिमयास बरे करतो.*

पुन्हा एकदा परुशी येशु जवळ आले आणि घटस्फोटावर प्रश्न विचारीत त्याची परिक्षा घेऊ लागले. येशूने त्यांना शास्त्रभागाकडे वळूण त्यास उत्तर दिले. त्यांनी माशेच्या व्यवस्थेसह उत्तर दिले, परंतु जसे त्याने डोंगरावरील प्रवचनात केले, येशूने त्यांना अंत:करणातील व्यवस्थेविषयी शिकविले. पहिले त्याने, माशेने घटस्फोटास परवानगी देण्याविषयी स्पष्टिकरण दिले, "तुमच्या अंत:करणाच्या कठोरपणामुळे " येशू मग उत्पत्तीच्या पुस्तकांत परत जातो आणि देवाची सुरुचातीपासुन मती आणि पत्नी म्हणुन एक शरीर असावे हि योजना स्पष्ट करतो. देवाने पुरुष आणि स्त्रीस भिन्नतेत बनविले जेणे करुण त्याने एकमेकांस पुरक असावे आणि एकमेकांस पूर्ण करावे. तरीही ते देवासमोर एकसमान आहेत. म्हणुन पौल लिहीतो "यहुदी व हेल्लेणी, गुलाम व स्वतंत्र, पुरुष व स्त्री हा भेदच नाही, कारण तुम्ही सर्वजन ख्रिस्त येशूच्या ठायी एकच आहा (गलतीकरास ३:२८) दोन लोकांची एकत्र होण्याच्या प्रक्रियेस नम्र सेवा आणि एकमेकांस समर्पित होण्यास आयुष्याचा कालावधी लागतो. हे देवाचा सन्मान रिण्यासमान आहे आणि खरेतर ख्रिस्ताविषयी आपल्या प्रेमाचे प्रतिक आहे. इफिस ५:२८-३३ सांगते कि वैवाहीक नाते सुवार्तेच्या

प्रतिरुपाचे रहस्य आहे. कारण ज्यांनी हयाचा अनुभव घेतेला नाही. त्यांनी उत्साहीत व्हावे कारण परमेश्वर अंतःकरण सौम्य करण्यामागेकामांत गुंतला आहे. तो कुटुंबाना प्रितीचे, स्विकारण्याजोगे आणि क्षमेचे सुरक्षित स्वर्ग अशा प्रकारे बनवित आहे. तो जसे शिकवित होता, तेव्हा लोक त्याच्या जवळ आपल्या लेकरांना आणित होते. कि त्याने डोक्यावर हात ठेवावा. शिष्यांनी अडथळा उत्पन्न केला व त्यांना परत पाठवू लागले. जरी त्यांचा विचार योग्य असावा. पुन्हा एकदा शिष्य ख्रिस्ताची सेवा ज्यांची तो सेवा करावयास आला त्यांपासून सुरक्षित राखण्याचा प्रयत्न करित असावे. प्रकट रुपाने ते त्याची मोठेपणावरील शिकवण समजु शकले नाही किंवा लहानांचे मुल्य त्यांना कळले नाही. लगेच येशूने त्यांना शिकविले. तो म्हणाला ,''मी तुम्हास खचित सांगतो जो कोणी बालकासारखा होऊन देवाच्या राज्याचा स्वीकार करणार नाही त्याचा प्रवेश त्यात मुळीच होणार नाही '' नैसर्गिक रित्या लहान लेकरांमध्ये ते गुणधर्म आहेत जे आम्हास ख्रिस्ता जवळ आणतात. लेकरं साधी व सरळ मनाची असतात तेच बोलतात. ते इतरोवर व त्याच्या शब्दावर सहज विश्वास ठेवतात. ते शिकाऊ असतात आणि म्हणुन सहज आज्ञाधारक व प्रतिसाद देणारे असतात. ते एका गोष्टिचा विचार करुन दुसरी गोष्ट बोलत नाही ते एका गोष्टिवर विश्वास ठेवून त्यापेक्षा वेगळी गोष्ट करत नाही. जसे लहान लेकरं आणि जो विश्वास धरतो तसे बोलून आपनही चांगले ते करु शकतो.

त्याच रुपात श्रीमंत तरुण शासकाने सुवार्तेचे अंतःकरण गमाविले तो श्रीमंतीत व सामर्थ्याला जन्मला आणि देवाच्या व्यस्थेचे पालन करण्यास सर्व काही केले तरी सुध्दा त्याने आपल्या चांगूलपणा वर आणि पैशावर गर्व केला. येशूने दोन्ही गोष्टिंना आव्हान दिले. सर्वप्रथम, त्याने त्या मनुष्यास खात्री पटविली की कोणीही चांगला नाही, केवळ पिता. नंतर येशूने आज्ञाधारकते विषयी लेकरासमान त्याची चाचणी घेतली. परंतु मग जेव्हा येशूने म्हटल्याप्रमाणे वागण्यास जेव्हा त्याला विचारण्यात आले, तो अपयशी ठरला.

तुझे असेल नसेल ते विकून गोरगरिबांना देऊन टाक म्हणजे तुला स्वर्गात संपत्ति मिळेल. प्रकटरित्या त्याच्या जीवनाचा मालक दुसरे दैवत होते. येशूच्या आमंत्रणानंतरही त्याला आपला अधिकार, प्रभाव, प्रतिष्ठा आणि भौतिक संपत्तीद्वारे जे भौतिक सुख त्यास प्राप्त होते ते सोडण्याची इच्छा नव्हती. येशूणे त्यास स्पष्ट केले की तो सर्वसामर्थी देव आणि पैसा दोघांचीही

सेवा करु शकत नाही. हे वचन २३-२७ मध्ये वारंवार लिहीले आहे. देवाची राज्यात श्रीमंतांचा प्रवेश होणे किंती कठीण आहे.. तरी देवाला सर्व काही शक्य आहे. त्या सत्याविषयी देवाची स्तुती असो ! त्याचप्रमाणे आपण सर्व देवाजवळ येतो, आपण श्रीमंत असो, किंवा बेघर, किंवा गरीब. आपण सर्व पापदोषी आहोत, स्वत:चे तारण करण्यास असमर्थ. आपण सर्व आध्यात्मिक दारिद्रयांत देवासमक्ष येतो आणि आपल्या करीता मुल्य काय ? पेत्राणे म्हंटले की ख्रिस्तामागे चालण्यासाठी त्यांनी आपले सर्वस्व त्यागले, परंतु येशू बाहय गोष्टिविषयी म्हणत नव्हता. तो भौतिक वस्तुबद्दल आपल्या वागणूक विषयी बोलत होता. देवाने आमच्या ताब्यात दिलेल्या सर्व गोष्टींचे आम्ही निव्वळ कारभारी आहोत आणि त्याकरता आम्ही जवाबदार ठरविण्यात आलेले आहोत. आपला वेळ, आपले लेकरं, आपली संपत्ती आणि आपले जीवन देवाचे आहे. १ तिमथ्याला ६:१७-१९ मध्ये म्हटल्याप्रमाणे, जे खरे जीवन ते बळकट धरण्यास पुढील काळी चांगला आधार होईल, असा साठा स्वत:साठी करावा.

येशूसोबत ते जसे येरुशलेमकडे गेले, येशूचा आणि शिष्यांचा भिन्न उद्देश्य होता, त्याने पुन्हा एकदा जेव्हा येरुशलेम येथे पाहचत होते तेव्हा त्याच्या सोबत जे घडणार त्याविषयी वर्णन करावयास सुरवात केली, परंतु ते प्रतिष्ठेविषयी आणि देवाच्या राज्याच्या पदाविषयी अधिक हित बाळगून होते. याकोब आणि योहान त्याच्या जवळ आले आणि त्याच्या उजवीकडील आणि डावी कडील सन्मानाच्या जागेविषयी बोलू लागले. येशूने त्यांना त्यांचे लक्ष्य साधण्याकरीता एक मोठी किम्मत चुकवावी लागेल हयाकडे इशारा केला. त्याने गर्जनेच्या पुत्रांना सौम्यतेचे उदाहरण दिले. तुम्ही काय मागत आहा हे तुम्हास समजत नाही. ते नकळत आत्मविश्वासात होते आणि येशूला खात्री दिली की त्याजवर त्रासाचे जे ओझे येणार

आहे ते सहन करावयास ते सक्षम आहेत. येशूला अधिक उत्तम तऱ्हेने ठाऊक होते. त्याला माहीत होते की भितीने सर्व इतरत्र पळतील, परंतु त्या ऐवजीची निश्चितता त्याने त्यांना प्रस्तुत केली. जो प्याला मी पिणार आहे तो तुम्ही प्याल व जो बाप्तिस्मा मी घेणार आहे तो तुम्ही घ्याल हे खरे,

पण माझ्या उजवीकडे व डावीकडे कोणाला बसू देण्याचे माझ्या हाती नाही, त्या जागा ज्यांच्यासाठी सिध्द केल्या आहेत त्यांनाच त्या मिळणार.

आपल्या पहिल्या प्रकरणात, आपण येशूच्या शब्दाविषयी आणि कृतिविषयी जे लवकरच समाप्त होऊन जटिल हयाविषयी अभ्यास केला. ते त्याच्या शिष्यांसोबतची वेळ, देवाविषयी विश्वास, प्रार्थना शिकणे हयाविषयी शिकवीत होते. ते सर्व त्यांच्या भविष्यांतील जवाबदारीची तैयारी करीत होते जेव्हा तो सोडून परत पित्याजवळ जाईल. येशूच्या शब्द व कृतींपासून तुम्ही काय शिकले ? त्यामुळे काय तुमचे मोठेपणाविषयी समज बदलली ? काय त्यामुळे तुम्हास तुमच्य लक्ष्य व निर्धाराविषयी आव्हान मिळाले? काय त्यामुळे इतरांविषयी तुमची कळकळ आणि आपल्या देवाविषयी आत्मविश्वास जो ज्यांना त्याने घडविले त्यांची काळजी वाहण्यात आहे वाढवितो ?

तरुण वा वृध्द, श्रीमंत वा बेघर आम्ही सर्व ख्रिस्तासमक्ष पापी म्हणून आध्यात्मिक दारिद्रयांत दोषी ठरतो आणि स्वत:चे तारण करण्यास असमर्थ ठरतो.

मार्क

प्रकरण १०: अध्याय ११

विषय वाक्य : वधस्तंभापूर्वी आपल्या शेवटच्या आठवड यासाठी येशू येरुशलेमात प्रवेश करतो.

दिवस १

वाचा मार्क ११:१-११

१. येशूने शिष्यांना काय करावयास सांगीतले ?

२. हया भागांत येशूचे गुण तुम्ही बघता काय ?

३. त्या दिवशी येरुशलेम मधील लोकांची कृत्य आणि शब्द रचना सांगा.

४. जखऱ्या ९:९ मधील कोणते भविष्य पूर्ण झाले ? (पूर्ण ५०० वर्षापूर्वीचे)

दिवस २

वाचा मार्क ११:१२-१९

१. यशया ३४:२-८ आणि होशे ९:१०,१६ मधून अंजिराच्या झाडाविषयी आपल्या वाचनातून तुम्ही कोणती माहिती मिळविता ?

२. अंजिराचे झाड आणि येशूद्वारे मंदिराचे शुध्दीकरण हयातील समानता तुम्ही बघता काय ?

३. आज आपण स्वत: जिवंत देवाचे मंदिर असता आपल्यासाठी काय उपयोगी आहे ? (बघा १ करिन्थ ६:१९-२० आणि २ करिन्थ ६:१४-१६)

दिवस ३

वाचा मार्क ११:२०-२४

१. पेत्राने काय पाहिले आणि प्रभूने त्याला काय उत्तर दिल ?

२. इब्री. ११:१ नुसार विश्वासाची व्याख्या कोणती ?

३. हया शास्त्रभागानुसार विश्वासाच्या वाटेवरील सर्वांत मोठे अडखळण किंवा उभे असलेले डोंगरे कोणते ?

दिवस ४

वाचा मार्क ११:२५-२६

१. प्रार्थनेच्या वेळी, जर आपल्या मनात कोणाविषयी काही असल्यास आपण काय करावे ?

२. अक्षमा संशयाच्या समान कशी आहे ?

३. जेव्हा आपण कोणाविषयी संशय किंवा अक्षमा राखिली तेव्हा काय देव आमच्या प्रार्थनेचे उत्तर देईल ? कोण एकमात्र आहे जो हे अडखळण दूर करु शकतो ?

४. तुमच्या मंदिराची परिस्थिती काय आहे ? तुमच्यासाठी प्रार्थनेच्या उत्तरात काय आडवे येऊ शकते ? जर आम्हास देवाच्या आज्ञेविषयी विश्वास आहे आणि क्षमा मिळविली आहे तर डोंगर देखील हलविले जाऊ शकते.

दिवस ५

वाचा मार्क ११:२७-३३

१. येशूला त्याच्या अधिकाराविषयी विचारण्यास धार्मिक पुढाकाऱ्यांना कोणत्या गोष्टीने प्रवृत्त केले?

२. कोणत्या अधिकाराने योहान बाप्तिस्मा देणारा सेवा करीत होता ?

(बघा लुक १:११-१७ आणि योहान १:६-८)

३. कोणाच्या अधिकाराने येशूने सेवा केली ? (बघा योहान १२:४९-५०)

४. कोणत्या अधिकाराने आपण इतरांची सेवा करतो ? (बघा मत्तय २८:१८-२०, मार्क १६:१५-१८, प्रेषित १:४-८)

दिवस ६

प्रकरण १० : "दु:खभोगाचा आठवडा : पाश आणि सांपळा"

पाठ : मार्क ११

मुख्यवचन : मार्क ११:२२, "देवावर विश्वास ठेवा"

विषय वाक्य : वधस्तंभापूर्वी येशू आपल्या शेवटच्या आठवडयातील सेवेसाठी येरुशलेम येथे प्रवेश करतो.

जीवनतत्व : ख्रिस्ताचे अनुयायी केवळ परमेश्वरासमोरच झुकतात आणि त्याच्या सामर्थ्यांवर आणि नेतृत्वावर विश्वास ठेवतात.

सारांश : *येशू यरुशलेमेत प्रवेश करतो, तो अंजिराच्या झाडाला शाप देतो आणि मंदिराचे शुध्दीकरण करतो.*

येशू यरुशलेमेत प्रवेश करताच जखऱ्या ९:९ पूर्तता झाली, बघ तुझा राजा तुझकडे येत आहे... वल्हांडणाच्या समयी शहरात लोकांची गर्दी ८०,००० पासून २,५०,००० फुलून जाते, विशेषकरुन धार्मिक तीर्थकरांद्वारे. येशू आपल्या पुढे शहरात शिष्यांना आणि त्यांना गाढवीचे शिंगरु सोडवून आणण्यास सांगतो. जर कोणी विचारले तर, प्रभूला त्याची गरज आहे असे उत्तर द्यावे. म्हणजे ते तुम्हास परत पाठवतील हा निर्देश त्यांना देण्यात आला. नक्कीच येशूला ज्या कोण्या वस्तूची इच्छा असेल त्याचा उपयोग करण्यास तो पात्र आहे, परंतु त्याने आपली संपत्ती त्या दृष्टिकोनातून पाहिली नाही. तर येशूने तुमच्या जवळ जे आहे ते मागीतले तर विना प्रश्न विचारता काय तुम्ही त्यास देऊन टाकणार

दुसऱ्या दिवशी, येशूला भुक झागली होती आणि म्हणून तो एका अंजिराच्या झाडाकडे आला. जेव्हा त्याने पाहिले कि त्याला फळ नाही, तेव्हा त्याने त्याला शाप दिला. हयामध्ये येशूने विश्वास, प्रार्थना आणि क्षमा विषयी शिकविले. अंजिराचे झाड फांद्यांनी डंवरलेले होते, म्हणून ते प्रौढ जाणवते. परंतु ते निष्फळ होते. त्याने फांदी उत्पन्न केली होती, परंतु फळ नव्हे. झाड इस्त्राएलचे प्रतिक होते. जरी ते धार्मिकदृष्टया कर्तव्यनिष्ठ अणि नितीमान असे जाणवले तरी खरी आराधना आणि पश्चातापाचे फळ आढळले नाही. सृष्ट वस्तु ज्या उद्देशाने रचली गेली, जर आपला हेतु पूर्ण करणार नाही तर ख्रिस्ताची तीव्र नापसंती त्यावर प्रगट होते. काय तुमचे विचार,

शब्द, क्रिया, प्राथमिकता आणि नाते फळदायी आहेत ? त्याच प्रमाणे, झाडास शाप देण्यासमानच मंदिराचे शुध्दिकरण आहे. जेस झाड ज्या उद्देशाने फळ देण्याकरीता घडले होते तसे फळ देत नव्हते, त्याच प्रमाणे मंदिर देखील देवाचा उद्देश पूर्ण करीत नव्हते. येशू मंदिरात प्रवेश करतो आणि चाबकाने सर्वांना उधळून काढतो जे क्रय-विक्रय करत असतात. ज्यांनी व्यापार मांडलेला होता त्या सर्वांना तो जबरदस्तीने बाहेर घालवितो. हे नम्र व सौम्य येशूचे उदाहरण नव्हे. हा योध्दा येशू होय जो बळाने आपल्या पित्याच्या घराचा बचाव करतो. मंदिर हे राष्ट्राचे अंतकरण होते. त्यामध्ये तर जीवन, मुल्य आणि आशा अपेक्षित होती, परंतु तसे आढळले नाही. १ करिन्थ ६:१९-२० आणि २ करिन्थ ६:१४-१६ बघा. यरुशलेमातील इमारतीपेक्षा आपले शरीर आता मंदिर आहे. देव आपल्या लोकांमध्ये राहतो. आम्हास विलक्षण अधिकार आणि जबाबदारी प्राप्त आहे कारण आमची अंतकरणे जीवंत देवाचे निवासस्थान आहे.

हे चित्तवेधक आहे की येशू अंजिराच्या झाडाचे उदाहरण आपल्या शिष्यांना देवावर विश्वास ठेवा हया आशयाने करतो. तो पुढे अधिक स्पष्ट करतो की, आपल्या प्रार्थना ज्या विश्वासाने उच्चारिल्या जातात त्या देवाद्वारे सन्मानित होतील. संशय आणि अक्षमा हि आपल्या विश्वासाकरीता अडथळे आहेत हे सुचवित तो क्षमेविषयी एक लहानशी शिकवण रोपण करतो. जेव्हा आपण आपले निवेदन देवा समक्ष घेऊन येतो तेव्हा आपला विवेक स्पष्ट आणि अंतकरण निर्दोष असावे. तरीही आपला विश्वास असावा कि देव आपली प्रार्थना ऐकतो आणि त्याचे उत्तर देईल.

अशा प्रकारच्या निश्चिततेकरीता किंवा अधिकाराबद्दल धार्मिक पुढाऱ्यांनी येशूला तुच्छ जाणिले. त्यांनी येशूला आव्हान दिले कारण तो असा बोलला जसा कोणी देव पित्यास जाणतो आणि असा जो देवाकडून उत्तराची आशा ठेवतो. जेव्हा त्यांनी त्याला त्याच्या अधिकाराविषयी विचारले, तेव्हा त्याने योहान बाप्तिस्मा देणाऱ्या विषयी त्यांना सणसणीत उत्तर विचारले, कोणत्या अधिकाराने योहनाने सेवा केली ? जेव्हा त्यांनी हया प्रश्नाचे उत्तर टाळले, तेव्हा येशूने संथपणे जवाब दिला. योहान किंवा येशूला मनुष्याच्या परवानगीची गरज नव्हती. त्यांनी वचित्र आत्म्याद्वारे आणि पित्याच्या परवानगीने सेवा केली. ते देवावरील विश्वासाने जगले आणि केवळ त्यालाच आल्हादित करुन आज्ञेत राहिले. तोच अधिकार शिष्यांकडे आणि मग आमच्याकडे वाढविण्यात आला. (मत्तय २८:१८-२०, मार्क १६:१५-१८, प्रेषित १:४-८)

ख्रिस्ताचे अनुयायी केवळ देवासमक्ष झुकतात आणि त्याच्या सामर्थ्यात आणि नेतृत्वात भरवसा ठेवतात.

मार्क

प्रकरण ११: अध्याय १२

विषय वाक्य : येशू आज्ञाधारकपण स्पष्ट करतो

दिवस १

वाचा मार्क १२: १-१२ आणि यशया ५:१-७

१. द्राक्षमळयाविषयी (इस्त्राएल) स्पष्टीकरण दया आणि ज्या प्रकारे तो रचण्यात आला.

२. द्राक्षमळयाचा मालक कोण होता त्याच्या अपेक्षा कोणत्या होत्या ?

३. माळी (मळा पाहणारे) कोण होते आणि त्यांनी काय केले ?

४. मालकाद्वारे पाठविण्यात आलेले नौकर कोण होते आणि त्यांना काय झाले ?

५. पुत्र कोण होता आणि त्याचे कार्य कोणते होते ?

६. मालकाचा त्याच्या पुत्राच्या खुनाबद्दल कोणता जवाब होता ?

७. हया दाखल्याला धार्मिक पुढाऱ्यांचा कोणता प्रतिसाद मिळाला ? का ?

दिवस २

वाचा मार्क १२:१३-२७

१. परुशी व हेरीदीयांचा येशूकडे येण्याचा हेतू कोणता होता ?

२. येशूने त्यांच्या प्रश्नाचे कसे उत्तर दिले ?

३. त्याच्या वैचारिक पध्दतीतील समस्येचे मुळ कोणते होते ? (वचन २४)

४. काय आज आम्हास देखील समस्येचे हेच कारण असावे ?

दिवस ३

मार्क १२:२८-३४ वाचा

१. कोणती आज्ञा येशू सांगतो की अत्यंत महत्वाची आहे ? (अनुवाद ६:४-५)

२. पवित्र शास्त्रीय प्रितीचे कोणते चार विस्तार येथे नमुद आहे ?

३. दोन्ही आज्ञा आपसांत एकमेकांशी कशा जुळलेल्या आहेत ?

दिवस ४

मार्क १२:३५-४४ वाचा

१. येशू दाविदाचा प्रभू आणि दाविदाचा पुत्र कसा असू शकतो ?

२. येशूने शास्त्र्यांचे वर्णन कसे केले ?

३. ते काय अपेक्षा राखायचे ?

४. येशूने विधवेचे वर्णन कसे केले ?

दिवस ५

वाचनासाठी निवडा

१. आपल्या अनुयायांपासून परमेश्वर कोणत्या बलिदानाची अपेक्षा ठेवतो ?

अ. रोमकरांस १२ : १-२

ब. फिलिपैकरांस ४: १४-१८

क. इफिस. ५:१-२

ड. इब्रिलोकांस. १३:१५-१६

इ. स्तोत्र ५१:१

२. तुम्ही देवाला काय अर्पण करीत आहात ?

दिवस ६

प्रकरण ११ : "शेवटचा अधिकार - सर्वांत मोठी आज्ञा"

पाठ : मार्क १२

मुख्यवचन : मार्क १२:२४, "तुम्ही शास्त्र व देवाचे सामर्थ न ओळखल्यामुळे भ्रमात पडला आहात ना?"

विषयवाक्य : येशू आज्ञाधारकते विषयी स्पष्टीकरण देतो.

जीवनतत्व : ख्रिस्ताचे अनुयायी आपल्या सर्वांनिशी आणि जे त्याजजवळ आहे प्रिती करतात.

सारांश : *येशू दाखले देऊन बोलतो, व्यवस्थेविषयी पुढारी येशूला प्रश्न विचारतात, येशू सर्वांत मोठी आज्ञा प्रगट करतो, विधवेने दोन टोल्या दानपेटीत टाकले.*

अध्याय ११ व १२ मध्ये येशू व यहुदी पुढाऱ्यांमधील जे येशूवर खटला चालविण्याकरीता सापळा रचत होते - मधील संघार्षाची मालीका सुरु होते. सापळा रचण्यात आला व त्याला धरण्यास फास तयार करण्यात आला. येशूने त्यांचा प्रयत्न टाळला नाही, त्याऐवजी त्याने त्यांचा शिकार बनून राहणे पसंत केले हयासाठी की, तिरस्कृत व कपटी अंत:करणाच्या लोकांना त्याने आपले मिशन आणि व्यक्तिमत्व प्रगट करावे.

तो आपल्या अधिकाराने, आपल्या सामर्थ्याने आणि आपल्या वैभवाने त्यांजवर विजयी ठरु शकला असता परंतु त्याने त्यांच्या अंत:करणास समजण्याचा प्रयत्न केला. त्याने त्यांचे लक्ष त्यांना शास्त्र ठाऊक नसणे किंगोष्टीची देवाच्या सामर्थ्याची जाणिव नसण्याकडे वेधले.

येशूने पुन्हा एकदा इस्त्राएलाचे देवाच्या पुत्राशी असलेले नाते आणि त्यांचा अप्रामाणिकपणा आणि स्वार्थी उध्देश्य हयाविषयी शिकविण्याकरीता एक दाखला सांगीतला. तो त्यांना लाजवित नव्हता, परंतु पुन्हा एकदा त्यांना पश्चातापाकरीता आमंत्रण देत होता. त्याने यशयाची तंतोतंत शब्द उसने घेतली, जेथे राष्ट्र द्राक्षमळयासमान वर्णीत आहे.

टोल्यांचा दाखला देवाचे धैर्य आणि त्याचा नैतिक राग प्रकट करते. ही ताकीद आहे की, देवाच्या लोकांनी जे त्याने सोपविले आहे त्याविषयी जवाबदार कारभारी असावे ही अपेक्षा आहे. तो फळांची अपेक्षा धरतो आणि त्यांस जवाबदार ठरवितो. हे नाकारणे हयाचा परिणाम सार्वकालिक जीवन आणि आपल्या जीवनाचा हेतु गमाविणे हा होतो. देवाच्या पुत्रास तुमचे उत्तर काय ? देवाने जे तुमच्या स्वाधीन केले आहे त्या जवाबदारीचे प्रस्तुतीकरण तुम्ही करीत आहात काय ?

जेव्हा शास्त्र्यांनी येशूला विचारले की, सर्वात महत्वाची आज्ञा कोणती ? येशूने अनुवाद ६:४-५ चा उल्लेख केला. तो यहुदी विश्वास मतांगिकार होता. येशूने दुसरी आज्ञा जोडली, जशी स्वत:वर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रिती कर (१२:१३), लेविय १९:१८ पासून प्रिती हि एक निवड आहे आणि प्रारंभाचा बिंदु हा देवावर प्रिती करण्यापासून आहे. तोच आहे ज्याने आम्हांस जगात आणले, ज्याने जीवन दिले, जो संगोपन करतो, आणि दररोज आम्हास श्वास पुरवितो. तो आमच्या प्रितीस पात्र आहे, तरी सुध्दा आम्हांस निवड करण्याची संधी दिली. आपल्या अस्तित्वातील प्रत्येक घटकाने हि निवड करावी. हा आपल्या अंत:करणाचा, मनाचा, आपल्या इच्छा आणि आपल्या सर्व शक्तीचा निर्णय आहे. सोप्या शब्दांत म्हणायचे म्हणजे, आपण आपल्या सर्व शक्तिनिशी देवावर प्रिती करावी. जे काही आपल्याजवळ आहे ते सर्व आपण त्यांस

अर्पण करावे. आपली भावना, आपली इच्छा, आपले विचार आणि समजदारी, आपले प्रयत्न आणि आपले निर्णय.

- त्याची इच्छा आहे की आपण आपल्या अंत:करणाच्या तळापासून त्याला जाणावे, निव्वळ जसे आपण कार विषयी जाणतो तसे नव्हे. आपल्या तळभागात त्याची इच्छा आहे की, आपण त्याजवर विश्वास ठेवावा, त्यास शोधावे आणि त्याजविषयी उत्कंठा बाळगावी. मत्तय ६:२१ सांगते, कारण जेथे तुझे धन आहे तेथे तुझे मनही लागेल. खरोखर, देवास जाणणे हे सर्वात मोठे धन मिळविणे होय.
- आपण अति विशिष्ट व्यक्तिमत्वाने आणि वरदानांनी रचले गेले आहोत. त्याने बऱ्याच वेगवेगळया पध्दतीची लोकं बनविली, ती सर्व त्याच्या व्यक्तिमत्वासमान आणि चरित्रासमान. निश्चित, त्याची इच्छा आहे की आपण त्याच्या सोबत विशेष प्राणाने जुळून राहावे. निश्चित त्याची इच्छा आहे की आपण त्याच्या सोबत विशेष प्राणाने जुळून राहावे. निश्चित त्याची इच्छा आहे की आपण त्याचा सन्मान करावा, आपल्या मार्यादेतील त्याच्या समानतेत त्याची सेवा करावी.
- मनुष्य त्याच्या सर्व निर्मित सृष्टीमध्ये त्याच्या विचार करण्याच्या आणि समजण्याच्या योग्यतेमध्ये विशेष उभा राहतो. त्याचे मन सर्व मोटी समज राखण्यात सक्षम आहे. देवाविषयी शिकणे आणि त्याच्या सत्याचा अभ्यास करणे हयाशिवाय हया मनाचा अधिक कोणता सदुपयोग होऊ शकतो ? त्याच्या निर्मितीचे, त्याच्या शब्दाचे आणि त्याचे लोकं जे आम्हास ठाऊक आहे की सत्य आहे अशाचे महत्व शोधून काढण्यात आपण आपले मन उपयोगी आणूया. ती सत्य आपल्या अंत:करणात लपवून, आपल्या कृतीने ते सर्व जाणतील. रोकरांस १२:२ सांगते, हया युगाबरोबर समरुप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रुपांतर होऊ द्या. तेव्हा तुम्ही देवाची इच्छा तपासून मान्य करुन सांगू शकाल जी उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण आहे.
- कारण देव जो पवित्र आत्मा मध्ये वास करतो, आम्ही अंधकारामुळे आंधळे आणि पापाच्या साखळीने बंदी होऊ शकत नाही. आमच्यात ती योग्यता आहे की आम्ही स्वत:स कसे राखावे हे निवडावे. कारण देव जो पवित्र आत्म्याचे आमचे डोळे अघडले आणि आमच्या आंतरिक मनुष्यास सशक्त बनविले की आपण आज्ञाधारकपणा निवडू शकतो. हि निवड तारणाच्या प्रसंगी केली जात नाही. हा निर्णय आपण दररोज वेगवेगळया

मार्गांनी घेतो. दररोज आपण आपली प्राथमिकता, आपली वागणूक, आपला स्वभाव आणि आपले लक्ष ठरवीत असतो. आपल्या इच्छा शक्तीच्या आधारे आपण खात्री करीत निवडतो की बरे किंवा तुच्छ काय.

आपण व्यर्थ गोष्टींचा पाठलाग करणे निवडू शकतो आणि स्वपूरकपणात जगणे त्याच्या सोबत वेळ वाया घालवून त्याचे ऐकण्यात. आपण स्वार्थीपणे जगणे किंवा त्याची सेवा करणे जगू शकतो. तरीही प्रेमळ देव आपल्या त्याच्या बाबतीत इच्छेविषयी समर्पित असतो, हयाकरीता की तिने आम्हांस योग्य दिशेने न्यावे. स्तोत्र ११९:५९ सांगते, आपल्या वर्तनक्रमाविषयी विचार करुन मी तुझ्या निर्बंधाकडे पावले वळविली.

- एकदा जेव्हा आपण देवावर संपूर्ण अंतःकरणाने, जिवाने, मनाने प्रिती करणे निवडले तेव्हा आपली शक्ति नैसर्गिक दृष्टया इतरांची सेवा करण्यास ताकत व प्रयत्न पुरविते. देवाचे महान वर्णन न करता येण्याजोगे प्रेम भरभरुन वाहते, इतरांसाठी ओतले जाते, आपल्यासाठी देवाची इच्छा पुरविते. केवळ देवाच्या प्रितीने आपण एकमेकांवर प्रेम करु शकतो.

हयांकरीता विधवेची गोष्ट आमच्यासाठी उदाहरण आहे. तिचे मंदिरातील दान तिच्या देवाविषयी प्रितीबद्दल मोठया प्रमाणात सांगते. तिने आपल्या कमाईचा अंश दिला नाही, तिने आपले अतिरिक्त दान दिले नाही, तिने आपल्या संपूर्ण अंतःकरणाने, जिवाणे आणि मन व शक्तिने दिले. तिने आपले होते नव्हते ते म्हणजे आपली सर्व उपजिपीका टाकली. तिने सर्व गोष्टींसह देवावर प्रेम केले, स्वतःचे सर्वस्व अर्पिले. काय तुम्ही तसे करीत आहांत ?

ख्रिस्ताचे अनुयायी देवावर त्यांच्या सर्वस्वासह आणि जे काही त्यांच्या जवळ आहे, प्रिती करतात.

मार्क

प्रकरण १२ : अध्याय १३-१५

विषय वाक्य : येशूचा शेवटचा क्षण आलेला आहे.

दिवस १

वाचा मार्क १३ आणि मत्तय २४:३६-५१

१. हया अध्यायात कोणती कल्पना पुन्हा आलेली आहे ? (बघा वचन ५,९,२३)

२. कठोर प्रसंगाची काही चिन्हे सांगा जी येतील आणि आपण कोणावर अवलंबून राहावे ?

३. भविष्य कोणी जाणिले ? (वचन २३)

४. अंजिराच्या झाडापासून कोणता धडा घेतला पाहिजे ?

५. वचन ३३-३७ पासून आपल्या सूचना कोणत्या ?

६. तुमचे कार्य जे देवाने तुमच्यासाठी नेमलेले आहे तुम्हास ठाऊक आहे काय ?
(वचन ३४)

दिवस २

वाचा मार्क १४:१-२६

१. याजक व शास्त्रीजणांचा उद्देश काय होता ?

२. मरियेने येशू विषयी आपली प्रिती प्रकट करण्याकरीता काय केले ? (योहान १२:३)

३. जे येशूला शोधत होते त्यांचा प्रतिसाद कसा होता आणि येशूने त्यांस कसा जवाब दिला ?

४. निर्गम १२:१-३० ची मदत घेऊन तुम्ही ते स्पष्ट करु शकता काय, की यहुदीयांनी वल्हांडण सण किंवा बेखमीरी भाकरीचा सण साजरा करण्याचे कारण कोणते होते ?

५. शेवटच्या भोजनासमयी येशूने प्याला आणि भाकर वाटली, हयाचा अर्थ काय ?
(मत्तय २६:२६-२८)

६. अनेक मंडळयांमध्ये आज भाकर व प्याला वाटण्याची प्रथा सुरु आहे, का ?
(१ करिंथ ११:२३-२६)

दिवस ३

वाचा मार्क १४:२७-६५

१. जैतुंनाच्या डोंगराकडे जातांना येशू, पेत्र आणि शिष्य जे बोलत होते त्यातून आपण काय शिकतो?

२. येशूने आपल्या शिष्यांपासून काय मागीतले ?

३. आपण येशू पासून काय शिकू शकतो, जशी समोर येणाऱ्या दुःखाची त्याने तयारी केली ?

४. परिक्षेविषयी वचन ५७ पासून आपण काय शिकतो ?

५. मुख्य यजकाने येशूला कोणते प्रश्न विचारले आणि त्याने कसे उत्तर दिले ?

६. सुनावणी काय होती आणी त्यांनी येशूचा कसा छळ केला ?

७. शिष्य कोठे होते ? (१४:२७ ला मागे पुन्हा पाहा)

दिवस ४

वाचा मार्क १४:६६-७२, १५:१-१५

१. पेत्राला येशूस नाकारण्यासंबंधी जसे त्याने केले कोणत्या दबावातून तो गेला असे तुम्हास वाटते?

२. कोंबडा आरवताच पेत्राने काय केले ?

३. पेत्राने येशूच्या डोळयांत काय बघितले असे तुम्हास वाटते ? (लुक २२:६०-६२)

४. तुम्ही येशूविषयी किंवा स्वतः विषयी काय शिकले ?

५. पिलाताने येशूस कास विचारले आणि त्याने प्रश्नाचे उत्तर कसे दिले ?

६. दोष लावणारे कोण होते आणि येशू विरुध्द त्यांचे कोणते आरोप होते ?

(लुक २३:१-७ देखील बघा)

दिवस ५

वाचा मार्क १५:१६-४७

१. जेव्हा सैनिकांनी येशूला वेगळे नेले तेव्हा त्यांनी त्याच्या सोबत कोणती वागणूक केली ?

२. यशया ५०:६-७ आम्हास कोणते शारीरिक व भावनिक छळ विषयी सुक्ष्मतेने सांगते ?

३. काय देव त्रासातून चांगले करण्यास सक्षम आहे ? (बघा इब्री. ५:८-९ आणि याकोब १:२-४)

४. वचन ३३ मध्ये काय झाले ?

५. वचन ३४ मध्ये येशू कोणती आरोळी मारतो ?

६. वचन ३८ मध्ये काय घडले ?

७. वचन ३९ मध्ये शताधिपतीने काय म्हटले ?

८. येशूने म्हटलेले शेवटचे शब्द कोणते आणि त्याचा अर्थ काय ? (लुक २३:४६ आणि याहोन १९:३०)

९. अरिमथाईकर योसेफ कोण होता आणि त्याने येशूच्या देहासोबत काय केले ?

दिवस ६

प्रकरण १२ : "अनुयायांसोबत शेवटचे दिवस"

पाठ	: मार्क १३-१५
मुख्यवचन	: मार्क १३:३७, "जे मी तुम्हांला सांगतो तेच सर्वांना सांगतो, जागृत राहा."
विषय वाक्य	: येशूचा शेवटचा क्षण आला आहे.
जीवनसत्व	: ख्रिस्ताच्या अनुयायांनी जागृत असावे, त्यांचे मन ख्रिस्तावर केंद्रित असावे, त्याचा शोध घ्यावा.

सारांश : *मंदिराचा विनाश, येणाऱ्या गोष्टिंचे संकेत, तेलाभ्यंग, शेवटचे भोजन, विश्वासघात, न्यायमंदिरातील थट्टा, नकार, कष्ट आणि वधस्तंभावर खिळणे.*

अध्याय १३ हा जैतून डोंगरावरील प्रवचनाचा गणला जातो कारण येशूने हे भाष्य, प्रवचन जैतून डोंगरावरुन येरुशलेमेकडे पाहत केले होते. येशू भविष्यातील दोन घटनांविषयी शिकवतो. येरुशलेमचे पतन आणि मंदिराचा विनाश, आणि त्याचे गौरवी मृत्यूवर विजयी होऊन परतणे (जे त्याचे दुसरे येणे म्हटले जाते). विद्वानांमध्ये जेथे ख्रिस्ताचे दुसरे येणे हा एक वादग्रस्त विषय आहे, तेथेच येरुशलेमेचे पतन मानवी इतिहासातील हया घटनेला योग्य रित्या लिहून ठेवण्यात आले आहे. येरुशलेम येथील मंडळी आपल्या इतर राष्ट्रांसोबतचे संबंध आणि अन्य जातींसमवेत

सुटकेसाठी देवाच्या योजने प्रती प्रमाणिकता हया दोहोंमध्ये अडकली होती. यहुदी देशभक्ती ही चरचढ ठरत होती, त्यामुळे रोमी शासन उत्तेजित झाले.

हे निरोच्या काळात घडले, जो ख्रिस्ती लोकांचा एक खुनी छळ करणारा होता. त्याने राममधील यहुदीयांविरुध्द आपले खुनी तांडव आपला स्वतःचा लाभ मिळविण्याच्या हेतूने केला होता. येरुशलेम येथील यहूद्यांनी रोमच्या विरुध्द बंड पुकारले आणि रक्तरंजीत युध्द पुकारले जे चार वर्षे चालले. शेवटी, रोमने सर्व विजय मिळवीला.

ख्रिस्त पश्चात ७० मध्ये, मंदिर नाश करण्यात आले आणि कैद्यांना मारण्यात आले. जे यहुदी ख्रिस्ती उरले होते ते जगात इतरत्र पसरले. हया घटनांमुळे विधर्मी जगामध्ये मंडळीची स्थापना झाली होती. अध्याय १३ मध्ये पुन्हा परत जातांना, लक्षांत घ्या येशूने आपल्या संभाषणाची सुरुवात आणि शेवट जागृत राहा हया शब्दाने केली. तो म्हणाला : सांभाळा, सावध राहा, जागृत राहा, शिष्यांकरीता ही ताकीद होती, आणि आम्हासाठी ती राखून ठेवण्यात आली होती. परीक्षा परिस्थितीचा दबाव, शक्ति आम्हास विरोध करण्याचा प्रमाण करतील की आमही खचून जावे : आपला विश्वास गमाविला जावा. परंतु तो जसा वचन १३ मध्ये म्हणतो परंतु जो शेवटपर्यंत टिकाव धरुन राहील तोच तारला जाईल. ख्रिस्त केव्हा परतेल हे आम्हांस जाणून घेण्याची गरज नाही. परंतु आम्हांस काम करण्याची गरज आहे. विरोध न टाळण्याजोगे आहे, परंतु देवाचा पवित्र आत्मा आम्हांस सामर्थ्यवान बनविल आणि शेवटपर्यंत घेऊन चालविल, जेव्हा गोष्टी तुम्हास अपयशी ठरल्या समान वाटतात तेव्हा देव जगावर नियंत्रण राखून आहे हे जाणून तुम्ही स्वस्थ चित्ताने राहता काय ? शेवटपर्यंत तुम्ही जागृत राहून देवाच्या वाचनाला धरुन राहणार काय ?

अध्याय १४ आम्हांस दिनता आणि प्रिती विषयी एक सुंदर दृश्य दाखविते. कुष्ठरोगी शिमोन हयाच्या घरी येशू जेवायला बसला असता एक स्त्री त्याच्या जवळ आली. (तुम्ही हे पकडले काय ? कि येशू एका कुष्ठरोग्याच्या घरी जेवण करायला बसला आहे !!!) तिने मौल्यवान सुगंधी तेल त्याच्या मस्तकावर ओतून त्याचा तैल्याभंग केला. निश्चित तिच्या कृतिने काहींना दटाविण्यात आले, परंतु येशूने तिची वाहवा केली. हिच्या वाटेस जाऊ नका, हिला त्रास का देता ? हिने माझ यासाठी एक सत्कृत्य केले आहे. तो पुढे बोलत गेला कि तिचे बक्षिस वेळेनुसार होते. कारण येशू त्यांच्या सोबत राहणार नव्हता. त्याने तिच्या संवेदनशीलतेला भक्तिची कृती म्हणून ध्यानांत घेतले. ख्रिस्ताबद्दल प्रेमाचे कोणतेही सादरीकरण हे फाजील नव्हे. आज तुम्ही त्याला प्रेमाचे

कोणते सादरीकरण करणार ? अध्याय १४ पासून अध्याय १५ आम्हास विश्वासघात, अटक, खटला आणि येशूचे वधस्तंभावर चढविले जाणे आठवण करुन देतात. हे भक्कम प्रकारचे शास्त्रभाग आहेत मार्क अनेक माहितींपासून आम्हांस राखून ठेवत नाही जरी ते यशया संदेष्टयाने ६०० वर्षापूर्वी वर्णीत करुन ठेवली. (बघा यशया ५३:३-९)

आपण कल्हांडणासोबत सुरु करतो. येशू वधस्तंभावर खिळण्यापूर्वी पुन्हा एकदा शेवटचा आपल्या शिष्यांना एकत्र आणतो हयासाठी कि समोर घडणाऱ्या घटनेविषयी त्यांना शिकवावे तैयार करावे. तो लुक २२:१५ मध्ये म्हणतो, मी दुःख भोगण्यापूर्वी हे कल्हांडणाचे भोजन तुम्हाबरोबर करावे अशी माझी फार उत्कट इच्छा होती, कारण मी तुम्हांस सांगतो कि, देवाच्या राज्यात हे पूर्ण होईपर्यंत मी हे भोजन पुन्हा करणार नाही.

त्याने त्यांना ते दिले जे आम्ही प्रभूभोजन हया नावाने ओळखतो. हे अंतःकरणाला अतिशय स्पर्श करण्यासमान आहे की आपल्या सर्व उद्देश्याचे हे ठळक चित्र तो त्यांना सांगण्यास इच्छुक होता. तो स्वतःला त्याकरीता अर्पित होता. त्याने भाकर मोडली, हे माझे शरीर आहे हे चिन्ह होते येशूचे शरीर कसे मोडण्यात येणार होते त्याचे आणि त्याने प्याला घेतला, हे करार स्थापीत करण्यासाठी माझे रक्त आहे, असे म्हणत की, माझे रक्त ओतत एक नवा करार देव आणि मनुष्य हयांचात स्थापित जाईल. येशूच्या सिध्द बलीदानावर तारण आधारीत असणार. ही घटना ज्यामध्ये आपण आज सहभाग घेतो आम्हांसाठी आठवण करुन देते की ख्रिस्त आमच्यासाठी कसा छळला गेला, आणि तारण हे मोशेच्या नियमांच्य कृतीचा परिणाम नव्हे, परंतु विश्वासाद्वारे देवाच्य कृपेने होय (इफिस. २:८-९) हयाच भोजनासाठी येशूने हे घोषित केले होते की त्यांच्यापैकी एकजण विश्वासघात करील, ज्याने प्रत्येकास आपले अंतःकरण तपासायला भाग पाडले. त्याच प्रमाणे जैतूनाच्या डोंगर वाटेकडे जात असता येशूने आपल्या शिष्यांना सांगीतले की मेंढरांसारखी दाणादाण होईल. जेव्हा पेत्राने हया विषयी वाद घातला की तो त्याच्याऐवजी मरेल, येशूने भविष्य वर्तविले की पेत्र त्याच रात्री तीनदा त्याचा नकार करील, जो विश्वासघाताचा एक प्रकार होता. ते गेथशेमाने बागेत गेले जेथे येशूने त्यांना त्याच्या सोबत प्रार्थना करावयास सांगीतले. अत्यंत अस्वस्थ होऊन त्याने आपल्या पित्याजवळ प्रार्थना केली की हा प्याला त्याच्यापासून दूर करावा. परंतु नम्रतेने त्याने प्रार्थना केली की त्याच्या इच्छेप्रमाणे नव्हे तर देवाच्या इच्छेप्रमाणे होवो. केवळ प्रार्थनेतच आपण आपली इच्छा देवाच्या इच्छेमध्ये बुडविण्याची शक्ती प्राप्त करु शकतो. सहसा आपल्या सोबत अशा प्रार्थनेत लोकांनी उभे राहावे

अशी अपेक्षा असते जशी येशूने आपल्या शिष्यांना विनंती केली होती. आम्हाला आपल्या भाऊ आणि बहीणींचा उत्साहीत करणारा पाठींबा हवा असतो. काय कोणी तुम्हांस प्रार्थनेत त्यांच्यासोबत उभे राहण्यास सांगीतले आहे ?

तीनदा येशू वेगळा प्रार्थनमध्ये गेला आणि पित्यास विनंती केली आणि तीनदा त्याने परत येऊन आपल्या शिष्यांना झोपलेले पाहिले. आत्मा उत्सुक आहे खरा, तरी देह अशक्त आहे. येणाऱ्या गोष्टींविषयी अज्ञान शिष्य अध्याय १३ प्रमाणे "जागृत" नव्हते. जेव्हा ते झोपी गेले होते तेव्हा यहुदाने ख्रिस्ताचा विश्वासघात केला. तो सैन्याच्या टोळीसह बागेत येतो जेथे त्याने ख्रिस्ताचे चुंबन घेतले आणि त्याला धरुन दिले. शिष्य पळाले आणि येशूला प्रमुख याजकाकडे नेण्यात आले. त्यांनी त्यास सर्व यहुदी नियमांची अवहेलना करण्यामागील पुरावे देऊन, साक्षीदार उभे करुन आणि वाटपाहण्यातील काळ बघून मृत्युची शिक्षा ठोठावली.

सर्व आरोप जे त्याच्या विरोधात लावण्यात येत होते, तेव्हा येशू स्तब्ध उभा राहीला. त्याने केवळ एका प्रश्नाचे उत्तर दिले. काय तू धन्यवादिताचा पुत्र आहेस ?

दानिएल ७:१३ आणि स्तोत्र ११०:१ चा उल्लेख करीत येशू म्हणाला मी आहे. हयामुळे ईशनिंदेचा आरोप लावण्यात आला आणि तेव्हा थट्टेचा खटला आपल्या प्रभू सोबत पूर्ण झाला आणि तारणाऱ्याला मृत्युची शिक्षा ठोठावण्यात आली. मार्क १४ ख्रिस्ताच्या आपल्या अगदी जवळचा मित्र आणि अनुयायी : पेत्र त्याला तीनदा नाकारेल हया भविष्याची पूर्तता आहे. एका दासीने त्याला ओळखले आणि त्याने येशू बरोबर असणे नाकारले. पुन्हा एका सेवकाने पाहिले आणि म्हंटले खरोखर पेत्र त्याच्यासोबत होता. पुन्हा पेत्राने तो कोण होता हे कबुल करणे अमान्य केले. शेवटी जे तेथे उभे होते ते सहमत झाले की पेत्र येशूसोबत होता. हयावेळी तो शापोच्चाराने व शपथा वाहून आपल्या अप्रामाणिकतेबद्दल बोलू लागला तेव्हा कोंबडा आरवला आणि पेत्रास ख्रिस्ताचे शब्द आठवले, दोनदा कोंबडा आरवण्यापूर्वी तू माझा तिनदा इंकार करशील. पेत्राने वर पाहिले जेव्हा अंगणात येशूची नजर त्याच्यासोबत भिडली. (लुक २२:६०-६२) लज्जेने भरुन, शास्त्रभाग सांगते की पेत्र बाहेर जाऊन मोठया दु:खाने रडला. काय ख्रिस्ताबद्दल तुम्ही तुमची प्रामाणिकता नाकारलेली आहे ? ख्रिस्तामुळे ज्यांना वाईट वाटते त्यामुळे तुम्ही ख्रिस्तापासून दूर पळण्याचा प्रयत्न करीत आहात काय ? अध्याय १५ ची सुरुवात येशूला रोमी राज्यपाल पिलाताकडे नेण्याद्वारे होते, यहूद्यांना मृत्युदंड देणे हे रोमींना नव्हे तर पिलाताला शक्य होते. दुर्दैवाने पिलाताने ख्रिस्तामध्ये कोणताही दोष पाहिला नाही, परंतु लोकांची विनवणी देखील टाळू

शकला नाही. तो स्वतःच्या हितामध्ये आणि पद राखण्यास इच्छुक होता. म्हणून जरी त्याने येशूस निर्दोष पाहिले तरी वधस्तंभावर त्याला खिळण्यास दिले. दोन चोरांमध्ये येशूला वधस्तंभावर खिळण्यात आले ती यशया ५३:१२ च्या शब्दांची पूर्तता होती. परंतु त्याने सैनिकांची थट्टा आणि त्याजवर थुंकणे हे देखील सहन केले, धार्मिक पुढाऱ्यांनी जो अपमान केला आणि बाहेर उभे असलेल्यांनी त्याला दुष्टतेने अडखळण घालून डोक्यावर मारत थट्टा करीत होते. नरकाचा संताप त्या दिवशी येशूवर येऊन ठेपला होता. तरी सुध्दा तो पापरहित किंवा निष्कलंक राहिला. त्याच्याकरीता दुःख सोसणे हयाकरीता मोठी ताकद म्हणून आम्हासाठी हा स्त्रोत ठरु शकतो.

ख्रिस्ताच्या मृत्युसोबत अनेक चिन्ह घडली. मध्यानापर्यंत सर्वत्र अंधकार पसरला, ते जणू निर्माणकर्त्या देवाशिवाय आपले जीवन कसे असू शकते हयाचे उदाहरण होय. मंदिराचा पडदा मधातून फाटला ज्यामुळे पवित्रस्थान हे अतिपवित्रस्थानापासून वेगळे झाले. अगदी उलटपक्षी तो खालपर्यंत मधातून फाटला होता, जे दर्शवते की येशूच्या मृत्यूने मनुष्यास देवापासून दूर नेणारा पडदा हटविला गेला. शताधिपतीची कबुली ही अत्यंत महत्वाची ठरते. येशूचे प्राण सोपविण्याच्या प्रकाराला बघता, तो वचन ३९ मध्ये म्हणाला, "खरोखर हा माणूस देवाचा पुत्र होता." त्याच दिवशी येशूचे शरीर अरीमथाईकर योसेफने जो सभेचा सदस्य व येशूचा गुप्त शिष्य होता तो पुरण्यास घेऊन गेला.

ख्रिस्ताचे अनुयायी जे सर्व ते आहेत आणि त्यांचे जे सर्व आहे त्यासह देवावर प्रिती करतात.

मार्क

प्रकरण १३ : अध्याय १६

विषय वाक्य : येशू मृतांमधून जीवंत झाला. मंडळीला नेमतो आणि पित्याकडे परत जातो.

दिवस १

वाचा मार्क १६ : १-८

१. कबरेवर कोण आले ? केव्हा ? का ?

२. स्त्रियांना काय आढळले ?

३. वचन ५-८ मध्ये स्त्रिया कशाचे वर्णन करतात?

४. स्त्रियांना काय करण्यास सांगण्यात आले आणि काय त्यांनी ते केले ?

५. शिष्यांना केव्हा आणि कसे हया सर्व गोष्टी लक्षात आल्या? (योहान २ : २२ आणि १२ : १६)

६. योहान १४ : २६ बघा की पवित्र आत्म्याने शिष्यांची येशूने केलेल्या सर्व कामांना समजण्यासाठी कशी मदत पुरविली ?

दिवस २

वाचा मार्क १६ : ९-२०

१. वेगळे कोणते लोक होते ज्यांना येशू प्रकट झाला (लुक २४ : ९-४५; योहान २०:१९-२९)

२. येशूचे प्रकटीकरण अति महत्वाचे का होते ? (१ करिन्थ १५ : १-८)

दिवस ३

वाचा मत्तय २८:१६-२०, मार्क १६: १५-१६, लुक २४:४५-४९

१. येशूने शेवटचे कोणते निर्देश आपल्या शिष्यांना दिले होते?

२. शिष्यांनी त्यांचे पालन केले काय ? वचन २०

३. जर तुम्ही येशूचे शिष्य आहात, तर आज ही आज्ञा तुमच्यासाठी आहे काय?

दिवस ४

वाचा योहान ६:४०, योहान १०:१०, योहान ११:२५

१. हया वचनांमध्ये आम्हाला कोणत्या प्रतिज्ञा देण्यात आल्या आहेत ?

२. काय तुम्ही अशा प्रकारे जगत आहात जे हे प्रकट करते की, ते सर्व तुम्ही सत्य मानता?

दिवस ५

परिक्षण

१. काय कोणातरी सोबत तुम्ही हे वाटणार की, मार्क च्या अभ्यासाने तुम्हांस येशुला समजण्यास कशी मदत पुरविली आणि / किंवा एक शिष्य म्हणुन तुमची जवाबदारी कोणती ?

२. हया अभ्यासादरम्यान देवाने जे कार्य तुमच्या अंतःकरणात केले आहे त्यामुळे तुम्ही भिन्नतेचे जीवन कसे जगणार?

दिवस ६

प्रकरण १३ : "देवाच्या पुत्रास मृत्यु थांबवून ठेऊ शकला नाही."

पाठ : मार्क १६

मुख्य वचन : मार्क १६:१५, "सर्व जगात जाऊन सर्व सृष्टीत सुवार्तेची घोषणा करा."

विषय वाक्य : येशू मृतांतून जीवंत झाला, मंडळीची नेमणूक करतो आणि पित्याकडे परतून जातो.

जिवन तत्व : मृत्यु देवाच्या पुत्राला थांबवून ठेऊ शकला नाही आणि तो त्याच्या अनुयायांनादेखील थांबवू शकणार नाही.

सारांश : *येशुचे प्रकटीकरण आणि शेवटचे स्वर्गारोहण.*

मार्कचा शेवटचा अभ्यास निश्चित गौरवी आहे. त्याची सुरुवात शब्बाथाच्या शेवटाच्या घोषणेने होते ! खरेतर, काळोखाच्या शब्बाथाच्या आठवणीला आनंदाने गिळंकृत केले होते. दुसऱ्या

दिवशी भल्या पहाटे मरिया मग्दालिया आणि यकोबाची आई मरिया येशूला सुगंधद्रव्य लावण्याकरीता आल्या आणि त्यांनी पाहिले की कबर रिकामी आहे. वचन सांगते की त्या कापित आणि आश्चर्य करीत होत्या. ग्रिक मध्ये ते अवाक, आश्चर्य आणि आनंदाने चकित झाल्या होत्या. वचन ९ सांगते की, येशू वैयक्तिकरित्या मरियेला प्रकट झाला जी स्वतः कबरेकडे परतली होती. लुक २४:१२ सांगते की, केवळ तागाची वस्त्रे कबरेत मागे राहिले होती. लुक २४:१२ सांगते की, पेत्र व योहान ही वस्त्रे पाहण्यासाठी कबरेकडे धावतात.

खरोखर कबर रिकामी आहे हे बघण्याकरिता कोणालाही स्वतः पायदळ जाण्यास १५ मिनिटं लागतील.

हया प्राथमिक प्रकटीकरणानंतर, येशूने अनेकांना दर्शन दिले. तो स्वतःच्या भावाला याकोब आणि योहानाला देखील दिसला (योहान २१). वरच्या माळीवर तो शिष्यांस तो प्रकट झाला तसेच गालीलच्या किनाऱ्यावर आणि ५०० हुन अधिक जनांना जसे १ करिंथ १५:५६ मध्ये पौलानुसार वर्णन केल्याप्रमाणे आहे. किती गौरवी सामने ते झाले असावे ! मृत्यु आणि ख्रिस्ताचे पुनरुत्थानही सुवार्ता होय त्याने पाप व मृत्यु दोघांनाही हरविले आहे हयासाठी की आपण परिवर्तीत जीवन जगून त्याची उपस्थिती आणि गौरवात नेहमी आनंद साजरा करावा! जसे पौल फिलिपैकरांस मध्ये वर्णन करतो, आपण आता पुनरुत्थित जीवन जगण्यास समर्थ आहोत. (फिलिप. ३ : ८-१४).

सर्व अनुयानांना एकत्र केल्यानंतर येशूने काही महत्वाचे सांगितले ज्यांस आपण सर्वांत मोठी आज्ञा असे म्हणतो. सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा जे सर्वप्रथम सुवार्तेसह बाहेर निघाले त्यांच्यासह चिन्ह प्रगट होती जी अविश्वासी आणि विरोधी जगाला संदेशाच्या अधिकृतपणाविषयी खात्री पटवित होती. तो पित्याकडे परतला जेथे तो पित्याच्या उजवीकडे बसला तरीही वचन २० आणि पुढील भाग सांगते की ख्रिस्त स्वतः आणि त्याच्याव्दारे कार्य करीत गेला जे सुवार्तेला इतरांपर्यंत घोषित करीत गेले.

अध्याय १३ मध्ये म्हंटल्याप्रमाणे जो पर्यन्त ख्रिस्ताचे दुसरे आगमन होत नाही आम्हा ख्रिस्तीजणांना त्याच्या अधिकाराने व सामर्थ्यांने हे पाचारण व विशेष कार्य लाभले आहे की, सर्वत्र सुवार्ता प्रसार करावी. जसा येशू आपल्या अनुयायांसोबत होता, तो त्या मनुष्यांसोबत आहे

जे त्याच्या इच्छेनुसार हया पृथ्वीवर चालतात. काय तुम्ही खात्रीपूर्वक अपेक्षा करु शकता की येशू त्याच्या वतीने तुम्हांस बोलण्याकरीता सामर्थ्य देईल ?

देवाच्या पुत्राला मृत्यु थांबवू शकत नाही आणि तो त्याच्या अनुयायांना देखील थांबवू शकणार नाही.

प्रेषित : पृथ्वीच्या शेवटापर्यंत सर्वांना घेऊन जाणारे

परिचय

लेखक :

प्रारंभिक मंडळीने प्रेषितांची कृत्ये आणि लुककृत शुभवर्तमान ही दोन्ही पुस्तके डॉ. लुकशी जोडलेली आहेत. जो ख्रिस्ताचा शिष्य होता. प्रेषित १ : १-२ मध्ये लिहील्या प्रमाणे ही दोन्ही एकाच पुस्तकाचे दोन भाग आहेत. पहीला भाग लुकाचे पुस्तक आहे. ज्यामध्ये येशूचे जिवन आणि सेवाविषयी विस्तारीत माहिती आहे आणि प्रेषितांची कृत्ये मध्ये शिष्यांच्या नेमणुकीपासुन मंडळीच्या जन्म व वाढीची ख्रिस्तपुर्व माहिती आहे. दोन्हीही एकत्र मिळुन नव्या कराराच्या धर्मग्रंथात, पौलाच्या लिखाणापेक्षाही जास्त एक मोठी भागिदारी पुरवितात. ख्रिस्ताचा शिष्या हया नात्याने व पौलाचा सहप्रवासी (फिलेमोन १:२४ आणि २ तिमथ्याला ४:११) लुक प्रेषितांच्या पुस्तकातील कित्येक पुस्तकातील कित्येक घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार होता. अध्याय १६ मध्ये तो, "आम्ही " शब्दाचा प्रत्यक्ष साक्षीदार म्हणुन वापर करतो. तरीही उरलेल्या पुस्तकात तो शैक्षणिक फायदयाच्या दृष्टिकोणातुन आम्हास योग्य परीक्षणातुन लेख पुरवित आहे. लुक दोन्हीही गोष्टी जसे प्रेरणा आणि कदाचित त्याचे आध्यात्मिक वरदान जे लुक १:१-४ मध्ये नमुद आहे. पुरवितो, जेव्हा तो म्हणतो, "ज्या गोष्टिसंबंधाने आपल्या मध्ये पुर्व खात्री झाली आहे. त्या गोष्टी आरंभापासुन प्रत्यक्ष पाहणारे लोक व वचनाचे सेवक यांनी आम्हास सांगुन ठेवलेला वृंतांत लिहुन काढझ्याचे श्रम पुष्कळांनी हाती घेतले आहे. यास्तव थियफिल महाराज मलाही वाटले की, सर्व गोष्टींचा मुळापासुन नीट शोध केल्यामुळे मी त्या आपल्याला अनुक्रमाने लिहाव्या, या साठी मी, ज्या वचनांचे शिक्षण आपल्याला देण्यात आले आहे त्यांचा निश्चितपणा आपल्या लक्षात यावा."

काळ :

विद्वानांनी हे पत्र ख्रिस्त पश्चात ५९ च्या पुर्वार्धात आणि दुसऱ्या शतकाच्या शेवटच्या समयी लिहीले असावे हा काळ ठरविला आहे असा अंदाज लावीत की, प्रेषितांची कृत्य आणि लुक हे दोन्ही एकाच काळ खंडात लिहीली गेली. विव्दावानांनी पत्रांद्वारे असे अंदाज मिळविले जे पुर्वीची वेळ आली तसेच नंतरची वेळ मिळविण्याची आधारभुत ठरवितात. एकीकडे लुक स्वतःहा लुक पहिल्या अध्यायात सांगतो की, इतरांनीही हाच उल्लेख ठेवला असावा. कदाचीत तो मार्क जो ख्रि.पु. ५६-६५ च्या दरम्यान लिहीलेले पाहिजे शुभवर्तमानाचा उल्लेख आहे त्याजविषयी म्हणत आहे. मंडळीकरीता मार्कचा लेख पायाभूत गणला गेला आणि मत्तय व लुक हयांच्या करीता उपयोगी पडलेले संदर्भ, त्यामुळे लुकाच्या लिखाणाचा वेळ हा नंतरचा ठरतो.

दुसरीकडे, लुक पौलाच्या पत्रांचा संदर्भ वापरत नाही किंवा निरोच्या भयानक छळाचा, यरुशलेमेचा नाश, याकोबाचा मृत्यु किंवा पौलावरील खटला आणि मृत्यु (ख्रि.प. ६८) हयाचा उल्लेख करीत नाही अशा घटकांना वगळणे ख्रि.प. ६० च्या काळाचा पुवार्ध सुचवितात. जेव्हा आपण लिखाण्याच्या निश्चित वर्षावर वाद घालतो तेव्हा हया पुस्तकालाच येशुच्या स्वर्गारोहणापासुन ३० वर्षाचा काळ उलटुन जातो. हयामध्ये प्रेषितांची कृत्ये, शिकवण तसेच येशूला स्वर्गात जाऊन लोटलेला ३० वर्षाच्या काळातील प्रारंभक ख्रिस्ती लोकांचे आनंदी व दुःखी जीवन हया सर्वांचा उल्लेख आढळतो. हया सर्व गोष्टीमधुन वावरतानां देवाचे आपल्या लोकांसमवेत विश्वासुपणा बघायला मिळतो, तसेच आम्हाला देखील हि धन्य खात्री आशे स्वरुपात प्राप्त आहे.

प्रेक्षक :

प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक थियफिल नावाच्या मनुष्यास समर्पित होण्याद्वारे सुरु होते जो कदाचित विधर्मी असुन उच्च पदारुढ होता आणि कदाचित लुक लिखाणाचा प्रकाशक होता. आपल्या प्रेषितांच्या पुस्तकातील ऐतिहासिक परिचयात, लुक सुवार्ता लेखाचा (लुककृत शुभवर्तमान) उल्लेख करतो. हे सांगत की, त्याने ख्रिस्ताची शिकवण आणि सेवा तसेच त्याच्या

स्वर्गरोहणानंतर पसरलेले सुवार्ताकार्यांचे भांषांतर त्याने केले तेव्हापासुन तो मंडळीच्या जन्मामध्ये योग्य वक्तृत्वाने सुशिक्षीत, विधर्मी प्रेक्षकांना तो परिवर्तीत करीत होता. विव्दानांनी सुचविले की लुकने मंडळीचा हेतु आणि कार्य स्पष्ट करण्याकरीता हे लिहीले होते. वाढत्या रोमी शासनाच्या संशयाला तो सांगु इच्छित होता की, ख्रिस्ती लोक त्रास उत्पन्न करणारे नाही परंतु समाजामध्ये काळाची आणि सर्वांसाठी सत्य सीमाबाहय सदस्यांसमवेत वाटणारे पात्र आहेत. यहुदयांची चुकीची विचारधारा आणि / किंवा खोटी शिकवन दुरुस्त केली. सोबतच ख्रिस्तीपणा ही यहुदीपणाची पूर्णता आहे आणि जो कोणी ख्रीस्ताचा मसिहा म्हणुन नकार करतो तो देवाचा नकार करतो हे रुजविले.

घोषणावाक्य:

एम.एस.बी. स्टडी बायबल नुसार " प्रेषितांची कृत्ये हे परिवर्तनातील महत्वाचे आहे. जे शुभवर्तमानापासुन पत्रांपर्यत, (इतिहास) यहुदीपणापासुन ख्रिस्तीपणापर्यंत (धर्म) व्यवस्थेपासुन कृपेपर्यंत (दैवीव्यवहार), यहुदयांपासुन यहुदी आणि विधर्मी (देवाचे लोक) आणि राज्यापासुन मंडळीपर्यत (देवाचा कार्यक्रम) असे आहे." हे शुभवर्तमान आणि पत्रामधील साखळी गणल्या जाते.

पुस्तकाचा परीवर्तनशिल स्वभावाखेरीज तेथे एक स्पष्ट घोषवाक्य आहे. मंडळीचा जन्म आणि वाढ. ते यरुशलेमेत सुरु होते जे यहुदी राष्ट्रांचे केंद्र आहे आणि रोम मध्ये समाप्त होते जे विधर्मी जगाचे केंद्र आहे. हे आम्हास शुभवर्तमानाच्या मर्यादीत राज्यापासुन घेऊन चार शुभवर्तमानाच्या जवळ जवळ घेऊन जातात, कृपेचे शुभवर्तमान पसरवित सर्व जगापर्यंत प्रेषितांची कृत्ये मध्ये समापण स्थळी आपण पाहतो की, पौल रोम येथे पोहोचला.

निश्चित आम्ही जे मंडळी युगात जन्मलो, आम्हास ही नांगरनी कळणार नाही परंतु ही ऐतिहासिक वेळ ठळक उजेडास पात्र ठरतात. आपल्यासमान असणारे एकमेव पुस्तक आहे. ख्रिस्ताने केलेली घोषणा की, ते सामर्थ्य प्राप्त करतील आणि सर्व जगास साक्षीदार होतील. हे अपुर्व, नविन होते. शिष्यांच्या वरचढ असणाऱ्या प्रश्नाला की, इस्त्राएलचे राज्य येशू पुन:स्थापित करणार काय हयावर प्रेषित १:८ हे देवाच्या उद्देश्यातील अनपेक्षित प्रकाशन होते. जरी आमच्या

पूर्वजांना सर्व राष्ट्रांना आशिर्वादीत होण्याची प्रतिज्ञा प्राप्त होती आणि ख्रीस्ताने आपल्या पवित्र आत्माविषयी बोलला आणि वरच्या मजल्यावरील त्याचे पवित्र कार्याची नेमणूक तरीही मंडळी युगाची सुरुवात ही कृपा आणि सामर्थ्यांतिल ज्यांद्वारे शिष्यांसाठी जगासाठी आणि स्वर्गिय जंणासाठी विस्फोट समान होता.

हया समान प्रकटिकरणातील मुख्य मंचावर उपस्थित पवित्र आत्मा आहे. जो देवनिर्मित कार्यक्रमाची आखणी मंडळीच्या इतिहासाव्दारे करतो. प्रेषितांच्या कृत्यांमध्ये वेगवेगळया घटकांद्वारे तो अतिविलक्षण रित्या चकाकतो. खरेतर पवित्र आत्माच आहे जो मंडळीतील कार्यांना दिशा देतो आणि देवाच्या इच्छेनुसार नवी क्रांती आणण्याकरीता पुढाकार घेतो. हया कारणस्तव येशुने योहान १४:१२ मध्ये म्हटले की, " त्याजवर विश्वास ठेवणार त्यापेक्षाही मोठी कृत्ये करील."

आज आपण प्रकट इतिहासातील मंडळीचे वाढीव कार्य आहेत जे जोपर्यत येशु पुन्हा येंत नाही किंवा देवाच्या राज्याकरीता आत्मे जिंकल्याजात नाही तो पर्यंत सुरु राहणारा आणि जे देवाच्या आत्म्याने परीपुर्ण जगत आहेत, जे त्यांच्या सामर्थ्यांने नेतृत्व प्राप्त आहेत आम्ही अशांनी सुवार्ता पसरविलीच पाहिजे.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण पहिले : अध्याय १

विषय वाक्य : **येशुने शिष्यांना नेमले आणि त्यांच्यासाठी अभिवचन दिले**

दिवस : १

वाचा प्रेषितांची कृत्ये १:१-५

१. प्रेषित १:१-५ सोबत लुक १:१-४ ची तुलना ही पुस्तक कोणी लिहीली आणि का हयासाठी करा ?

२. आपल्या पुनरूत्थानानंतर येशू किती दिवस प्रकटला ?

३. त्याच्या अनुयायांना कोणती आज्ञा प्राप्त होती ?

दिवस २

वाचा प्रेषित १:६-८

१. वचन ६ मध्ये जेव्हा त्यांनी येशुला प्रश्न विचारले तेव्हा त्याची काय भावना असावी ?

२. येशुने जे उत्तरे दिले त्या आधारावर त्यांच्यासाठी तो काय इच्छित होता असे तुम्हास वाटते ?

३. हया वाचनांमधुन देवाचे कोणते गुणवैशिष्टये दिसुन येतात ? तुमच्या जिवनाशी ती कशी बोलतात?

४. प्रेषितांची कृत्ये हया पुस्तकाचे वचन ८ हे घोषवाक्य तुम्ही आपल्या शब्दात मांडु शकता काय ?

५. येशुने विश्वासणाऱ्यांनाच आपले साक्षीदार का नेमले असावे ?

दिवस ३

वाचा प्रेषित १:९-११

१. योहान ७:३७-३९ चे परिक्षण करा. पवित्र आत्मा देण्यापूर्वी काय घडण्याचे येशुने म्हटले ?

२. ज्या मेघाने येशु त्यांच्या दृष्टीआड झाला ते कशाचे प्रतिनिधित्व करते ? (वाचा निर्गम १३:२१-२२)

३. परतण्याविषयी येशुने कशी प्रतिज्ञा केली आहे ? (वाचा मत्तय २४:३०)

दिवस ४

वाचा प्रेषित १: १२-२६

१. माडीवरच्या खोलीत भेटणारी ती लोकं कोण होती ? ते का एकत्र येत असत ?

२. ही वचने यहुदा विषयी काय सांगतात ?

३. जेव्हा शिष्यांनी एक नवा पुढारी निवडला वचन २१ मध्ये त्यांनी एक गुणवैशिष्टये सांगितले आणि त्यांनी वचन २४ मध्ये दुसऱ्यांविषयी प्रार्थना केली ही महत्वाची का आहेत ?

दिवस ५

वाचा प्रेषित १ आणि १ करिंथ १५ : १७

१. एका विश्वासणाऱ्यासाठी येशुचे पुनरुत्थान का जास्त महत्वाचे आहे ?

२. हया अध्यायात कोणती अभिवचने तुम्हास मिळतात ?

३. हया अध्यायात कोणती अभिवचने तुम्हास मिळतात ?

दिवस ६

प्रकरण १ : " ख्रिस्त नव्या सामर्थ्याची व हेतुची घोषणा करतो. "

पाठ : अध्याय १

मुख्यवचन : १-८ "परंतु पवित्र आत्मा तुम्हावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल आणि यरुशलेमेत सर्व यहुदीयांना शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल....."

विषय वाक्य : येशु शिष्यांना नेमतो आणिा अभिवचनाने त्यांस सोडतो.

जिवनतत्व : वाट पाहण्यात हेतू असतो.

सारांश : प्रेषितांची कृत्ये मध्ये लुक जेथे लुककृत शुभवर्तमानास सोडतो तिथुनच प्रारंभ करतो. पहिल्याच वचनात तो आपल्या पहिल्या पुस्तकासोबत प्रेषितांची कृत्ये पुस्तकाचा संबध जोडतो आणि थियाफिल हा पुन्हा प्रेक्षक असण्याची ओळख देतो, तो आपल्या पहिल्या पुस्तकाचा सारांश "त्याने जे जे करावयास व शिकवावयास आरंभीले होते त्या सर्वांविषयी ..... " संग्रहीत केले. हे विलक्षण कथन होय जे प्रकट करते की येशु देवपित्याच्या उजवीकडे जाऊन बसल्यानंतरही देवाच्या कार्याचा शेवट झालेला नाही. पवित्र आत्माद्वारे जे काय ख्रिस्ताने आरंभिले होते ते ख्रिस्ताचे शिष्य पुढे करीत राहीले जे आत्माद्वारे जे काय ख्रिस्ताने आरंभिले होते ते ख्रिस्ताचे शिष्य पुढे करीत राहीले जे त्याच्या आपल्या नवरीकरीता पाचारण येण्याकरीता परत येण्यापर्यंत सुरु राहणार. नंतर, लुक खात्री पटवुन देतो की, मृत्युवर ख्रिस्ताचा विजय हयावर प्रेषित निश्चित होते कारण " पुष्कळ प्रमाणांनामुळे अनेकांना त्याच्या प्रकटिकरणामुळे आणि त्याच्या देवाच्या राज्याविषयी शिकवणीमुळे येथेच लुक प्रेषितांची कृत्येची चाबी प्रस्तुत करीत आहे." शिष्यांच्या इस्त्राएल राज्य पुन्हा स्थापित करणार हया प्रश्नांच्या उत्तरांत येशू त्यांना म्हणाला परंतु पवित्र आत्मा तुम्हावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल आणि यरुशलेमेत

सर्व यहुदियांना शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल. हया कथनात आम्हासाठी प्रेषितांची कृत्येची रुपरेषा सापडते.

१. यरुशलेम

२. यहुदिया

३. शोमरोन

४. पृथ्वीच्या शेवटापर्यंत

वाट पाहण्यात हेतू असतो !

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण दुसरे : अध्याय २

विषयवाक्य : पेन्टेकॉस्ट मंडळीच्या प्रारंभाला चिन्हांकित करते

दिवस १

वाचा प्रेषित २ : १-१३

१. वचन १-४ पासुन स्पष्ट करा जे त्यांनी पाहीले, ऐकले आणि पेन्टेकॉस्टच्या दिवशी अनुभवले ?

२. त्यादिवशी कोणते वेगळया प्रकारचे लोक उपस्थित होते ?

३. कोणत्या भाषा बोलल्या गेल्या जेनेकरुन सर्वांनी समजावे ?

४. अशा असामान्य घटनेविषयी वेगवेगळया लोकांचा प्रतिसाद कसा होता ?

दिवस २

वाचा प्रेषित २:१-१३

१. इफिस ५:१८ मध्ये पवित्र आत्माविषयी कोणती आज्ञा दिली आहे ?

२. पुढील शास्त्रभाग बघा आणि पवित्र आत्म्यानं भरण्याविषयी चिन्हांची यादी बनवा ?

   अ. प्रेषित ४:३१

   ब. प्रेषित ६:१-५

   क. प्रेषित १३:८-१०

   ड. प्रेषित १३:५२

३. वाचा गलतीकंरास ५:२२-२३ आणि विश्वासणाऱ्यांमध्ये पवित्र आत्मा कोणता चारीत्र्यवान गुण उत्पन्न करु शकतो त्याची यादी बनवा ?

४. पवित्र आत्माच्या गुणवैशिष्टयांपैकी एखादया गुणाच्या अनुभवाचे वर्णन करा.

दिवस ३

वाचा प्रेषित २ : १४-२८

१. कोणते भविष्य जे पेत्राने सांगितले हया समयी पुर्ण झाले ?

२. पेत्र म्हणतो येशू ''देवाच्या ठाम संकल्पानुसार व पुर्वज्ञानानुसार '' वधस्तंभी खिळला, हा देवाचा कोणता गुण होय ?

३. यशया ५३ : १०-११ नुसार, ख्रिस्ताच्या मृत्युने कोणत्या गोष्टी मिळविण्यात आल्या ?

दिवस ४

वाचा प्रेषित २ : १७-३२

१. ''शेवटचे दिवस'' म्हणजे काय ? (वाचा इब्री १:१-२ आणि १ पत्र १:१८-२१)

२. प्रभुचा दिवस म्हणजे काय ? (वाचा २ पेत्र ३ : १०-१३)

३. '' शेवटचा दिवसाच्या '' अखेरिस काय घडणार ? (प्रेषित २ : १७-२०)

४. तुमचा विश्वास आहे काय की, पवित्र आत्मा केवळ सुवार्ताप्रसारकांसाठी, पालकांसाठी, सेवकांसाठी आहे की, जे कोणी निवडतात की, येशु ख्रिस्तावर तारणारा आणि प्रभू म्हणुन विश्वास ठेवणे निवडतात, त्यांच्या करीता ?

५. येशुच्या मृत्युविषयी पेत्र कोणाला दोषी ठरवितो ?

दिवस ५

वाचा प्रेषित २ : ३३-४७

१. ख्रिस्त आता कोठे आहे ?

२. हयाचा तुमच्या वर्तमान परिस्थितीवर कोणता परीणाम येतो ?

३. त्यांच्या अंतःकरणात चुटपूट लागल्यावर त्यांनी जेव्हा विचारले की, काय करावे तेव्हा पेत्राने त्याना काय करावयास सांगितले ?

४. ''कुटिल पिढी'' हया शब्दाचा अर्थ पेत्राने कोणता काढला, असे तुम्हास वाटते ?

५. आज तुम्ही कुटील पिढीला कसे बघता ?

६. विश्वासनाऱ्यांनी स्वतःला कशासाठी तत्पर केले ?

७. त्यांच्या भक्तिमय समर्पनातून कोणते आशिर्वाद आले ?

दिवस ६

प्रकरण २ : "मंडळी जन्माला आली"

पाठ : अध्याय २

मुख्यवचन : २:१७ "देव म्हणतो शेवटच्या दिवसात असे होईल की, मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्माचा वर्षाव करीन तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील तुमच्या तरुणास दृष्टांत होतील व तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील."

विषय वाक्य : पेन्टेकॉस्ट मंडळीच्या प्रारंभाचे चिन्ह होय.

जिवनतत्व : आपण जेव्हा पवित्र आत्म्याला प्रतिसाद देतो तेव्हा आपण बदलतो.

सारांश : *जेव्हा आपण पेन्टेकॉस्ट विषयी वाचतो तेव्हा १ ल्या अध्यायातील येशुची प्रतिज्ञा अध्याय २ मध्ये पूर्ण होतांना पाहतो.*

सोसाटयाच्या वाऱ्यासमान पवित्र आत्मा त्यांच्यावर उतरला आणि इतर राष्ट्रामधुन तेथे जमलेल्या लोकांच्या भाषेत त्यांस बोलण्यात सामर्थ्य प्राप्त झाले. त्यांची भाषा ऐकत असल्यामुळे त्यांस येशूविषयी पेत्र जे बोलत होता त्याची समज प्रापत झाली हे सर्व राष्ट्रांची देव सर्वांना एकतेमध्ये आणतो हे त्याचे देखिल चिन्ह होते.

शुभवर्तामानात ज्या पेत्राविषयी वाचतो तो प्रेषितांची कृत्ये मधील बोलक्या पेत्रासमोर ठेंगू दिसुन पडतो. पवित्र आत्माने परिपुर्ण होऊन त्याने योएल २:२८ मधील भविष्याचे स्पष्टीकरण केल्यामुळे मंडळीमध्ये तुर्की, इजिप्त, इराण, इराक, आफ्रिका आणि इटली अशा देशातून मंडळीमध्ये ३००० लोकांची भर पडली.

प्रारंभीच्या मंडळीने अंतःकरण आणि मनाच्या जळुवणुकीमुळे एकतेचे कृतीमय सादरीकरण केले जे वर्णन न करता येण्याजोगे होते जेव्हा त्यांनी स्वतःची मालमत्ता विकुन

एकमेकांची काळजी घेतली. हया आत्म्याने भरलेल्या समाजाने इतरांना ख्रिस्ताकडे आकर्षित केले जर आम्ही प्रारंभीक मंडळी समान निस्वार्थ होऊन औदार्य दाखविले तेव्हा आपल्या समाजात कोणता प्रतिसाद असणार ? पेन्टेकॉस्टने बराचसा बदल आणला आणि विश्वासणाऱ्यांसमोर नवा धडा दिला, परंतु मंडळीने यहुदी प्रथा व मंदिरातील उपासना स्विकारुन ठेवीली होती. त्या सोबतच ते घरोघरी भेटायचे आणि येशूने सांगितल्या समान प्रभूची मेज आपसांत वाटायचे. त्यांनी यहूदी प्रेक्षकांना प्रचार केला आणि मंडळीच्या हया सुरुवातीच्या वर्षात त्यांनी चुकीचा अर्थ काढला की, एखादा विश्वासणारा पवित्र आत्मा मिळण्यापूर्वी यहुदी असावा. कदाचित ते येशुचे शेवटचे शब्द विसरले. (प्रेषित १:८) ''सर्व जगात जा'' त्यामुळे बाळय सतावाची सुरुवात झ ाली, स्तेफनापासुन सुरु होऊन शोमरोन मधुन विश्वासणाऱ्यांना पलिकडे हाकलने पर्यंत गेले.

जेव्हा आपण पवित्र आत्म्याला प्रतिसाद देतो, तेव्हा आपण बदलतो !

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण तिन : अध्याय ३ - ४

विषयवाक्य : पेत्राच्या भाषणामुळे सामर्थ्य, सताव आणि सामुहिक प्रार्थना घडुन येते.

दिवस : १

वाचा प्रेषित ३ : १-११

१. पेत्र व योहान कोठे होते आणि भिकाऱ्याने त्यांच्याकडे कोठे पाहीले ?

२. कोणत्या सामर्थ्यांने पेत्राने लंगडया मनुष्याला बरे केले ?

३. लोकांकडुन कोणत्या भिन्न प्रतिक्रिया घडल्या ?

दिवस २

वाचा प्रेषित ३ : १२-२६

१. पेत्राने येशूविषयी लोक समुदायांस सांगावयास कोणती संधी निवडली, कोणती वचने दर्शवितात की त्याने सर्व गौरव देवाला दिले ?

२. ३ : १६ मध्ये "त्याच्याच नावातील विश्वासामुळे" हया तुम्हास कोणता अर्थ वाटतो ?

३. उल्हास आम्हाला कोठे मिळतो ? तुमच्या जिवनात हे सत्य असल्याचे आढळले काय ?

४. हया वचनानुसार सर्व संदेष्टे कशा विषयी बोलतात ?

५. अब्राहाम आणि संदेष्टयांपासुन कोणती प्रतिज्ञा किंवा करार आम्हाकरीता वाढविला गेला की, आम्ही आशिर्वादीत होऊन ते पुढे सरकवावे ?

दिवस ३

वाचा प्रेषित ४:१-१२

१. जेव्हा लोकांनी पुनरुत्थानाविषयी ऐकले तेव्हा त्यानी कशी प्रतिक्रिया व्यक्त केली ?

२. पेत्र आणि योहानाला काय झाले ?

३. पेत्राला बोलण्याचे सामर्थ्य कुठून मिळाले ?

४. काय देवाने तुम्हाला तेच सामर्थ्य दिले आहे ? केव्हा किंवा कसे ते सांगा ?

दिवस ४

प्रेषित ४ : १-२२

१. पवित्र आत्म्याने भरलेले हयाचा परिणाम काय होता ?

२. कोणती वचने प्रकट करतात की, जगामध्ये येशू एकमात्र तारणाचा मार्ग आहे ?

३. पुढील लोकांची वागणुक आणि कृत्य हयांचे वर्णन करा.

अ. पेत्र आणि योहान

ब. लोकं

क. जे अधिकारी पदावर आहेत.

दिवस ५

वाचा प्रेषित ४:२३-२७

१. विश्वासनाऱ्यांनी देवाची स्तुती कशासाठी केंली ?

२. हया प्रार्थनेत तुम्ही अंगिकार आणि विनंती बघता काय ?

३. देवाने त्यांच्या प्रार्थनेचे कसे उत्तर दिले ?

४. देवाने तुमच्या प्रार्थनांचे उत्तर कसे दिले आहे ?

५. येशु नांवावरील विश्वासाने, आरोग्य मिळते काय यावर तुम्ही विश्वास ठेवता ?

दिवस ६

प्रकरण ३ : "धाडसासाठी मंडळी प्रार्थना करते"

पाठ : अध्याय ३ आणि ४

मुख्यवचन : प्रेषित ४:१२, "आणि तारण दुसऱ्या कोणाकडुन नाही कारण जेणेकरुन आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही."

विषय वाक्य : पेत्राच्या भाषणाने सताव, सामर्थ्य आणि सामुहिक प्रार्थना घडुन येते.

जिवन तत्व: पवित्र आत्म्याद्वारे मिळालेल्या धाडसाने तुमच्या बोलण्यावर, मैत्रिवर, प्रार्थनेवर आणि भौतिक संपत्तीवरील आपल्या वागणूकीवर पडतो.

सारांश : प्रेषितांची कृत्ये ३-७ मध्ये मंडळी पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यांने शरीर व प्राण हयांना आरोग्य पुरविते आणि ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाची घोषणा करते हयाचे उदाहरण ३:१-९ मधिल लंगडया व्यक्तित मिळालेल्या आरोग्या मध्ये बघतो. शारीरिकरित्या मनुष्याला बरे करण्यात आले आणि लगेच देवाचे गौरव करीत सुटले. त्याने लोकांना पश्चातापासाठी आमंत्रण दिले. आणि ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनाची घोषणा केली.

अध्याय ४ ची सुरुवात सदुक्यांचा पेत्राच्या मृंताचे पुनरुत्थान आणि लोकांना हे शिकविण्याचा हेतू हया दोहोंचा विरोध करण्याद्वारे होते. त्यांनी पेत्र आणि योहानाला बंदिवासात टाकले. तरीसुध्दा जवळ जवळ ५००० लोकांनी त्या दिवशी विश्वास केला. जेव्हा दुसऱ्या दिवशी अधिकारी, वडील व शास्त्री यांनी पेत्र आणि योहानाला प्रश्न विचारले तेव्हा पेत्राने तिसऱ्या भाषनासह त्यांना उत्तर दिले. ते संक्षित्प होते परंतु पवित्र आत्माद्वारे सामर्थ्यांने भरलेल्या दिशेने होते. वचन १३ सांगते की, धार्मिक पुढाऱ्यांनी "हे निरक्षर व अज्ञानी इसम आहेत हे जाणून ते आश्चर्य करु लागले. आणि हे येशुच्या सहवासात होते. हे ही त्यांनी ओळखले.". देव जो आमच्या सोबत राहतो त्याचे किती पुरेसे प्रमाणाचे हे जोरदार वाक्य आहे. काय लोक हे बघतात की, आम्ही येशु सोबत होतो ? पेत्र व योहानाला सोउण्यात आले आणि लगेच ते आपल्या मित्रमंडळीकडे गेले आणि त्यांनी एकत्र आपले अंत:करण प्रार्थनेत प्रभुकउे लावीले. स्तुती आणि प्रशंसेने सुरुवात करीत त्यांनी देवाच्या नियंत्रणाची जाणीव केली तसेच त्याचे राष्ट्र, पुढारी आणि घडामोडींवरील सार्वभौमत्वाला मान्य केले. त्यानंतर त्यांनी विनवनी केली की, इतरांनी हे जाणून घ्यावे म्हणुन त्यांनी आपला सामर्थी हात आणि वचने त्यांच्या जीवनाकडे वाढवावी. विश्वासी लोक जसे अंत:करणाने व मनाने जुळली होती. तेव्हा त्यांनी देवाला समर्पण केले की, त्याच्या राज्याकरीता ते सर्व उपयोगी साधन असे असावे. जे लोक त्यांना घनिष्ट बंधुप्रतीतील समाज हया नजरेने बघत होते त्यांनी देवातर्फे देण्यात आलेला आशिर्वाद, पसंती आणि कृपेच्या आज्ञेचा परिवर्तीतपणा पाहिला.

पवित्र आत्म्याद्वारे धाडसाने आपले भाष्य, मैत्री, प्रार्थना आणि भौतिक संपत्ती विषयी आपली वागणुक ह्यांवर परिणाम पडतो.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण ४ : अध्याय ५-७

विषय वाक्य : आंतरिक संघर्ष आणि विना परिक्षा असलेली प्रारंभिक मंडळी.

दिवस १

वाचा प्रेषित ५:१-१६

१. हनन्याने काय केले ? त्याची पत्नी कबूल झाली काय ?

२. कोणती वचने सांगतात की, हनन्या सप्पीराने पवित्र आत्म्याशी लबाडी केली ?

३. योहान १५: २६-२७ मध्ये पवित्र आत्म्यास काय म्हटले आहे ?

४. हया अनुभवातून आपण देवाविषयी काय शिकु शकतो ?

५. वचन १२-१६ मध्ये आपण अनेक चमत्काराविषयी वाचतो जे लोकांमध्ये घडत होते. आज कोणत्या प्रकारचे आश्चर्यकर्म घडत आहेत आणि त्याचा परिणाम काय ?

दिवस २

वाचा प्रेषित ५: १७-४२

१. धार्मिक अधिकाऱ्यांमध्ये कोणती वागणूक तुम्ही बघता ?

२. प्रेषित ख्रिस्ताबद्दल आपली प्रिती आणि प्रामाणिकता कशी सादर करतात ?

३. यहुदी व्यवस्थेचे पालन करण्यापेक्षा प्रेषितांना येशूविषयी साक्षीदार होणे अधिक महत्वाचे का वाटते ? (५:३०-३२)

४. विरोधाविषयी ही वचने काय सांगतात ?

अ. फिलिप्पैकरांस १:२९

ब. २तिमथ्याला ३:१२

५. वचन ४१ आणि ४२ मध्ये प्रेषितांची वागणूक कशी होती ?

दिवस ३

वाचा प्रेषित ६:१-१०

१. कोणती समस्या उद्‌भवली आणि ती कशी सोडविण्यात आली ?

२. मंडळीच्या पहिल्या सेवकांचे गुणवैशिष्टये स्पष्ट करा ?

३. स्तेफनाच्या चारित्र्य गुणवैशिष्टयांची यादी बनवा ?

४. तुम्हास कोणते गुण धारण करणे आवडेल ?

दिवस ४

वाचा अध्याय ६ : ११-१५

१. स्तेफनाविरुध्द लोकांनी कोणते आरोप आणले ?

२. अशा परिस्थिती विषयी आपले उत्तर हया विषयी लुक १२:११ आणि मत्तय १०:१९-२० काय सांगते?

३. स्तेफनाचा चेहरा स्वर्गदुता समान तेजाने का भरला असावा ?

दिवस ५

वाचा प्रेषित ७

१. स्तेफनाने दिलेली पुढील वचनातील महत्वाच्या कल्पनांची यादी बनवा.

   अ. प्रेषित ७: १-३८

   ब. प्रेषित ७: ३९-५०

   क. प्रेषित ७: ५१-५३

२. देवाने स्तेफनाचे सांत्वन कसे केले ?

३. ज्यांनी त्याजवर दगडफेक केली त्याचे वस्त्र कोणाजवळ होते ?

४. प्रेषित ७:५९ मध्ये कोणाजवळ स्तेफनाने प्रार्थना केली ?

दिवस ६

प्रकरण ४ : "वाढते दु:ख"

पाठ : अध्याय ५-७

मुख्यवचन : प्रेषित ५:२९, "आम्ही मनुष्यापेक्षा देवाची आज्ञा मानली पाहिजे."

विषयावाक्य : आंतरिक संघर्ष आणि विनापरिक्षेची प्रांरभीक मंडळी.

जिवनतत्व : आध्यात्मिक विरोधामुळे फळ उत्पन्न होते. त्याचे सामर्थ्य आमच्या मध्ये वाढते आणि आपली आध्यात्मिक मुळ अधिक मजबुत होतात.

सारांश : प्रारंभिक मंडळीने घनिष्टतेच्या समाजाचा आंनद घेत असता हनन्या आणि सप्पीराच्या बेइमानाच्या धोक्याचा धक्का पोहचला . हि गोष्ट आम्हास सांगते की, बाहेरुन आपण चांगले जरी दिसू, परंतु देव आतमध्ये पहातो, आणि तोच खरा न्यायाधिश आहे. जेव्हा मंडळी आपल्या कोवळया वयात असता पापाचा न्यायनिवाडा जो घडला त्यावरुन शुध्दीकरणाचे कार्य हेच निष्पन्न झाले. निश्चितरित्या हे आम्हास सावध करते की, देव आमच्या पापांना किती गंभिरतेने घेतो. अध्याय ५:११ सांगते, "हयावरुन सर्व मंडळीला व हे ऐकणाऱ्या सर्वांना मोठे भय वाटले." हया गंभीर परिणामामुळे ज्या कुणा लोकांनी ते ऐकले त्यांच्या मनात धास्ती भरली तरीही हया भयापोटी किंवा त्यामुळे यरुशलेम मंडळी मध्ये अनेक लोक जुळली.

हया देवा कडील परिवर्तनाबद्दल धार्मिक पुढारी द्वेषाने भरली. त्यांनी प्रेषितांना बंदिवासात टाकले. पंरतु त्यांच्या सुटकेसाठी देवाने आश्चर्यकर्म केले आणि त्यांना मंदिरात उपदेश करण्यास पाठविले की, "जिवनाचा सर्व संदेश " सांगावा. (प्रेषित ५:२०) परिषदेने त्यांस मंदिरात पाहीले आणि महायाजकापुढे उभे राहण्यास त्यांना परत आणीले ज्याने त्यांना धार्मिक पुढाऱ्यांच्या विरोधातील तसेच त्यांच्या शिकवणीच्या बंडाळी बाबद प्रश्न विचारिले. पेत्र आणि इतर प्रेषितांनी उत्तर दिले,"आम्ही मनुष्यांपेक्षा देवाची आज्ञा मानली पाहिजे."(प्रेषित ५:२९) त्यांनी जसे ख्रिस्ताला मारुन टाकले तसे त्यांना करण्यापेक्षा वडिलमंडळाने देवभिरु मनुष्य गमलियेलचा

सल्ला घेतला. ज्याने म्हंटले, ''हया माणसांपासून दुर रहा व त्यांना जाऊ दया. कारण हा बेत किंवा हे कार्य मनुष्याचे असल्यास नष्ट होईल परंतु ते देवाचे असल्यास ते तुम्हाला नष्ट करीता यावयचे नाही. तुम्ही मात्र देवाचे विरोधी ठराल.'' (प्रेषित ५ : ३८-३९)

त्यांना न मारण्याविषयी सहमत होऊन, तरीही त्यांना सहज सोडावे ही त्यांची इच्छा नव्हती. त्यांनी न मारण्याविषयी सहमत होऊन, तरीही त्यांना सहज सोडावे ही त्यांची इच्छा नव्हती. त्यांनी प्रेषितांना बोलावून मारहान केली आणि अनेक धमक्या देऊन सोडुन दिली. हया गोष्टीतील मुख्य भाग म्हणजे प्रेषितांनी त्यामध्ये आनंदच साजरा केला. ख्रिस्ताकरीता त्रास सहन करण्यास ते पात्र ठरले. हयामध्ये ते आंनद साजरा करु लागले. काय तुम्ही कधी ख्रिस्ताविषयी दुःख सहन करणे आंनदाचे समजले आहात ? आपल्या जगात हा असामान्य प्रतिसाद आहे आणि विश वासणाऱ्यामध्ये देखिल असमान्य, परंतु तो केवळ पवित्र आत्म्याद्वारेच मिळविला जाऊ शकतो. तोच पवित्र आत्मा प्रेषितांच्या आणि आज सर्व विश्वासणाऱ्यांच्या जीवनात नम्रते आणि आंनदाविष्जयी चेतना जागृत करतो. तो जिवनात स्फुर्ती, मार्गदर्शन, दिशा ठरवणे. योजना आखणे, शक्ती पुरविणे आणि संवाद साधने करतो. तो सर्व काही करतो. आपले तोंड उघडणे, ज्या कुणा परिस्थितीमध्ये तो ठेवतो तेथे संधीचा लाभ घेण्यास तयार राहाने. (पवित्र आत्म्याचे काम जाणण्यास योहान १४ तसेच योहान १६ वाचा) अध्याय ६ मध्ये हे हेल्लेणी विधवाची उपेक्षा होत असल्याची तक्रार प्रेषितांसमोर आली. वाद सांभाळण्याऱ्याजी प्रेषितांनी अ) चांगले नावलौकीक असलेले, ब) आत्म्याने भरलेले, आणि क) ज्ञानाने भरलेले लोक निवडण्याविषयी विनंती केली. हया विषयावर संपूर्ण मंडळी सहमत झाली आणि परिणाम. ''देवाच्या वचनाचा प्रसार होत गेला, यरुशलेमेत शिष्याची संख्या फार वाढत गेली.'' समोर आला.

हा शास्त्रभाग आध्यात्मिक वरदानांच्या संदर्भात सहसा वापरला जातो. आपण वाचतो की, प्रेषित स्वःमधिल वरदानांच्या प्रति, भूमिकेप्रती, अत्याधिक समर्पित होण्यास सक्षम होते. त्याऱ्याजी इतरांना तर ही संधी देण्यात येत होती. अनेक लोक हा विश्वास बाळगतात की, मंडळीच्या जिवनातील प्रत्येक कर्माला मेंढपाळाच्या काठीने मदत मिळाली. पंरतु पहिले पेत्र सांगते की, ''प्रत्येकास विशिष्ट देणगी मिळालेली आहे.'' देवाने तुम्हास विशिष्ट वरदान दिलेले

आहे आणि ख्रिस्ताच्या देहांतर्गत तुम्ही आपली भुमिका पार पाडावी हे तुम्ही कधी लक्षात घेतले काय ? पवित्र आत्म्याद्वारे स्तेफन हा निवडण्यात आला होता की, तो इतर मनुष्यामध्ये ''सेवेचा मेज'' असावा. विलक्षणरित्या हा स्तेफन होता ज्याला देवाचे ज्ञान प्राप्त होते. तो स्वातंत्र्यासाठी सभास्थानाचा द्वेष ठरला. त्यांनी त्याजवर ईश्वरनिंदेचा आरोप लाविला आणि त्याच्या विरोधात खोटे साक्षी उभे केले. त्याने ५२ वचनांचा उपदेश दिला. ज्यामुळे त्यांना ते ''झोंबले'' जेव्हा देवाचे प्रकटीकरण त्याजवर उतरले होते आणि ते सर्वांना दिसून पडले. देवाच्या स्पष्ट उपस्थितीशिवाय त्यांनी त्यांची कानं बंद केली. त्याला शहराबाहेर नेले आणि दगडमार करुन मारुन टाकले. त्याजवर जशी दगडमार सुरु होती त्याने ख्रिस्ताचे अनुकरण केले आणि विनंती केली की, हे पापा त्यांच्या कडे मोजु नको. अशा प्रकारे प्रारंभिक मंडळीचा पहिला हुतात्मा (शहीद) म्हणुन देवाने त्याचा सन्मान केला.

आध्यात्मिक विरोधामुळे चांगले फळ निष्पन्न होते, जे सामर्थ्य वाढविते, आपली आध्यात्मिक मुळ मजबुत करतात.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण पाच : अध्याय ८-९

विषयवाक्य : स्तेफनाचा मृत्यु मोठया सतावास आणि सुवार्ता प्रसारास नेतृत्व करतो.

दिवस १

वाचा प्रेषित ८ : १-८

१. स्तेफनास दगडांनी ठेचुन मारल्यानंतर वाढलेल्या सताव कार्यामुळे कोणता चांगला परिणाम समोर आला. ?

२. इतरांनी ''शोमरोन'' मध्ये जे पेरले त्यांची ''कापणी'' फिलिप कशी करित होता असे तुम्हाला वाटते. ? (बघा योहान ४:३९-४२)

३. कोणत्या हालचालींद्वारे देव तुम्हाला त्या लोकांकडे नेत आहे. जे तुमच्या आणि तुमच्या संस्कृतीपेक्षा भिन्न आहेत.?

दिवस २

वाचा प्रेषित ८ : ९-४०

१. विश्वासणाऱ्यांनी जेव्हा ते इतरत्र पांगले तेव्हा त्यांनी काय केले ?

२. काय तुम्ही आपला विश्वास सांगितला आहे आणि त्यामुळे विरोधाचा सामना केला आहे. ?

३. फिलीप्पाने स्वतःला कोठे पाहिले आणि षंढाची आध्यात्मिक अवस्था काय होती ?

४. यशया ५३ : ३-६ वाचा आणि आमचे आम्ही हया शब्दा ऐवजी आपले नाव टाका.

दिवस ३ आणि ४

वाचा प्रेषित ९ : १-१९, २२: १-१६; २६:९-१९

१. पौलाच्या परिवर्तना विषयी हया भागात तुम्ही काय बघता ?

अ. प्रकाश

ब. वाणी

क. ख्रिस्ताचे शब्द

ड. पौलाचा आज्ञाधारकपणा

२. कारण आता तुम्ही ख्रिस्ताला जाणता म्हणुन तुमच्यातील तुमची कोणती बुद्धीमत्ता किंवा कळकळ गमाविली आहे ?

३. हनन्याचे पाचारण आणि त्याचा त्यास प्रतिसाद हयावरुन तुम्ही कोणता धडा घेता ?

दिवस ५

वाचा प्रेषित ९ : २०-३१ आणि गलतीकरास १ : ११-२४

१. दमिष्कास सोडल्यानंतर पौल कोठे गेला आणि किती दिवासाकरीता ?

२. शौलाकरीता देवाच्या सेवेविषयी जाणण्यास बघा प्रेषित ९:१५, रोमकरांस १ : ५ आणि गलतिकरांस १:१६.

३. पौलाची मदत पुरविण्यास बर्नबाने कोणती जोखीम आणि त्याग स्विकारला ?

४. यरुशमेलेतील आपल्या पहिल्या वास्तव्यास पौलासोबत काय झाले ?

५. वाढत्या मंडळीसाठी कोणती गुणं लाभली ?

६. आपल्या स्वतःच्या जीवनाकरीता कया आठवडयात तुम्ही वाढीची कोणती गुणवैशिष्टये केंद्रित करु इच्छिता ?

दिवस ६

प्रकरण ५ "पांगा पांग"

पाठ : अध्याय ८-९

मुख्यवचन : प्रेषित ८:४ "तेव्हा त्यांची पांगापांग झाली होती ते वचनांची सुवार्ता सांगत चहुकडे फिरले."

विषयवाक्य : स्तेफनाचा मृत्यु मोठया सतावास आणि सुवार्ता प्रसारास नेतृत्व करतो.

जीवनतत्त्व : सतावामध्ये देखिलदेव आमच्या आज्ञा धारकपणास बंद अंतकरणांना उघडण्यास उपयोगी आणु शकतो.

सारांश : त्या समयी कदाचित हे समजने कठिन झाले असावे. परंतु स्तेफनाच्या मृत्युसमयी देवाचे गौरव आणि हेतू प्रकट होता. त्यामुळे सतावाची एक लाट उसळली ज्यामुळे ख्रिस्तीलोंकाची यरुशलेमेच्या बाहेर यहुदिया आणि शोमरोन आणि जगाच्या शेवटापर्यंत (प्रे. कृत्य १:८) ख्रिस्ताचे साक्षीदार होण्याकरीता पांगापांग झाली. असे म्हटले जाते की, संतांचा मृत्यु हे मंडळीचे बीज होय. इतिहास हया गोष्टीचा पुरावा देते की, जेथे कोठे विश्वासयोग्य पुरुष आणि स्त्रिया आपल्या विश्वासाकरीता मरन पावलीत तेथे मंडळी वाढली. आपण प्रार्थना करु या की, देव आपल्या विश्वास वाढवील जेणे करुन आपण त्याजवर विश्वास करावा की, तो आम्हाला काळोख्यातुन उजेडकउे आणण्यास समक्ष आहे.

जरी तो त्या समयी हे जाणुन नव्हता तरीही परुशी शौल जगात सुवार्ताप्रसार कार्या करीता एक मोठे साधन होते. तो सर्व सहमतीने हिंसेने स्तेफनाचे जीवन संपविण्याचा एक साक्षीदार होता. खरे तर त्याने मारणाऱ्यांचे कपडे सांभाळून ठेवले होते आणि त्याने स्तेफनाच्या शेवटच्या शब्दांना जो तो मारेकऱ्यांविषयी क्षमेचे बोलत होता. जसे ख्रिस्ताने उच्चारिले ऐकु शकत होता. जेव्हा स्तेफनाला मारण्यात आले त्यानंतर जिद्दिने शौल संपूर्ण यरुशलेमेत ख्रिस्ती जनांना छळण्यास निघाला. येशुने त्यांना स्पष्ट सांगितले होते की, त्यांनी सर्वत्र सुवार्ता प्रसार करावी. परंतू त्या करीता विलंब झाला आणि एक छोटीशी चितावणी तसे करण्याकरीता झाली. खरेतर

पेन्टेकॉस्टपासुन प्रेषित १५ पर्यत २० वर्षाचा कालावधी मंडळीला लागला हे ठरविण्यासाठी की कोणालाही ख्रिस्ती बनण्यासाठी यहुदी होण्याची गरज नाही. जोपर्यंत पौलाने इफिस २ : ११-२२ लिहिले त्याला हे प्रकट झाले होते. आम्ही देवापासून किती दुर होतो. तरी सुध्दा ख्रिस्तामध्ये आपण त्याचे मंदिर होण्याकरीता जेथे देवाचा आत्मा वसतो असे निवासस्थान होण्याकरीता जुळले आहोत! हा यहुदयांच्या मनातील अत:करणातील आणि व्यवस्थेतिल मोठा बदल होता.

आपण अध्याय ८ मध्ये प्रेषित फिलिप्प द्वारे हे रहस्य उलगडतांना बघतो स्तेफनाच्या मृत्यु नंतर तो शोमरोन प्रांतात गेला. जे अशुध्द वैऱ्यांचे घर गणल्या गेले यरुशलेमेतील यहुदी पुढाऱ्यासमान शोमरोनकरांनी सुवार्ता संदेश मिळविला आणि देवाने त्यांच्या मधिल आपले कार्य चिन्ह आणि चमत्कारांनी स्थापित केले. पेत्र आणि योहान त्यानंतर फिलिप्पसोबत जुळतात आणि प्रार्थना करतात की, त्यांनी पवित्र आत्मा मिळवावा. निश्चित जेव्हा जेव्हा ख्रिस्ताचा संदेश वाटल्या गेला, बी चांगल्या व वाईट मातीवर पडले. शिमोन जादुगर वाईट माती होती. त्याला ख्रिस्ताच्या संदेशाचे कुतूहूल निर्माण झाले होते. परंतु पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यांने घडलेलया कार्यामध्ये तो अधिक हित राखून होता आणि ते तो विकत घेऊ इच्छित होता. पेत्र आणि योहानाने शिमोनास दुरुस्त केले. कारण जरी येशुवर विश वास ठेवला होता आणि त्याच्या नावाने बपतिस्मा घेतला होता. तरीही शिमोनाने शक्ती मिळविण्याकरीता आणि द्वेषापासुन प्रायचित्त केले नव्हते. पुन्हा देवाचा आत्मा फिलिप्पाला अविश्वासी जगाकडे सुवार्ता सांगण्यास घेऊन जातो. तो फिलिप्पा सोबत बोलला आणि त्याला ओसाड वाटेवरुन यरुशमेलेपासुन गज्जाकउे जाण्यास सांगीतले. जेथे त्याला कुशीषंढ वाटेत भेटला जो यशयाचे पुस्तक वाचत होता. फिलिप्पने त्यास शास्त्रातुन येशुविषयी स्पष्ट केले त्या मानवाने विश्वास केला आणि बप्तिस्मा घेतला.

अध्याय ९ मध्ये परत शौलाद्वारे सतावाची माहिती आहे त्याने प्रमुख याजकाकडून सर्व पुरुष व स्त्री विश्वासणाऱ्यांना बंदीवासात नेण्याची परवाणगी मागितली. दमिष्काच्या वाटेवर ख्रिस्त स्वत: शौलास अडवतो आणि म्हणतो, " शौला शौला माझा छळ का करीतोस ?" प्रामाणिकतेने शौल त्याला उत्तरतो की, तु कोण आहेस ? ज्या येशुचा तु छळ करतोस आहे तो मी आहे. तर उठ व नगरात जा. म्हणजे तु काय करावयाचे हे तुला सांगण्यात येईल. शौलाने आज्ञेचे

पालन केले आणि उठून दमिष्क नगरात गेला जेथे देवाने आपला दास हनन्यास नेमले होते की, त्याने हात ठेऊन त्याच्या आरोगयासाठी प्रार्थना करावी. हनन्या इच्छुक नव्हता कारण शौलाचे काम तो ऐकुन होता परंतू प्रभूने त्यास खात्री पटविली की, विधर्मी जनांकडे सुवार्ता पोहचविण्यासाठी देवाचे तो निवडलेला पात्र आहे. हनन्याद्वारे शौलाला परत दृष्टी प्राप्त झाली आणि नंतर काही दिवस त्याने शिष्यांसोबत घालवीले नंतर सभास्थानात जाऊन तो येशूची सुवार्ता गाजवु लागला. शास्त्र भाग सांगते की, शौलाने येशू हाच ख्रिस्त आहे हे सिद्ध केले.

यहुदी सौम्य झाले नाही. शौलाबद्दल देखील त्यांनी त्यास मारुन टाकण्याची योजना आखली परंतू शौलाने ते जाणून पाटितुन गावकुसावरुन पळ काढला. तो यरुशलेमेत आला. जेथे त्यांने शिष्यासोबत मिळण्यांचा प्रयत्न केला. परंतू ते देखिल त्यांचे भय धरुन होते. बर्नबा जो उत्साहित करणारा होता त्याने शौलास घेतले आणि पाठराखण करीत जोपर्यंत बंधुजणांनी त्याचा स्विकार केला नाही. त्यास आपल्या सोबत ठेवले. अनेकदा विरोध आपणास नव्या द्वारातुन जाण्यास भाग पाडेल. विरोध प्रभूसोबत नवी चाल चालण्यास भाग पाडेल. परंतू तरीही आपण एकटे नाही. आपल्या सोबत उत्तम सहाय्यक असणार जो कधिही एकटे सोडणार नाही. (योहान १४:१५-२१) शौल. नंतर पौल नावाने जे रोमी नाव होते त्या नावाने तो ओळखला जाऊ लागला. पौलाचा पालट आणि त्याच्या कार्याची सुरुवात हया मध्ये बऱ्याच वर्षाचे अंतर होते. त्याचे पुर्णपणे वैचारीक, जीवन हेतुचे, कार्याचे, सभोवतालचे, मित्रांचे, ख्रिस्ताच्या सेवकांद्वारे असणारी वागणूक हयांचे परिवर्तन झाले. गलतीकरांस १:१७ सांगते की, तो देवासह ओसाड भागात गेला. आमच्या समानचं पौलास विशेष पाचारण प्राप्त होते आणि कठिण समयातील पाचारणाच्या तैयारीसाठी म्हणजे विधर्मी जनांसाठी प्रेषित म्हणून त्यास देवासह एकांतात वेळ घालवावयाचा होता.

सतावांत देखील देव आमच्या आज्ञाधारकपणाला बंद अंतःकरणे उघडण्यास उपयोगी आणेल.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण ६ : अध्याय ९-११

विषय वाक्य : विधर्मी मंडळीला उपदेशाद्वारे पेत्र अडखळणांना मोडून काढतो.

दिवस १

वाचा प्रेषित ९ : ३२-४३

१. हया वचनांमध्ये देवाने पेत्राला कसे उपयोगात आणिले ?

२. यापोमध्ये पेत्र कोणासोबत राहिला ?

दिवस २

वाचा प्रेषित १० : १-८

१. जेव्हा त्यास दर्शन प्राप्त झाले त्यावेळी कर्नेल्य काय करीत होता ?

२. हया वचनामंध्ये कर्नेल्याचे वर्णन कसे केले आहे ?

३. तुमचे कुटुंब किंवा मित्र तुमचे कसे वर्णन करतात ?

दिवस ३

वाचा प्रेषित १० : ९-१८, लेविय १७ : १०-१४, लेविय ११

१. हया शास्त्रभागत कोणती वचने सारखी आली आहेत ?

२. कोणत्या घटनेने ही व्यवस्था बदलली ?

३. आज देव आमच्या सोबत कसे बोलतो ?

४. देवाने पेत्राला काय करण्यास सांगितले. जे एक यहुदी म्हणुन त्याज करीता सोपे नव्हते ?

५. कोणती वचने आहेत जे पेत्राला कसे मार्गदर्शन मिळाले हे समजण्याकरीता आम्हास मदत पुरवितात. ?

६. कोणती वचने आहेत जे दर्शवितात की, देव सर्व राष्ट्रातील लोकांना आपल्या कुटुंबाचे बनवितात ?

दिवस ४

वाचा प्रेषित ११ : १-१८

१. यरुशमेलेत यहुदी ख्रिस्ती लोकांद्वारे पेत्रावर कोणती टिका करण्यात आली ?

२. कितीदा पेत्र पवित्र आत्माचा उल्लेख करतो ?

३. पेत्राच्या श्रोत्यांनी जेव्हा त्याने विधर्मी जनासोबत बसून जेवनकेले हयाचे वर्णन केले तेव्हा कसा प्रतिसाद दिला ?

४. जेव्हा आपन टिकेचा सामना करतो तेव्हा पेत्रापासुन आपन काय शिकतो ?

५. याकोब २ : १ काय सांगते तेव्हा आपले अत:करण इतरांपेक्षा भिन्न असते ?

६. न्यायीपणाचे अत:करण किंवा जे पक्षपाती आहे ते बदलू शकते ? आज थोडा वेळ प्रार्थनेसाठी काढा की, देव तुमचे अत:करण बदलेल.

दिवस ५

प्रेषित ११ : १९-२६

१. अंत्युखिया येथिल मंडळीची सुरुवात कशी झाली ?

२. यरुशलेम येथील मंडळीने बर्नबाला अत्युंखिया येथे का पाढविले ?

३. अंत्युखिया मध्ये ते किती वेळ थांबते ?

४. अंत्युखियाला बर्नबाने कोणाला आणले ?

५. अंत्यु येथील विश्वासणाऱ्यांना कोणते नवे नाव देण्यात आले ?

६. अनुवाद १३ : १-५ आणि अनुवाद १८:२०-२२ नुसार आपण खरे व खोटे संदेष्टे मधिल अंतर कसे जाणून घेतो ?

दिवस ६

प्रकरण ६ : "विधर्मी जनांकरिता कृपा"

पाठ : अध्याय ९ : ३२-४३ आणि १०-११

मुख्यवचन : प्रेषित १० : ३४-३५ "देव पक्षपाती नाही हे मला पक्के ठाऊक आहे. तर प्रत्येक राष्ट्रांत जो त्याची भिती बाळगतो व त्याची कृत्ये नैतिक आहेत तो त्याला मान्य आहे."

विषयवाक्य : विधर्मी मंडळीला उपदेशाद्वारे पेत्र अडखळणांना मोडून काढतो.

जिवनतत्व : ख्रिस्ताच्या देहामध्ये एकते करीता भिन्नता ही बाजूला ठेविली जाते.

सारांश : अध्याय ९ ची समाप्ती दोन आश्चर्यकर्मांनी होते. येथील पक्षघाती, मनुष्यास बरे करणे आणि यापोमध्ये दुर्कस (टबिथा) ला मृत्युमधुन उठविले या दोन्ही आश्चर्यकर्मांना प्रतिसाद देवाची स्तुती आणि त्यास तारणाकडे वळवणारा होता अशा देवाच्या आत्म्याच्या कृत्याद्वारे सुवार्ता संदेशाला अधिक अधिकृतपणा मिळाला. परंतू ते आमच्यासाठी देखील उत्तेजनाचे कारण होय. ते आम्हास एक लहानसा इशारा देतात की देवाच्या राज्यात आमच्याकरीता काय राखुन ठेवले आहे. जेथे सर्व आजार बरे होतात, सर्व दुखने दुर होईल, सर्व अस्वस्थता सुरळीत करण्यात येईल, आणि सर्व अश्रु पुसली जातील.

अध्याय १० हा नव्या करारातील सर्वात महत्वाचा अध्याय आहे. देवाने कर्नेल्यास केलेली तैयारी आणि पेत्राचे दर्शन हया द्वारे यहुदी व विधर्मी हयांच्या करीता दिर्घकालीन विभाजनाची अडखळणे मांडण्यात आली आणि कृपेचा सुवार्ता विधर्मा विश्वासाठी सहज आणि पूर्णपणे उपलब्ध करण्यात आली. अध्याय १० च्या सुरुवातीस आम्हास कर्नेल्याचा परिचय होता जो कैसरिया येथे राहत होता. व शतधिपती यहुदिया मध्ये रोमी शासनाच्या जागेवर होता. कर्नेल्या यहुदया मध्ये वावरुन होता. ज्याला ठाऊक होते की, यहुदयाचा देव हाच खरा देव आहे. खरेतर देव त्याचे अत:करण अधिक सत्य मिळविण्यास तैयार करीत होता. देवाचा एक दूत याला स्वप्नात येऊन पैत्राला दर्शन दिले आणि भेट "शब्द" दिला. जो जुन्या करारातील व्यवस्थेनुसार "अशुद्धता" विषयी होता. (लेवीय ११) देवाने पेत्राजवळ सांगितले की, त्या अशुध्द प्रथा आता

मुळीच आवश्यक नव्हत्या. परिस्थिती द्वारे देवात्या शब्दाची खात्री पटविण्यात आली. पेत्र आपल्या दर्शनावर विचार करीत होता की, कर्नेल्याचा सेवक त्याला कैसरिया येथे कर्नेल्याकडे नेण्याकरीता उभा राहीला. विधर्मी जनासोबत होऊन जाने म्हणजे पेत्र आपल्या नितीमान यहुदी प्रतिष्ठेत जोखीम मध्ये टाकत होता. त्याने त्याचे पालन केले. कारण, त्याला ठाऊक होते की, देव त्याचे मार्गदर्शन करीत आहे. तो आपल्या सोबत सहा यहुदी ख्रिस्तीजणांना घेऊन गेला. (प्रे. कृत्ये १२ : २३ आणि ११:१२) येशुच्या जीवन, मृत्यु आणि पुनरुत्थान आणि क्षमा ज्याद्वारे सर्वांचे तारण होईल असा स्पष्ट संदेश दिल्यावर कर्नेल्यावर पवित्र आत्मा उतरला आणि त्यांच्या घराण्याने सत्य प्राप्त केले आणि जसे यहुदयांवर तसेच त्यांच्यावर पवित्र आत्मा उतरुन आला. देव एक नवे कार्य करत होता. जयामुळे पुष्कळ टिका झाली कारण त्या वेळापर्यंत विधर्मी लोक केवळ देवांची सुंता प्राप्त यहुदी बनुन दत्तक मुले अशी ठरत होती. (निर्गम १२:४३-४८) पेत्राने जे काही घडले त्याची लगेच जुळवा जुळव केली. आणि यहुदयांना शुभवर्तमान प्रसार करणे हा निर्णय मंडळीच्या सभासदांनी निश्चित केला. (प्रेषित १०:४४-४६, ११:१-३ आणि १८) प्रेषितांची कृत्ये ११ व्या अध्यायाच्या शेवटी आपण वाचतो की, शेजारच्या अधर्मी मनुष्यांनी विश्वासणाऱ्यांना "ख्रिस्ती" हे नाव पहिल्यांदा दिले. हया नावाचा अर्थ आहे "ख्रिस्ताचे"

ख्रिस्ताच्या देहात एकते करीता भिन्नता बाजूला ठेवली जाते.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण ७ : अध्याय १२

विषय वाक्य : **हेरोदाने छळांस प्रारंभ केला परंतु सुवार्ता सतत पसरत गेली.**

दिवस १

वाचा प्रेषित १२ : १-११

१. हया वेळी विश्वासी कोणत्या प्रकारचा छळ सहन करत होते ?

२. याकोब कसा मारला गेला ? (योहानाचा भाऊ)

३. प्रेषित १२:३ आणि योहान १२:४२-४३ बघा. हेरोद कोणाला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत होता?

दिवस २

वाचा प्रे. कृत्ये १२ : ५-१२

१. जेव्हा पेत्र बंदिवासात होता तेव्हा विश्वासी जन काय करीत होते ?

२. त्यांनी कशी प्रार्थना केली ?

३. प्रार्थनेच्या सामर्थ्या विषयी आपण काय शिकू शकतो ?

४. हया वचनांतून तुम्ही प्रार्थनेविषयी काय शिकू शकता ?

अ. रोम. ८:२८

ब. इफिस. ६:१८

क. कलसै.४:२

दिवस ३

वाचा प्रेषित १२ : ६-१७

१. बंदिवासात पेत्राची काय अवस्था होती ?

२. शास्त्रातून पेत्राच्या सुटकेची एकून एक माहिती सोबत गोष्ट सांगा.

३. पेत्राच्या आपल्या मित्रासोबत पुन्हा भेटण्याच्या आश्चर्यकारक किंवा असामान्यतेवर तुम्हास काय कळते ?

४. मार्क ९:२४ सोबत तुलना करा ?

५. थोडा वेळ घालवा आणि प्रार्थनेत देवाला तुमचा विश्वास वाढविण्याबद्दल सांगा.

दिवस ४

वाचा प्रेषित १२:१८-१९

१. दुसऱ्या दिवशी पहाटेस काय घडले ?

२. हेरोद अग्रिप्पाने शहर का सोडले ?

३. जेव्हा आपण देवाची कृत्ये वर्णन करु शकत नाही तेव्हा सहसा आपण त्यांस कसा प्रतिसाद देतो ?

दिवस ५

वाचा प्रेषित १२:२०-२५

१. हेरोद अग्रिप्पा हा हेरोद राजाचा नातु होता. जो येशुच्या जन्मानंतर लगेच मरण पावला. हेरोदाविषयी लोक काय ओरडत होते ?

२. जेव्हा लोकांनी हेरोदास स्तुतीचे अर्पण दिले तेव्हा देवाने काय केले ? त्याने तसे का केले ?

३. हेरोदाविषयी न्यायात तुम्ही देवाचे कोणते गुणवैशिष्टये पाहाता ?

४. मंडळी सतत कशी वाढत गेली ?

दिवस ६

प्रकरण ७ : "स्थित्यंतर"

पाठ	:	अध्याय १२
मुख्यवचन	:	१२:१ "त्या सुमारास हेरोद राजाने मंडळीतल्या काही जणांस छळावे म्हणुन त्यांच्यावर हात टाकला."
विषय वाक्य	:	हेरोदाने छळाची सुरुवात केली परंतु सुवार्ता सतत पसरत गेली.
जिवन तत्व:		सैतानाच्य योजनेपेक्षा नेहमी देवाचा हेतू श्रेष्ठ असतो.

सारांश :- प्रेषित १२ महत्वाचा आहे कारण मंडळीच्या इतिहासाचा हा जवळचा काळ दर्शवितो आणि दुसऱ्या काळाकरीता द्वार उघडतो. यरुशलेम जे यहुदयांचे शहर होते आणि माहेरच्या मंडळीचे घर होते. त्या पासून अंत्युखिया मध्ये जे विधर्मी जणांचं शहर जिथुन ज्ञान जगात सुवर्तीक पाठविण्यात आले मध्ये बदल होता. यरुशलेम आता यहुदयांचे केंद्रिय अधिकाराचे स्थान राहीले नव्हते. कारण तेथे अजुनही पारंपारिक व्यवस्थेचे पालन केले जात होते. त्यांनी सुवार्तेसाठी अडथळा निर्माण केला असता. केवळ मुख्य शहरच बदलले नाही परंतू प्रारंभिक मंडळीतले मुख्य व्यक्तित्व पेत्रापासुन पौलापर्यंत जो महान सुवार्तीक, प्रेषित आणि विधर्मी जगासाठी लेखक होता पर्यंत बदलले. हया अध्यायाची सुरुवात दु:खद प्रसगांनी होते. शांतीऱ्या अल्पसमयातील आनंद नंतर हेरोद राजाने ख्रिस्ती मंडळीला छळण्यासाठी सदस्यांना कैद केले. त्याच्या जवळ याकोबा जो योहानाचा भाऊ होता तलवारीने त्याचा वध करण्यात आले. तेव्हा त्याने पाहिले की, हे यहुदयांसाठी पसंतीचे आहे त्याने पेत्राला देखील बंदिवासात टाकले. मंडळी एक आली आणी एकमनाने पेत्रासाठी प्रार्थना केली आणी देवाने एक दुत पाढवून पेत्राला सोडवित त्याच्या प्रार्थनेत उत्तर दिले त्यानंतर हेरोद राजवस्त्रे घालुन आसनावर बसला आणि जमलेल्या लोकांपुढे भाषण करु लागला तेव्हा लोकांनी त्याला देवासमान गौरव आणि सन्मान दिला. त्याने आनंदाने लोकांची स्तुती स्विकारली तत्क्षणी प्रभुच्या दुताने त्याच्यावर प्रहार केला आणि किडे पडून मेला. चर्चेकरीता अध्याय १२ मधील घटनांची रुपरेषा बघुया

१. हेरोदने याकोबाचा खून केला.

२. पेत्र बंदिवासात टाकण्यात आला.

३. आश्चर्यकारकरीत्या पेत्र बंदिवासातून सुटतो.

४. देवाद्वारे हेरोदाचा वध

५. मंडळीची सतत वाढ

जर आपण या घटनांवर नजर फिरविली आणि देवाचा अधिकार पाहीला तर विचार करावचास बऱ्याच गोष्टी आहेत. लक्ष दया की, ज्या देवाने पेत्रास सोडविले त्यानेच याकोबाचा मृत्यु होऊ दिला आणि आपला न्याय हेरोदावर प्रकट केला. आम्हाला ठाऊक आहे की देव सदैव चांगला आहे. जरी तो आपले चांगुलपण प्रकट करण्यात याकोबास पेत्रास भिन्नता दाखवितो आणि जरी आमच्या शारीरीक इच्छेच्या ते विरुध्द आहे. आम्हाला ठाऊक आहे. की, याकोबासाठी मोठे प्रतिफळ राखलेले होते. बंधुजनांनी कोणती अपेक्षा बाळगली हयाची पर्वानकरता आम्ही जाणतो की, देव पूर्णपणे सचीत होता. देव सर्व परीस्थितीला चांगले प्राप्त करण्याच्या हेतुने चांगल्याचा भाग बनु देतो. वचन २४ मध्ये आपण वाचतो की, पण देवाच्या वचनाची वृद्धि व प्रसार होत गेला. छळा शिवाय किंवा छळा मुळे जे मंडळीवर ओढावले देवाचा गौरवी उजेड काळोख्यावर प्रभावी ठरला. हया सत्यावर आपण निश्चित होऊ शकतो जरी आपण उघडया डोळयांनी ते दिसत नाही. तरीही तो विजयी आहे.

सैतानाच्या योजनेपेक्षा देवाचे हेतू हे नेहमी मोठे असतात.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण ८ : अध्याय १३-१४

विषय वाक्य : पौल व बर्नबा हे आपल्या सुवार्ता प्रसाराच्या पहिल्या प्रवासाला निघतात, छळात अधिक शक्तीची भर मिळवून आणि अनेकांसाठी तारण मिळवून.

दिवस १

वाचा प्रेषित १३ : १-१२

१. अंत्युखिया येथील मंडळीच्या काही पुढाऱ्यांची नावे सांगा ?

२. जेव्हा देव त्याच्या सोबत बोलला तेव्हा ते काय करत होते ?

३. प्रवासात वगळलेले ते तीन कोण होते ?

४. पफेस येथील समस्येचे वर्णण करा ?

५. आपल्या विरोधातील शक्ती विषयी हे आम्हास काय शिकविते ?

६. येशुच्या संदेशावर कोणी विश्वास ठेवला ?

दिवस २

प्रेषित १३ : १३-४१

१. संघ सोडून आपल्या घरी कोण परतला ?

२. देवाचे लोक आणि त्यांच्या बद्दल त्याचे चांगुलपणा हया आपल्या भाषणात पौलाने काय म्हटले?

३. त्यांच्या परोपकारी पणावर तो काय म्हणाला ?

४. मसिहा करीता तैयारीवर तो काय म्हणला ?

५. जे त्याच्या संदेशाचा नकार करतील त्यांना त्यांने कोणती ताकीद दिली ?

६. हया उपदेशांनी तुमच्यासाठी महत्वाचे काय वाटते ?

दिवस ३

प्रेषित १३ : ४२-५२

१. नंतरच्या शब्बाथ दिवशी कोणता प्रतिसाद मिळाला ?

२. पौल व बर्नबा विरुध्द कोणाची चेतना जागृत झाली ?

३. शहराबाहेर घालविण्यावर त्यांचे प्रत्युत्तर काय होते ?

४. तुमच्या जिवनातील अडखळणांवर तुमचे प्रत्युत्तर कसे असते ?

दिवस ४

वाचा प्रेषित १४ : १-७

१. इकुन्यामध्ये सुवार्ता संदेशावर कोणी प्रत्युत्तर दिले ?

२. पौल व बर्णबाच्या हयाच्या भाषण सेवेला कोणता शब्द वर्नित करतो ?

३. इकुन्यामध्ये पौल व बर्णबाच्या सेवेला परिणाम कोणते होते ?

४. त्यांनी इकुन्या शहर का सोडले ?

५. त्या नंतर ते कुठे गेले ?

दिवस ५

वाचा प्रेषित १४: ८-२८

१. जन्मापासुन लंगडया मनुष्याच्या आरोग्यावर कोणते प्रत्युत्तर होते ?

२. सत्य देवा विषयी बोलतांना पौलाने निर्मित जगा बद्दल का बोलला असावा असे वाटते ? (बघा रोम.१ : १८-३२)

३. पौलाच्या भाषणाचा दोन्ही सकारात्मक आणि नकारात्मक प्रत्युत्तर काय होते ?

४. दर्बे वरुन आलेल्या दिर्घकालीन मित्रांनी नावे तुम्ही सांगू शेतात काय ? (प्रेषित २०:४, फिलिप्पै २: १९-२१)

५. विरोधा दरम्यान देवाचे कार्य आम्हास काय प्रकट करते ?

६. पौल व सिला ने नविन विश्वासना-यांना कसे मजबूत केले असे तुम्हास वाटते ?

७. हया आठवडयात कोणाला तरी तुम्ही विश्वासात मजबुत करुन उत्साहीत करणार ?

दिवस ६

प्रकरण ८ : "पौलाची पहिली मिशनरी यात्रा"

पाठ	: अध्याय १३-१४
मुख्यवचन	: प्रेषित १३ : ४७, "मी तुला परराष्ट्रीयांचा प्रकाश करुन ठेवले आहे. हयासाठी की, पृथ्वीच्या दिगंतापर्यंत तु तारण व्हावेंस."
विषय वाक्य	: पौल व बर्नबा आपल्या पहिल्या मिशनरी प्रवासावर निघतात. ज्यामुळे छळात भर पडले आणि अनेकांना तारण.
जिवन तत्व	: देवाला व त्याच्या पुत्राला नाकारणे हयाचा सार्वकालीक परिणाम पडले.

सारांश : प्रेषित १२ मध्ये आश्चर्यकारकरित्या सुटकेनंतर पेत्र दृश्यातून निघून जातो आणि पौल एक सुवार्तीक प्रेषित म्हणुन प्रकट होतो. जो आपले लक्ष संपुर्ण प्रेषितांची कृत्ये पुस्तकात वेधून घेतो. हया विकासात बर्नबा हा महत्वाचा माध्यम ठरतो. प्रेषित ४ : ३६ मध्ये आम्ही पहिल्यांदा बर्नबा विषयी परिचय मिळतो जेव्हा त्याने आपली सर्व संपत्ती विकुन मंडळीला त्याचे दान दिले. नंतर बर्नबा होय ज्याने पौलास विषयी विनंती केली जेव्हा तो परिवर्तनानंतर पहिल्यांदा यरुशलेमेत आला. जेव्हा त्याने आपली सर्व संपत्ती विकुन मंडळीला तयाचे दान दिले. नंतर बर्नबा होय ज्याने पौलास विषयी विनंती केली जेव्हा तो परिवर्तनानंतर पहिल्यांदा यरुशलेमेत आला. जेव्हा प्रेषित त्याच्या सोबत मिळाल्यास भय धरुन होते. तेव्हा बर्नबाने स्वत:ला समजदारीने उत्साहित करणारा असे प्रमाणित केले. आणि अशा प्रमाणे पौल बंधुजनांमध्ये सहभागी झाला. अध्याय १३ मध्ये हाच बर्नबा होय ज्याला मदतीची गरज होती. आणि पौलास सेवा करण्याकरीता पुन्हा बोलाविले त्या दोघांची सेवा वर्षभरात विशेष निकाल आणणारी ठरली. बर्नबाने पौलास इतके पुढारीपणात आजचे की, त्याची स्वत:ची प्रसिध्दी मागे राहीली. देवाच्या राजयांत आपली नेमलेली जागा कदाचित इथे दिसुन पडणार नाही. परंतु बर्णबासमान कित्येक उत्साहित करणारे स्वर्गात सन्मान प्राप्त करतील. प्रेषित १३ मध्ये आपण अंत्युखिया येथिल

प्राथमिक जो सायप्रस मधुन होता आणि शौल एक उत्कंठेने भरलेला परुशी आणि मंडळीचा पुर्वीचा छळ करणारा होता. हे तरुन व वृध्द असे संघ होते. मनाएम हा बालपणापासून मांडलिक हेरोद सोबत वाढलेला होता. लुक्य हा कुरेनेकर उत्तर आफ्रिकेतून होता. शेवटी तेथे शिमोन जो निग्र म्हणून देखील ओळखला गेला होता कदाचित हा तोच होता. जो शिमोन कुरेनेकर ज्याने ख्रिस्ताचा वधस्तंभ वाहिला. (लुक २३:२६) प्रत्येक वेळी लोक श्रेष्ठ पणाची आणि अतिविशेष पणाची लढाई लढतात. परंतू देवाचे वचन आम्हाला आठवन करुन देते की, विश्वासणाऱ्यांनी आपली भिन्नता बाजूला ठेवून ख्रिस्तामध्ये एकता शोधावी. कलस्सै ३ :११ सांगते, ''हयांना हेल्लेनी व यहुदीसुंता झालेला व न झालेला बर्बर व स्कुथी दास व स्वतंत्र हा भेदच नाही. तर ख्रिस्त सर्व काही आणि सर्वात आहे.'' भिन्नते खेरिज प्रारंभिक मंडळी एकतेतच नव्हती परंतू ते विश्वासूपणे आज्ञाधारक होत. वचन २ सांगते की, ते उपास आणि प्रार्थनेत होते जेव्हा पवित्र आत्म्याने त्यांना बर्नबा व पौलास पाठविण्याविषयी निर्देश दिला. जे येशुच्या शेवटच्या शब्दाची की, सर्व जगाला जाऊन सुवार्ता सांगण्याविषयीची पुर्तता होती. जर तुम्ही अशा भागात राहीले आहांत जे तुमचे घर नाही तेव्हा तुम्ही पौल व बर्नबा सोबत परिचायचे ठरणार अनेक ख्रिस्ती लोक आपली संस्कृती सोडून आणि भाषेचा संघर्ष आणिर भिन्नते सोबत अपरिचीत देशात राहतात. कधि कधि ते स्विकारीले जातात. परंतू दुसऱ्यावेळी नाकारले जातात. पौल आणि सिलाने आपल्या पहिल्या मिशनरी प्रवासांत अनेक आज असे वाहलेले होते. त्याच्या गोष्टी आम्हाला उत्तेजीत करतात. जसे आम्हाला देवाच्या उपस्थितीची आणि सामर्थ्यांची जाणिव होते त्याच्या विषयी जे त्याच्या पुत्राविषयी सुवार्तीची घोषणा करतात.

पफे स - (प्रेषित. १३:४-१४) पौल व बर्नबा योहान मार्क सोबत घेऊन सलमींनात सभास्थानात बोलेले त्यानंतर पफेसच्या संपुर्ण बेटावरुन फिरले जिथे त्यांना अलिम जादुगर भेटला. त्याने त्याच्या देवाच्या शब्दावर वाद घातला आणि सुभेदाराला विश्वासापासून फितविण्याचा प्रयत्न केला. परंतु शौल (आता जो पौल, त्याचे रोमन नावाने ओळखला जातो.) त्याच्या विरोधात बोलला. ''अरे सर्व कपटाने व सर्व लुच्चेगिरीने भरलेल्या सैतानाच्या पोरा अवघ्या निमित्त्वाच्या वैऱ्या तु प्रभुचे सरळ मार्ग विपरीत करण्याचे सोडून देणार नाहीस काय? '' खोटा संदेष्टा

आंधळा झाला आणि सुभेदारानी विश्वास केला. (कृपया भविष्या करीता चिन्हांकित करा की योहान मार्क पौल बर्नबाला सोडून जातो आणि आपल्या पहिल्या ठरावानंतर परत यरुशलेमेस वापस जातो.)

इकु न्या - (प्रेषित. १३:५१-१४:५) ८५ मैल उंच पिसिदीयन अंत्युखिया ते पेर्गा डोंगरमाथ्यावर चढुन ते दक्षिण गालतीयात पोहचले. अंशत: वाळवंट भाग इकुन्य (आज तुर्केस्थान) हे एक सुंदर शहर होते. जे उत्पन्न देणाऱ्या शेती व बागांच्या मधात होते. ते पुन्हा यहुदी आणि हेल्लेनी हयांना सभास्थानात वचन शिकवू लागले. ते धाडसाने बोलले आणि प्रभुने चिन्ह आणि चमत्काराने त्यांना आशिर्वादित केले. परंतु नगरातील लोक समुदायात फुट पडली आणि यहुदयांनी चुकीच्या वागणुकीची बाजू धरली म्हणुन ते लुस्त्रकडे पळून गेले.

लुस्त्र - (प्रेषित. १४ : ६-२०) लुस्त्र हा मुर्तीपुजक भाग होता. जेथे कदाचित सभास्थान नव्हते लंगडया मनुष्यास बरे केल्यानंतर पौल आणि बर्नबा हे देव माणसाच्या रुपाने असे गैर समजण्यात आले आणि म्हणून लोकांनी त्यांच्या साठी अर्पण घेऊन आले. अतिशय काळजी प्रकट करीत पौलाने त्याच्या भक्तीचा सामना (नकार) केला. आणि सत्य देवाविषयी जो सर्व सृष्ट वस्तुचा निर्माता आहे विषयी सांगीतले आणि सत्य त्यांना सांगून देखिल प्रेषितांना त्यांना खोटी भक्त्ी करण्यापासून राखुन ठेवण्यात त्यांना अपयश आले. हया नंतर काही यहुरी अंत्यखिया वरुन आले आणि त्यांनी लोकांची मने वळविली आणि पौलला दगडमार करुन शहराबाहेर ओढुन टाकुन दिले. पण त्याच्या भोवती शिष्य जमल्यावर तो उठला वनगरात निघुन आला. ! दुसऱ्या दिवशी बर्नबा बरोबर तो दर्बेस गेला.

दर्बे - (प्रेषित. १४:२१) शास्त्र भाग सांगते की, पौल व बर्नबाने दर्बेत केवळ एकच दिवस घालवला. परंतू जेव्हा त्यांची सुवार्ता प्रचार केली त्यामुळे "पुष्कळ शिष्य" बनले.

सिरिया येथील अंत्युखियामध्ये परतणे - (प्रेषित १४ : २१-२८) जरी त्याच्यासाठी घरी परतल्यावर मार्ग धोकादायी आणि गैरसोयीचा होता तरी त्यांनी सोपा मार्ग निवडला नाही. पौल आणि बर्नबाने ममतेने आपल्या मेंढरांची (नवे विश्वासी) काळजी घेतली अंत्युखियाला परतनेतांना त्यांना बघण्यास थांबले.लुस्त्र आणि इकुन्य पासून सुरु करुन पौलाने त्यांच्यासाठी मेंढपाळ नेमले आणि त्यांना प्रभूच्या हाती सोपवून दिले. पौलानुसार फिलिप्पैकरांस त्याच्या पत्रात

त्याने नव्या विश्वासणाऱ्यांना ख्रिस्तास सोपवून दिले आणि उत्तम मेंढपाळ त्यांना आपल्या जवळ राखीव मग कोणतीही परिस्थिती का असो ना ? ज्याने तुमच्या ठायी चांगले काम आरंभितो ते येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत सिध्दीस नेईल हा मला भरवसा आहे. (फिलिप्पै १ : ६)

थेस्सलनी करांस २ : ७-८ आपण पौलाचे परावर्तीत लोकांकरीता आई समान अंतःकरण बघतो. पौल व बर्नबा २ वर्षापासुन दुर होते. त्यांनी देवानी सोपविलेले कार्य पूर्ण केले. होते. पुन्हा अंत्युखियात त्यांनी आपले गौरबी शोधाशोध आपला रिपोर्ट म्हणुन सादर केला. त्यांनी सांगितले की, देवाने कसे कार्य केले जेणे करुन अनेक शहरांपर्यत शुभवर्तमान गेले आणि मग आपल्या शारिरीक व अध्यात्मिक विश्वातील वेळेमध्ये प्रवेश केला.

देवाचा आणि त्याच्या पुत्राचा इंकार करणे सर्वकालीक परिणाम घडवून आणतो.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण ९ : अध्याय १५

विषय वाक्य : **हेल्लेणी व्यवस्थेच्या बंधणात येतात काय ह्यावर मंडळी वाद करते आणि पौल व बर्नबा ज्याला मार्क ही म्हणत त्या योहानावर वाद करतात.**

दिवस १

वाचा प्रेषित १५ : १-३

१. यहुदिया मध्ये यहुदयांपासून कोणती असहमती आली हेल्लेणी लोकांच्या विश्वासामुळे ?

२. यहुदियावरुन आलेल्या यहुदयांसाबेत पौल व बर्नबा सहमत झाले की, असहमत ?

३. पौल व बर्नबा सोबत यरुशलेमेस कोण गेले ?

दिवस २

वाचा प्रेषित १५ : ४-११

१. पौल व बर्नबाचे यरुशलेमेत कोणी स्वागत केले ?

२. हे यहुदी कोण होते ज्यांनी जोर दिली की, विश्वासणाऱ्यांची सुंता व्हावी ?

३. पेत्राने हेल्लेनी लोकांचा सामना करीत देव ज्यांला तो जाणतो कसे व्यक्त केले ?

४. पेत्राने एका व्यक्तीच्या तारणाबद्दल काय म्हटले ? काय त्याच प्रमाने आमचे तारण झाले आहे?

दिवस ३

वाचा प्रेषित १५ : १२-२१

१. याकोबाने हेल्लेण्यांना स्विकारण्याबद्दल काय म्हटले ?

२. त्यांच्या दिवशी कोणती भविष्यवानी पुर्ण झाली ? (बघा आमोस ९ : ११-१२, यिर्मया १२ : १५ आणि यशया ४५:२१)

३. याकोबास (जो येशुचा भाऊ होता) एक पुढारी म्हणून कसे सांगणार ?

४. असहमतीला सोडविण्याकरीता कोणते समापन याकोबाने सुचविले ?

दिवस ४

वाचा प्रेषित १५ : २२-३५

१. अंत्युखियाला जाण्याकरीता निवडलेल्या लोकांच्या नावाची यादीतील नावे सांगा ?

२. ते कोणत्या प्रकारचे लोक होते ?

३. हया पत्राचे अंत्युखिया मंडळीत कोणते परिणाम झाले ?

४. नव्या विश्वासणाऱ्यांसाठी संवेदनशिल होण्याकरीता धडा सांगा जो तुम्ही उपयोगात आणू शकता ?

५. अंत्युखियामध्ये विश्वासणाऱ्यांची सेवा करिण्यासाठी यरुशलेमपासून मार्गाची नावे तुम्ही सांगू शकता काय ?

दिवस ५

वाचा प्रेषित १५ : ३६-४०

१. दुसऱ्या एका मिशनरी प्रवासावर जाण्याची पौलाची इच्छा होती ?

२. पौल व बर्नबा मध्ये कोणत्या विषयावर असहमती होती ?

३. हया विभक्तपणाचे किंवा मित्रांच्या विभाजनाचे सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम सांगा.

४. वागणूकी साठी हयातुन तुम्हास कोणती मदत किंवा आव्हान मिळते ?

दिवस ६

प्रकरण ९ : "बंधुजनांमध्ये वाद उत्पन्न होतो." (२ रा मिशनरी प्रवास)

पाठ : अध्याय १५

मुख्यवचन : प्रेषित १५:९, "त्याने त्यांची अंतकरणे विश्वासाने शुध्द करुन त्यांच्या मध्ये व आपल्या मध्ये काही भेद ठेवला नाही."

विषय वाक्य : मंडळीत वाद चिघळतो की, हेल्लेनी व्यवस्थेच्या बंधनात येतात की, नाही आणि पौल व बर्नबा ज्याला मार्क म्हणत त्या योहाना विषयी वाद करतात.

जिवन तत्व : विश्वासीजन ज्याप्रमाणे जगतात, प्रकट करतात की ते देवा व्दारे वेगळे केलेले लोक आहेत.

सारांश :- काही मनुष्य यहुदिया वरुन आले आणि अंत्युखिया मध्ये वाद चेतविला. की, हेल्लेणी व्यवस्थेच्या पालनासाठी कटिबद्ध आहेत किंवा नाही. पौल आणि बर्नबा सोबत तिरस्कृत वादारंतर बंधुजणांनी ठरविले की, ते (पौल, बर्नबा आणि काही इतर) येरुशलेमेस जातील आणि मंडळी तेथे हा विषय व्यवस्थित करतील.. काही परुशी संप्रदायाचे विश्वासी उठले आणि व्यवस्थेची बाजु मांडत होते. ते म्हणजे की, हेल्लेण्यांची सुटका झालीच पाहीजे आणि तारणासाठी व्यवस्थेचे पालन झाले पाहिजे. तेव्हा पेत्राने हेल्लेण्यांकरिता देवाने केलेल्या कामाचे समर्थन करित म्हटले, "त्याने त्यांची अंत:करणे विश्वासाने शुध्द करुन त्यांच्यामध्ये व आपल्यामध्ये काही भेद ठेवला नाही. असे असतांना जे जोखड आपले पुर्वज व आपणही वाहावयास समर्थ नव्हतो. ते शिष्यांच्या मानेवर घालून तुम्ही देवाची परिक्षा का पहाता ? " पौल व बर्नबाने त्यांस जोड दिली की, देवाने हेल्लेण्यांना देखिल स्वत:साठी निवडले आहे. उच्च ज्ञानात याकोबाने यशस्वी प्रस्ताव मांडला की, त्यांनी अंत्युखिया मंडळीला व्यवस्थेवरील खोटया शिकवणीला खारीज करण्याचे पत्र पाठवावे आणि त्या ऐवजी त्यांना असा निर्देश देण्यात यावा, मुर्तीचे अमंगळपण, जारकर्म, गळा दाबून मारलेले प्राणी व रक्त हयांपासून त्यांनी अलिप्त राहावे काही काळाने, पौळणे बर्नबास परत बोलविले की, आपल्या पहिल्या मिशनरी प्रवासांत

स्थापिलेल्या मंडळयाकडे परत जावे. त्या मागोमाग दोन्ही मनुष्यात वाद चिघळला, बर्नबाची इच्छा होती की त्यांनी ज्याला मार्क म्हणत त्या योहनाला सोबत घ्यावे, परंतु पौलाने ते तत्क्षणी नाकारले कारण मार्कने पंफुल्याहुन त्यांना शेवटच्या प्रवासांत सोडुन दिले होते. (प्रेषित. १३ :१३) मार्कने संघ कां सोडला त्याविषयी अधिक काही माहिती नाही. कदाचित त्याला घरची आठवण आली असावी किंवा प्रवासाच्या दगदगीने तो आजारी असावा. कदाचित पौलच्या नेतृत्वावर तो रागावला असावा आणि अशी इच्छा बाळगली असावी. की, त्याचा चुलत भाऊ बर्णबाने नेतृत्व सांभाळावे. कदाचित हे हेल्लेण्यांना मिळालेल्या हया कृपेच्या आमंत्रणाने तो अस्वस्थ झाला असावा. त्याचे सोडून जाण्याचे कोणतेही कारण कां असावे. परंतु आम्ही जाणतो की, पौलास अतिशय वाईट वाटले होते आणि त्याला फरारीपण वाटला होता. बर्णबाला इतके अति तीव्र असे वाटले की, मार्कला दुसरी संधी देण्यात यावी की, तो आणि पौल हे वेगवेगळया मार्गांनी विभक्त झाले! बर्णबाने त्याला मार्कही म्हणत त्या योहानाला सोबत घेतले आणि पौलाने सिलाला, बर्णबाने पुन्हा एकदा मार्कला आपल्या पखांखाली घेतले जसे त्याने पौलाला आपल्या सोबती, त्यावर विश्वास ठेवून आणि त्याच्यावतीने उभे राहण्यास घेतले होते. हे निश्चित आहे की, बर्णबाच्या प्रयत्नांनी विपुल फळ आणले. मार्क त्यानंतर पौलाचा संपूर्ण नवा आणि क्षमाप्राप्त सोबती आत्मा म्हणून प्रकट होतो. कलसै ४:१० आणि फिलेमोन २४ दोन्ही वचनांत पौल मार्क विषयी ''सहकारी'' असा उल्लेख देतो. तो जसे २ तिमथ्याला ४:११ मध्ये पौल म्हणतो ''तो सेवेसाठी मला उपयोगी आहे.'' होता तो पुढे मार्ककृत शुभवर्तमान देखील लिहून काढतो. देवाची कृपायुक्त मनुष्य आणि उत्साहाच्या त्याच्या करुणे बद्दल स्तुती असो!

विश्वासी जसे आपले जीवन जगतात त्यातुन ते प्रकट करतात की, देवाद्वारे ते वेगळे केलेले आहेत.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण दहा : अध्याय १६-१७

विषय वाक्य : पौल ऊहापोह करतो यहुदयांसोबत धर्मशास्त्रातून आणि ग्रिकांसोबत सृष्टीतून.

दिवस १

वाचा प्रेषित १६:१-१०

१. तिमथीच्या पृष्ठभूमीचे वर्णन करा.

२. दुसऱ्या मिशनरी प्रवासातील तीन सोबत्यांची नावे सांगा.

३. आसियाला जाण्यापासून पौलाला कोणी अडवून ठेवले?

४. पौलाविषयी देवाची बदलाची कोणती इच्छा होती आणि त्याने नव्यादिशेस कसे प्रत्युत्तर दिले?

५. जर तो निवडतो तर तर काय तुम्ही देवाला तुमची दिशा बदलू देणार?

६. वचन १० मध्ये ''आम्ही'' शब्द बघा, पौलासोबत आणखी कोणत्या प्रवाशी बद्दल ते सांगते?

दिवस २

वाचा प्रेषित १६:११-४१

१. नदी काठावर कोण पौलाची वाट पाहत उभा असतो?

२. लुदिया बद्दल आणि पौलाने आणलेल्या संदेशावर तिचे प्रत्युत्तर हया विषयी तुम्ही काय सांगणार?

३. हया लोकांसोबत झालेल्या विरोधाचे आणि त्यांच्या विजयाचे वर्णन करा?

४. तुमच्या जीवनातील विरोधामुळे प्राप्त झालेला सार्वकलिक आशीर्वादाचे वर्णन करा?

५. नगर सोडण्यापूर्वी पौलाने काय कले?

दिवस ३

वाचा प्रेषित १७:१-१५

१. थिस्सलनीका येथे पोहचल्यावर पौल कोठे गेला आणि त्याने लोकांना काय शिकविले?

२. वेगवेगळया लोकांपासुन प्राप्त अनुभवाचे वर्णन करा.

३. त्यांच्यासाठी कोणी समस्या उभी केली ? कां ?

दिवस ४

वाचा प्रेषित १७: १०-१५

१. रात्री समयी पौल व सिलाला कोणी पाठविले?

२. बिरुया लोकांचे वर्णन करणारे शब्द सांगा?

३. त्रास चितविण्यासाठी कोण आले होते?

४. बिरुयात कोण राहिले आणि कोण सोडून गेले?

दिवस ५

वाचा प्रेषित १७: १६-३४

१. जेव्हा पौल सिला व तीमथ्याची वाट अथेनेत बघत होता. तेव्हा कोणत्या गोष्टीनी तो व्यथित झाला?

२. अथेने येथील लोकांचे आणि पौलाविषयी त्यांच्या विचाराचे वचने करा?

३. त्यांच्यासाठी अज्ञात देवाविषयी असलेले वाक्य रचना आणि वचने सांगा?

४. देव सर्व सृष्ट वस्तुत नव्हे परंतू त्याने ते सर्व निर्माण केले आहे हे सांगणारे वाक्य व वचने सांगा.

५. देव आपल्या निर्मितीपासून लांब नाही. परंतु प्रत्येक व्यक्तीच्या जवळ राहतो हे सांगणारे वाक्य व वचने सांगा.

६. देव संपूर्ण विश्वाला नियंत्रणात राखतो हे सांगणारे वाक्य रचना व वचने सांगा.

७. देवाने भौगोलिक सीमारेषा आणि ऐतिकासिक घडामोडी नेमलेल्या आहेत हे सांगणारे वाक्य रचना आणि वचने सांगा.

८. देवाची कधिही मुर्ती किंवा प्रतिमाद्वारे आराधना होऊ शकत नाही हे सांगणारे वाक्य व वचने सांगा.

९. देव जगाचा न्याय करील हे सांगणारे वाक्य व वचने सांगा.

१०.देव पाप्यांना पश्चातापाची आज्ञा देतो हे सांगणारे वाक्य व वचने सांगा.

११.वरील पैकी कोणते उत्तर तुम्हाला महत्वाचे वाटते?

दिवस ६

प्रकरण १० : "सर्व काही सर्व मनुष्यासाठी" (२ मिशनरी प्रवास पुढे सुरु)

पाठ : अध्याय १६-१७

मुख्य वचन : १ करिंथ ९:२२-२३, "मी सर्वांना सर्व काही झाली आहे, अशा हेतूने किमी सर्व प्रकारे कित्येकांचे तारण साधावे, मी सर्व काही सुवार्तेकरिता करितो अशासाठी की, मी इतरांबरोबर तिचा भागीदार व्हावे.

विषय वाक्य : पौल ऊहापोह करतो यहुदयांसोबत धर्मशास्त्रातून आणि ग्रीकां सोबत सृष्टीतून.

जीवन तत्व : स्तुती द्वारे पिच्छा पुरविण्यास सामर्थ्य मिळते.

सारांश : प्रेषितांची कृत्ये १६: १-३ नुसार पौलाच्या लुस्त्र मधिल वेळेतून एक चांगली गोष्ट समोर आली. येथे एका ग्रीक कुटूंबात पौल तिमथ्याला भेटतो. तो त्या भागात नावाजलेला होता. त्याची आजी लुईस आपल्या मजबूत विश्वासाबद्दल प्रसिद्ध होती आणि तोच विश्वास तिने आपल्या नातूला, तिमथ्याला वाहिला होता. हे किती उत्साहवर्धक आम्हाला आठवण करुन देतो की, वृध्द स्त्रियां तरुणांना मोठे प्रभावी करु शकतात. देवाच्या राज्याकरिता कोणी आहे काय ज्यांना तुम्ही उत्साहित करित आहांत? तिमथी पौलासोबत जाण्यास तैयार होता. म्हणून त्याची करण्यात आली (त्याचे वडील यहूदी हेल्लेणी होते.) आणि यरुशलेम मंडळीने दिलेल्या मर्यादित त्याने पौलासोबत पालन केले. आत्मा कडून त्यांना आशिया आणि बिथुनियास जाण्यापासून प्रतिबंध झाला म्हणुन ते त्रोवस येथे थांबले तेथे पौलास "मासेदोनिया जाण्यास पाचारण झाला म्हणून लगेच ते बोटीने निघाले. समथ्राकेस व नियापुलिस जातांना ते फिलिप्पैस आले आणि तेथे अनेक दिवस घालविले. तेथे जशी प्रथा होती, त्यांनी येशू विषयी सांगण्याकरिता सभास्थान

शोधले. जेव्हा सभास्थान भेटले नाही. तेव्हा ते शहराच्या प्रवेश द्वारा बाहेर गेले जेथे त्यांना नदिकाठावर काही स्त्रीया प्रार्थना करतांना आढळल्या तेथे ते लुदिया ला भेटले, ती जांभळी वस्त्रे विकणारी एक यशस्वी व्यापारी स्त्री होती (व. १६) प्रे.कृ. १६:१४ सांगतो.

"तिचे अंत:करण प्रभूने असे प्रफुल्लित केले की, पौलाच्या सांगण्याकडे तिने लक्ष दिले." त्या सामान्यांत लुदियाच्या जीवनाची दिशा प्रभूने बदलून दिली जसे पौलाच्या दमिष्क वाटेवर पालट झाला. देवाने तिच्या जीवनाचा उपयोग फिलिप्पै येथिल मंडळीला उभारण्यासाठी केला आणि संपूर्ण युरोपभर सुवार्तेसाठी द्वार उघडले. काय तुम्ही देखील लुदीयासमान सत्याविषयी भुकेलेले आहांत?

प्रार्थनेच्या स्थळाकडे जात असतांना कोणी एक मुलगी आढळली तिच्या अंगात येत असे तिचा उपयोग नफा मिळविण्याकरीता करण्यात आला. तिच्यातील आत्मा पौलामागे येऊन मोठयाने म्हणाला, "हे लोक परात्पर देवाचे दास आहेत, हे तुम्हाला तारणाचा मार्ग कळवितात." सहसा नेहमी जसे येशुने केले पौलाने त्या पिशाचाला शांत केले आणि त्या मुलीला सोडून जाण्याची आज्ञा केली. आम्हांस ताकीद मिळते आणि स्मरण करुन मिळते की जेव्हा आपण कोणतही सेवा हाती घेतो. तेव्हा सैतान हा क्रियाशिल बनतो आणि आपल्या विराधांत कार्य करतो. गुढपणा देवाने वर्जित केला आहे. लेवीय २०:२७ आध्यात्मिक शक्तिंना खारीज करते. हा आंधळेपणा आम्हाला शेवटच्या अंधकाराविषयी सांगते जे जाणून देवाला आज्ञाधारक नसणार आणि जादुटोण्यांत स्वत:ला डुबून देतील.

उत्पन्नाचे साधन गमविल्यानंतर त्या मुलीचे धनी फार रागावले आणि पौल व त्याच्या सोबत्यांना त्यांनी अधिकाऱ्यांसमोर उभे केले आणि त्यांच्यावर नियमभंग करुन त्रास देण्याचा आरोप लावला तेव्हा लोक त्यांच्यावर उठले, त्यांना छडीने मारण्यात आले आणि बंदिशाळेत टाकण्यात आले. जेव्हा पौल व सिला आतल्या बंदिखान्यात मध्यरात्रीच्या सुमारस गीत गाऊन देवाची स्तुती करित असता एका मोठया भूकंपाने बंदिशाळेचे पाये डगमगले, सर्व दरवाजे लागतेच उघडले व सर्वांची बंधने तुटली. बंदिवान पळुन गेले आहेत असा तर्क करुन बंदिशाळेच्या नायकाने स्वत:वर तलवार उपसून घात करणार होता. परंतु पौल मोठयाने ओरडुन सर्वजन तेथेच असण्याची खात्री

दिली. नायक तेथेच पौल व सिलाच्या पाया पडुन त्यांना म्हणाला. " माझे तारण व्हावे म्हणून मला काय केले पाहिजे ?" रात्रीच्या त्याच घटकेस त्याने पौल व सिलास आपल्या घरी ने आणि त्यांच्या जखमा धुतल्या, त्यांना सोडुन देण्यात यावे. परंतु पौलाने शांतपणे जाण्यास नकार दिला त्याने रोमन माणसांना अपराधी ठरविल्यावाचून उघडपणे फटके मारुन बंदिशाळेत टाकलयामुळे अधिकाऱ्यांना क्षमा मागण्यासाठी मागणी केली. मुख्य न्यायाधिशाने जेव्हा ऐकले कि, ते रोमन माणसे आहेत तेव्हा तो भयभित झाला. ते त्या मनुष्याजवळ आले आणि नगरातुन निघुन जाण्याची विनंती केली.

पौल व सिला त्यानंतर तिथून निघुन लुदियेच्या घरी जेथे ते उत्साहित झाले होते आले थेस्सलनीका येथे, तो उपदेश देण्यास सभास्थानांत गेला आणि अहावोह केला. काही त्यामागे लागले तर काही यहुदी व्देषाने भरले आणि त्यांच्या विरुध्द जमाव उभा केला, म्हणून ते थेस्सलनीका सोडुन गेले आणि बिरुया येथे पुन्हा यहुदयांच्या सभास्थानांत गेले. बिरुयेकरांनी पौलातर्फे देवाचा शब्द मिळविला आणि स्वत:शास्त्रातून त्यांनी ते तपासले.

पुन्हा थेस्सलनीका येथील यहुदयांनी बिरुया येथिल पौलाच्या सेवेविषयी ऐकले म्हणून ते तेथेसुद्धा आले आणि जमावाने तिथून देखिल त्यांना चेताविले. तिथून निघून पौल अथैने शहरात गेला जेथे हेल्लेनी श्रोते होते. ज्यांना शास्त्राविषयी थोडीफार किंवा काहीही माहिती नव्हती. तो त्यांच्य मधांत उभा राहिला आणि देवाने निर्माण केलेल्या जगाविषयी देवाचे ज्ञान गोळा करने हया विषयी बोलला. (रोम १:१९-२१) त्यांना तो बोलला," अज्ञानाच्य काळांकडे देवाने डोळे झांक केली, परंतु आता सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा अशी तो माणसांना आज्ञा करितो, त्याने असा एक दिवस नेमला आहे की, ज्या दिवशी तो आपण नेमलेल्या मनुष्या द्वारे जगाचा न्यायनिवाडा नितीमत्वाने करणार आहे त्याने त्याला मेलेल्यांतून उठवून हया विषयीचे प्रमाण सर्वांस पटवीले आहे. " काहींनी पौलावर विश्वास ठेवला व त्याच्या सोबत जुळले जेव्हा तो करिंथ कडे रवाना झाला.

अध्याय १६-१७ आपण पौलाकडुन बरेच काही शिकतो की, जेव्हा तो वेगवेगळया लोड समुदायासोबत भेटतो आणि त्यांच्यासोबत बोलतो. तो यहुदयांद्वारे विणाकारण उत्पन्न होऊ

शकणाऱ्या वादावर तिमथ्याची सुंता करतो, जरी अध्याय १५ मध्ये त्याने सुंतेवर मोठा वाद हाताळला त्याच्यासोबतच आपण त्याला वेगवेगळया प्रेक्षकांसोबत भिन्नपद्धतीने वागतांना बघतो. यहुदयांसोबत बोलतांना तो सभास्थानांत जात असे आणि त्यांना इतिहासांतिल सर्व मागील गोष्टींकडे लक्ष केंद्रीत करत असे. परंतु हेल्लेण्यांसोबत बोलतांना त्याने सृष्टीतील प्रमाणांचा तसेच बातचित माध्यमांचा उपयोग गेला. पौलाला नेहमी खात्री होती की देवाचा आत्मा सदैव लोकांची अंतःकरने तैयार करित पुढेचालला आणि तो त्याला धैर्य, धाडस आणि ज्या लोंकाना तो ओळखत नव्हता अशांच्या अंतकरणात काय दडलयं त्याकरिता शिकवित होता.

स्तुतीद्वारे पिच्छा पुरविण्यात सामर्थ्य मिळते.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण अकरा : अध्याय १८-१९

विषयवाक्य : इतरांसोबत पौल संपूर्ण आशियांत आश्चर्यकर्म करित आणि दुष्टाचा सामना करत उपदेश देत फिरला.

दिवस १

वाचा प्रे. कृत्य १८ : १-२३

१. अक्विल्ला आणि प्रिस्किल्ला सोबत पौलाचे काय मिळते जुळते होते?

२. देवाने पौलाला कोणती आज्ञा आणि प्रतिज्ञा दिली?

३. करिंथ येथे पौल किती दिवस राहीला?

४. देवाने, पौलास जसे करिंथ येथे उत्साहित केले, तसे काय देवाने तुंम्हास केलेल्या उत्साहाबद्दल सांगू शकणार ?

दिवस २

वाचा प्रे. कृत्य १८ : २४-२८ आणि १९ : १-७

१. इफिस येथे कोणी व काय शिकविले?

२. इफिस येथिल लोकांना पौलाने कोणती अतिरिक्त माहिती पुरविली होती?

३. येशू त्यांचा प्रभू व तारणारा हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी काय केले?

४. जसे पेन्टेकॉस्टच्या समयी त्यांच्या निर्णयाची खात्री देवाने पटविली तशी त्यांची कशी पटविली?

दिवस ३

वाचा प्रे. कृत्य १९ : ८-१२

१. सभास्थानांतील यहुदयांनी पौलाच्या शिक्षणास कसे प्रत्युत्तर दिले?

२. दोन वर्षांच्या कालावधीत, कोणी प्रभूचा शब्द ऐकला?

३. पौलाच्या हस्ते इतर कोणती " असामान्य चमत्कार " घडविले गेले?

दिवस ४

वाचा प्रे. कृत्य १९ : १३-२२

१. येशूमध्ये अधिकारप्राप्ती शीवाय दुष्टशक्तिंशी सामना करण्याविषयी आपण काय शिकू शकतो?

२. अनुवाद १८ : ९-१४ मध्ये जादुच्या प्रकारांची यादी बनवा.

३. तुमच्या समाजात कोणता प्रकारांत आढळले.

४. अशागुप्त सवयीपासून इफिसकरांनी स्वतःस कसे शुध्द केले?

५. आशियामध्ये पौलाने उपदेश देण्यात आणि शिकविण्यात किती वेळ घालविला?

दिवस ५

वाचा प्रे. कृत्ये १९ : २३ -४१

१. मार्गात देमेत्रियाच्या विरोधास कशाने प्रवृत्त केले ?

२. आपल्या उपहासाच्य थट्टेचा आधार देण्यात त्याने काय केले? त्याचा परिणाम काय होता?

३. नाटक गृहांत जाण्यापासुन पौलास कोणी टडविले?

४. जमावास शांत करण्यासाठी शिरस्तेदाराने काय केले?

५. अशा परिस्थितीत पौलाचे जीवन आणि सेवा सुरक्षित राखण्यासाठी देवाने कोणाचा उपयोग केला?

दिवस ६

प्रकरण ११ : "हंगामात अधिक कामगार जोडले गेले"

(२ ऱ्या प्रवासाचा शेवट आणि ३ ऱ्या प्रवासाचा प्रारंभ)

पाठ : अध्याय १८ - १९

मुख्यवचन : रोमकरांस १ : १६, " कारण मला सुवार्तेची लाज वाटत नाही कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला प्रथम यहुदयाला मग हेल्लेव्याला तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे"

विषयवाक्य : इतरांसोबत पौल संपूर्ण आशियांत आश्चर्यकर्म करित आणि दुष्टाचा सामना करत, उपदेश देत फिरला.

जीवनतत्व : सोबत राहणारा पवित्र आत्मा विश्वासऱ्यांना त्याचा अधिकाराचा हक्क सांगतो.

सारांश :- पौल आपला मिशनरी प्रवास करिथंच्या दिशेने सुरु ठेवतो जे ग्रीस मधील अत्यंत महत्वाचे शहर होते. करिंथ व्यापाराचे केंद्र शहर होते आणि मुर्तीपुजक धर्माने भरलेले होते. तरीही पौलाने दोन ख्रिस्ती मित्रांना मिळविले, अक्विल्ला आणि त्याची पत्नी प्रिस्किल्ला सुरुवातीस पौल हया जोडप्यासोबत राहिला आणि ते एकत्र तंबू बनविण्याचे काम करत होते, परंतु मग फिल्लिजैवम सिमा व तिमथी त्याला येऊन मिळावे आणि त्याच्यासाठी देणगी आणली ज्यामुळे मगपौल सुवार्ताप्रचारासाठी पूर्ण वेळ देऊ शकला (२ करिंथ ११ : ८ - ९ आणि फिल्लिपै ४ : १५) त्याच्या करिंथ येथील समयी पौलाने थेस्सलनीका येथील समयी पौलाने का थेस्सलनीका येथील मंडळीला दोन पत्र लिहीनीत सभास्थान पुढारी क्रिस्पचे परिवर्तन आणि वचन शिकविले त्यानंतर पौलाने तेथे स्थापिलेल्या मंडळयांना दोन पत्रे लिहिली. करिंथ येथील सेवेच्या समापनासमयी, यहुदी पौलाविरुद्ध उठले आणि त्याला गल्लियो जो अखाया प्रांताचा अधिकारी होता. त्याच्या न्यायासनासमोर घेऊन आले त्याजवर त्यांनी " हा माणूस लोकांना नियमशास्त्राविरुध्द देवाला भजावण्यास चिथावितो," असा आरोप केला. (प्रे.कृत १८:१३) गल्लीयोने लगेच त्या आरोपांचे खंडण केले, तो म्हणाला," हा वाद तुमच्या नियमशास्त्राचा आहे

तर तुमचे तुम्हीच पाहुन घ्या. त्याने त्यांना न्यायासनापुढून टाकून दिले, जरी त्यांनी सांस्थनेस जो सभास्थानाचा अधिकार होता, मार देऊन दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पौल करिंथ सोडून सुरियास गेला आणि मग प्रिस्किल्ला व अक्विल्ला सोबत इफिस येथे पौलाने आपले केस कापले कारण त्याने नवस धरला होता. कदाचित नासरेथाचा नवस आणि मग प्रिस्किल्ला व अक्विल्ला त्याला सोडून गेलीत परंतू पौलपुढे कैसरिया, अत्युंखिया, गलतिया, फ्रुगियाला गेला. मागे इफिसमध्ये अपुल्लो नावाचा ज्ञानी, देवभिस मनुष्य येशु च्या गोष्टी शिकवू लागला. तरीही तो निव्वळ योहान बाप्तिस्मा देणाऱ्याशीच परिचित होता. प्रिस्किल्ला व अक्विल्लाने त्याला बाजूला करुन " देवाचा मार्ग अधिका स्पष्टपणे दाखविला, " हया गोष्टीमुळे तो अखायामधिल सेवेसाठी तैयार करण्यात आला. जेथे शास्त्र सांगते तो" मोठया जोरदारपणाने सर्वा समस्त यहुदयांचे खंडण करीत येशु हाच ख्रिस्त आहे, असे शास्त्रावरुन दाखवित होता. (प्रेषित १८:२८)

जेव्हा अपुल्लो करिंथ येथे होता, पौल इफिसमध्ये परत आला आणि २-३ वर्षासाठी तेथे राहिला. काही शिष्यांना पाहून त्याने विचारले कि त्यांनी पवित्र आत्मा मिळविला आहे काय, परंतु त्यांनी तो मिळविला नव्हता. त्यांनी योहान बप्तिस्मादाताच्या बप्तिस्मा मिळविला होता, तेव्हा पौलाने सांगितले कि योहानाचा बाप्तेस्मा हा एका प्रकारे पश्चात्तापाचा होता हे ऐकल्यावर त्यांनी विश्वासणाऱ्यांचा बप्तिस्मा विषयी विनंती केली आणि पवित्र आत्माला प्राप्त करित ते वेगवेगळया भाषा बोलू लागले व ईश्वरी संदेश देऊ लागले. पुढील दोन वर्षे तेथे सतत उपदेश, शिक्षक आणि शिष्य बनवित राहिला.

त्यानंतर पौलाने मसिदोनिया, यरुशलेम आणि रोमला जाण्याच्या बेत केला, पंरतु हया समयी "मार्गा " विषयी वाद उत्पन्न झाला देमेत्रिय नावाच्या माणसाने पौलाविरुध्द लोकांना शिकविले कारण तो त्यांच्या देवी बनविण्याच्या व्यवसायासाठी धोका समजण्यात आला होता त्याने आपल्या राष्ट्रीय अधिकाऱ्यांना याबद्दल सांगितले की, अशी ख्रीस्ती शिकवण त्यांच्या अर्तमी देवीचे व मंदीराचे नाश करिल. आपल्या संघाविषयी जिध्द बाळगून ते लगेच नाटकगृहाकडे धावत गेले आणि एकमेकांवर जे आवेशाने ओरडू लागले, अनेकांना एकत्र येणाचे कारण ठाऊक नव्हते पौलाने आत जाण्याचा प्रयत्न केला. पंरतु शिष्यांनी (पवित्र आत्म्याच्या

प्रेरणेने) त्याला अडविले नगराचा शिरस्तेदार उभा राहुन त्याने लोकांना शांत केले. त्याने मोठया हुशारीने त्यांना हाताळले. शेवटी त्याने त्यांच्या नियमातील अज्ञानते बद्दल रागावले आणि मोठया दंगलीविषयी त्यांना ताकिद दिली. त्यासोबत त्याने ती सभा बर्खास्त केली. देवाने, शिष्यांच्या सावधगिरीने आणि एका दक्ष शिरस्तेदाराव्दारे, पौलाने जिवन पुढील सेवेसाठी राखून ठेवले.

सोबत राहणारा पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यांना त्याचा अधिकाराचा हक्क सांगतो.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण बारा : अध्याय २०

विषयवाक्य : पौल इफिसमध्ये मंडळीला आशिर्वाद देतो आणि यरुशलेमेसाठी तयार करतो.

दिवस १

वाचा प्रेषित २० : १ - ६

१. ग्रीसमध्ये पौल किती दिवस राहिला ?

२. पौलाच्या सहप्रवाशांची नावे कोणती ?

३. काय तुमच्या सभोवती काही नितिमान पुरुष किंवा स्त्रीया आहेत?

दिवस २

वाचा प्रेषित २० : ७ - १२

१. त्रोवस मधील शेवटच्या रात्री घडलेल्या चमत्काराचे वर्णन करा?

२. तेथिल पौलाची सेवा वर्णन करण्या करिता तुम्ही कोणत्या शब्दांना वापरणार?

३. पौलाचे जीवन आमच्या करिता इतरांची सेवा करण्याविषयी कसे नमुनेदार ठरते ?

दिवस ३

वाचा प्रेषित २० : १३ - २४

१. यरुशलेमेत जाण्याची पौलाची केव्हा इच्छा होती?

२. इफिसमध्ये सेवा करण्याकरिता पौलास कोणती अडचण होती (२०:१९)?

३. आसिया मध्ये यहुदी व हेल्लेनी लोकांकरिता पोलाचा कोणता निरोप होता ?

४. यरुशलेमेत जे वाट पाहत होते त्या विषयी पौलास कसे वाटले ?

दिवस ४

वाचा प्रेषित २० : २५ - ३४

१. जे काम पूर्ण करण्याकरिता तो बोलविण्यात आला होतात ते पूर्ण केल्यास पौलास कसे वाटले?

२. यरुशलेमेस परत जाण्यापूर्वी पौलाने कोणता उत्साह आणि ताकिद मंडळीच्या वडिलांना दिला?

३. तुमचा "ओघ" कोणता जसा पौलांने आपला सांगितला तुमच्या जीवनाचे कार्य किंवा सेवा ?

दिवस ५

वाचा प्रेषित २० : ३५ - ३८

१. पौलाने प्रभूचे कोणते शब्द वाटले?

२. पौल आणि इफिसकरांनी एकमेकास देवाच्या सेवेमध्ये असतांना निरोपाचे कोणते शब्द वापरले त्यांची यादी बनवा (३६ - ३८)?

३. तुम्हास काय वाटते की तो भावूक निरोप का असावा ?

४. तुम्हाला तुमच्या जीवनातून पौला समान होण्यास जसा तो येशू समान होता, काय बदलावेसे वाटले?

दिवस ६

प्रकरण १२ : " पौल इफिस येथिल मंडळीचा निरोप घेतो."

पाठ : अध्याय २०

मुख्यवचन : प्रेषित २० : २४, " मी तर आपल्या प्राणाची किंमत एवढीसुध्दा करित नाही, हया साठी की, मी आपली धाव आणि देवाच्या कृपेची सुवार्ता निस्वार्थाने सांगण्याची जी सेवा मला प्रभु येशूपासून प्राप्त झाली आहे ती शेवटास न्यावी"

विषयवाक्य : पौल इफिस येथील मंडळीला आशिर्वाद देतो आणि यरुशलेमेत ज्या गोष्टिची वाट होती. त्याकरीता तैयार होतो.

जीवन तत्व : इतरांसाठी विश्वासयोग्य अनुयायी होण्याकरिता प्रवृत्त असणारे आदर्श बना.

सारांश : इफिस येथे उठलेले वादळ शांत झाल्यानंतर पौलाची तेथील वेळ संपुष्टात येते. त्याची तेथील वर्षे विरोधा मध्ये देखील आशिर्वादीत होती तो विश्वासणाऱ्यांच्या समुदायातून निरोप घेतो आणि मासेदोनिया व नंतर ग्रिसकडे जातो तो आपल्यासोबतजेथे कुठे त्याने प्रवास केला तेथील भाऊ व बहिणींना घेऊन जातो. (प्रेषित २० : ४) हा देवाचा मार्ग होय : जो वेगवेगळया भागातून आहेत व एकमेकास वरदानांत पुरक आहामध्ये एकत्रपणे काम करणे सोपे नव्हे. सुरुवातीला आपण वाचले की, पौलाचा योहान मार्क विषयी बर्नबासोबत किती समस्या होती, परंतु त्याच्या संबंधातून वादापेक्षाही मोठे प्रतिफळ समोर आले आणि आमच्यासोबत तरीच असावे कोणत्याही नात्यात वाद अपेक्षित निवडतो तेथे फळ तर असणारच.

त्रोआसमध्ये पौल मंडळीसोबत मध्यरात्रीपर्यंत बऱ्याच गोष्टी वाचतो. तिसऱ्या मजल्यावरुन युतूस खाली पडतो व मृत्यु पावतो. पौल त्याची काळजी घ्यायला खाली धावतो त्याच्यावर पाखर घालतो व कवटाळून म्हणाला " हा जीवंत आहे. पौलाच्या शिकवणीला आणि शुभवर्तमानासाठी ही घटना भर देऊन गेली ज्यामुळे मंडळीला अधिक दिलासा मिळाला.

मिलेतात असतांना पौलाने इफिस येथील मंडळीला शब्द पाठविला आणि ते त्याला बघण्याकरीता आले. तेथे पौलाने त्यांना सागितले की, ते परत त्याचा चेहरा बघु शकणार नाही

आणि तेथे त्यांना शेवटचा आशिर्वाद दिला. तो स्पष्ट विवेकाने त्यांच्यापूढे उभा राहिला आणि खात्री पटविली की जे काये त्याला देण्यात आले होते ते त्याने पूर्ण केले. त्याच्या शब्दात, " मी सर्वांच्या रक्ता विषयी निर्दोषी आहे." (प्रेषित २०:२६) त्याबद्दल त्याने त्यांना त्यांच्या जबाबदारीची आठवण करुन दिली, प्रभू मधिल जो उत्तम मेंढपाळ आहे अमर्यादित स्त्रोत.

त्याने त्यांना उत्साहित केले आणि खोटी शिकवण, खोटया कोल्हयापासुन सावध राहण्याविषयी दृढ केले. अश्रृमध्ये, नेहमी देवाच्या कळपाला राखण्यासाठी तैयार केलेले पुढारी, त्याने त्यांना प्रार्थनेत प्रभूला सोपविले, त्याने त्यांना इतरांसाठी वेळ, संपत्ती आणि विश्वास योग्यते मध्ये जीवन देणे होय, जे सार्वकालीकतेमध्ये गणले जाईल.

इतरांनी विश्वासयोग्य अनुयायी होण्याकरिता प्रवृत्त असलेले आदर्श असावे.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण तेरा : अध्याय २१ - २२

विषयवाक्य : यरुशलेमेत पौलाला अटक आणि समुदायास आपल्या कृपेची तो गोष्ट सांगतो.

दिवस १

वाचा प्रेषित २१ : १ - १४

१. सोर येथील पौलाच्या वेळेविषयी सांगा जेथे तारु टेकले होते.

२. फिलिप्पाचे वर्णन करा. (प्रेषित २१ : ८ आणि प्रेषित ६ : ३ - ५)

३. अगबद्वारे पौलाकरीता कोणती भविष्यवाणी झाली ?

४. पौलाने कशी प्रतिक्रिया व्यक्त केली ? शिष्यांनी कोणती प्रतिक्रिया व्यक्त केली ?

५. वचन १३ आणि लुक १४ : २५ - ३३ मधिल येशुच्या शिकवणीतून पौलाच्या वागणूकी बद्दल काय शिकता ?

दिवस २

वाचा प्रेषित २१ : १५-२६

१. प्रेषित १८:२३ पासुन सुरु करुन आपल्या नकाशावर पौलाची तिसरा मिशनरी प्रवास रेखाटा?

२. कोणत्या चारित्र्यामूळे पौल एक चांगला पुढारी ठरला

३. यरुशलेमेत पौल व इतर शिष्यांचे स्वागत कसे झाले?

४. वडिलांनी पौलास यरुशलेमेत उत्कंठित यहुदयांसोबत काम करण्यास सांगितले?

५. पौलाने हि प्रतिज्ञा का वाहिली असावी? (वाचा १ करिंथ ९ : २२)

दिवस ३

वाचा प्रेषित २१ : २७-४०

१. काय घडले ज्यामुळे पौलास अटक झाली?

२. समुदायाचे वर्णन तुम्ही कोणत्या शब्दात करणार ?

३. पौलाने समुदायात बोलण्याकरिता का विचारले?

दिवस ४

वाचा प्रेषित २२ : १- १६

१. आपल्या परिवर्तना दिवशी पौलाने देवाचे कोणते सत्य जाणून घ्यायचे होते?

२. दमिष्काच्या वाटेवर पौलाने येशूला कोणता पहिला प्रश्न विचारला होता?

३. पौलाने प्रभूला कोणता दुसरा प्रश्न विचारला होता?

४. वचन १४ नुसार देवाने कशासाठी पौलाची निवड केली?

५. देवाने कशासाठी तुमची निवड केली आहे.

दिवस ५

वाचा प्रेषित २२ : १७-३०

१. गलतीकरांस १ : १५-१८ नुसार, पौलाच्या परिवर्तना पासून त्यांच्या यरुशलेमेत पुन्हा परतण्यापर्यंत किती वेळ लागला?

२. देहभाणात नसतांना देवाने पौलास कोणता संदेश दिला?

३. हेल्लेण्यां मधील आयुष्यभर सेवेचा निर्णय कुणी घेतला?

४. यहुदी लोक पौलावर कसे व का रागावले होते?

५. शिक्षेपासून पौल कसा सुरक्षित राखण्यात आला?

६. तुमच्या विश्वासाने काय ताण उत्पन्न झाला आहे?

७. विश्वासयोग्य राहण्या करीता तुमच्या सभोवतालच्या लोकांनी तुमच्यासाठी कशी प्रार्थना करावी असे तुम्हास वाटते?

८. देवामागे संपुर्ण अंतःकरणाने चालण्यामध्ये तुमच्या मार्गात कोणते अडखळने उद्‌भवतात?

दिवस ६

प्रकरण १३ : " पौलाची अटक व समुदायापुढे त्याचे आत्मसमर्थन "

पाठ : अध्याय २१-२२

मुख्यवचन : प्रेषित २२ : १५, " कारण जे तू पाहिले आहे व ऐकले आहे त्याविषयी तू सर्व लोकांपुढे त्याचा साक्षी होशील."

विषयवाक्य : यरुशलेमेत पौलास अटक होते आणि तो समुदायास आपल्या कृपेची कथा ऐकवितो **जीवनतत्व** : विरोध आम्हास देवाने केलेले कार्य सांगण्यास संधी देऊ शकणे.

सारांश : अध्याय २१ ची सुरुवात अपशकुन ने होते जेव्हा पौल सोर येथील ख्रिस्तीजनांसोबत संगती करतो ते त्याला सतत आत्मातून सांगत राहतात की, " यसशलेमेत पाऊल टाकु नका " (प्रेषित २१ : ४) अशा प्रकारचे भाकीत जाणवत होते की, ते देवापासून आहे, तरीही पौलाने त्या दिशेने आपला प्रवास सुरु ठेवला.

पौल कैसरिया येथे थांबला आणि तेथिल ख्रिस्ती जनांसोबत त्याने पवित्र आत्म्याने दिलेलया शब्दानुसार पौलास सावध केले की, यरुशमलेत पौल यहुदयाद्वारे बंदी बनविण्यात येईल आणि हेल्लेण्यांचा छळ होईल. पुन्हा बंधुजन अश्रुंसह पौलास विनवणी करु लागले की त्याने यरुशमलेतून परतावे. परंतु त्याचा पौलावर काहीही परिणाम झाला नाही. जेव्हा त्यांनी पाहिले की, ते त्याला त्याचा परिणामापासून थांबवू शकत नाही आहे. तेव्हा शास्त्रभाग सांगते की कैसरिया आणि सोर मधील बंधूनी आत्म्याने सुचविलया प्रमाणे ताकीदीचे शब्द सांगितल्यावरही पौलाकडून असे काही संकेत नव्हते जे त्याच्या यरुशलेम यात्रेबद्दल देवाची आज्ञा मोडणारे होते. कदाचित प्रभू दोन्ही तऱ्हेने पौलाची तपासणी करित होता की, तो ठराव धरुन आहे किंवा नाही. तरीही पौल खरोखर यरुशलेमेत पोहोचला आणि भाकित त्रास आपल्या इष्ठ प्राप्तीस पोहचला.

जेव्हा बंधुजनांनी पौलाचे आनंदाने यरुशलेमेत स्वागत केले. तेव्हा एक वाद देखील त्याजपूढे मांडला. वरवर पाहता जेव्हा पौल कृपा व हेल्लेण्याचे स्वातंत्र्य हया विषयी उपदेश करित

होता. तेव्हा त्याच्या विरोधात यहुदयांकडे मागे शब्द पाठविण्यात आला की, पौल मोशे, सुता आणि इतर यहुदी प्रथांना सोडण्याकरीता लोकांना सांगत आहे. त्रास टाळण्याकरीता, त्यांनी पौलास सल्ला दिला की, त्याने आपल्या सोबत चार माणसे ध्यावित, त्यांचे टककल करावे आणि नियमानुसार शुध्दतेची प्रक्रिया पुर्ण करावी. पौल त्यास बंधनकारक होता परंतु त्यांच्या ७ दिवसाच्या शुध्दतेनंतर यहुदयांनी मंदिरात जमावाला चिथविले आणि पौलास मारुन टाकण्या करीता होऊन गेले रोमनांनी हस्तक्षेप केला आणि त्याला बांधल्यानंतर त्यांनी त्याला बोलण्याची परवानगी दिली. विरोधामुळे त्यांनी त्याला बोलण्याची परवानगी दिली विरोधामुळे त्याला संधी मिळाली की त्याने देवाने त्यांच्या मध्ये आणि त्याच्या द्वारे तेथे जे जमले होते त्यांच्या समक्ष देवाची गोष्ट प्रस्तुत केली.

इब्री भाषेत संवाद साधित त्याने जमावास आपली पक्ष सांगितली आणि त्यांनी ती त्याला देवाने हेल्लेगी लोकांकडे पाठविले हया आशयापर्यंत ऐकले. तत्क्षणी त्यांनी आपली वस्त्रे फाडली आणि आरोळी मारुन बोलले, " जगातून हयाला नाहीसे करा, हयाची जगण्याची लायकी नाही " तेव्हा सरदाराने हुकूम दिला की ते त्याच्यावर इतके का ओरडत होते. हे समजण्यासाठी त्यांनी त्याची चौकशी चाबकाखाली करण्यास सांगितले, पंरतु पौलाने चौकशी शिवाय रोमन मनुष्याला फटके मारले फायदेशिर आहे. काय असे म्हणत आव्हाहन केले. रोमन नियम मोडण्याच्या परिणामावरुन भयभीत होऊन त्यानी त्याला सोडून दिले. परंतु तरीही सरदाराला लोक त्याच्या विरुध्द इतके का ओरडत होते हे जाणून घ्यायची इच्छा होती, म्हणून त्याने पौलाला सस्नेहव्दिन सभेपूढे पाठविले पुन्हा एकदा, पौलास संधी लाभली की त्याने सुवार्ता सांगावी, हयावेळी धार्मीक पुढाऱ्यापुढे.

विरोध आम्हास देवाने केलेले कार्य सांगण्यास संधी देऊ शकतो.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण चौदा : अध्याय २३ - २४

विषयवाक्य : विरोध, दंगा आणि सापळा पौलाच्या विरोधात जातात.

दिवस १

वाचा प्रेषित २३ : १-८

१. प्रमुख याजक आणि सन्हेद्रिव ला पौलाचे उद्घाटक वाकय कोणते?

२. हनन्याने पौलाच्या विरोधात तीव्र प्रतिक्रीया का दिली?

३. तुम्ही सांगू शकता काय पौलला हनन्याकउे ज्याप्रमाणे पाठविण्यात आले ते का? (देखील बघा मत्तय २३:२७-२८)

४. सदुकी आणि परुशांनी कोणता विश्वास ग्रहण केला होता, हे सांगू शकता काय?

दिवस २

वाचा प्रेषित २३ : ९-११

१. देवाने पौलाला केव्हा आणि कसे उत्साहित केले?

२. प्रभुने पौलाला धिर धरण्यास म्हटले, हयावर तुम्हांस काय वाटते?

३. यहोशवा १ : १ - ९ व्दारे काय तुम्ही धिर धरण्याची मार्ग शोधून काढु शकता काय?

४. जीवनातील कोणत्या परिस्थितील तुम्हाला प्रभू पासून उत्साहाची गरज आहे.

दिवस ३

वाचा प्रेषित २३ : १२ - ३५

१. ४० यहुदयांनी पौला विरुध्द आपला रोष प्रकट करित कोणती शपथ वाहिली?

२. पौलाच्या बहिणीच्या मुलाने काय ऐकले?

३. देवाने पौलाला यहुदी मृत्युपाशा पासून कसे सुरक्षित ठेवले? का?

४. पौलाला शहराबाहेर घालविण्यासाठी त्यांनी किती लोकांना नेमले?

५. त्यांनी पौलाला कोठे नेले आणि का?

दिवस ४

वाचा प्रेषित २४ : १ - १३

१. पौला विरुध्द कोणता आरोप मांडण्यात आला?

२. पौलाने आपले यरुशलेमेस येण्याचे कोणते कारण सांगितले?

३. पौलाने त्याला बंदिशाळेत टाकावयामागील कोणता हेतू सांगितला?

दिवस ५

वाचा प्रेषित २४ : १४ - २६

१. पौल काय जाणू, बघु आणि ऐकू इच्छित होता?

२. त्याची साक्ष कशी स्विकारण्यात आली.

३. फेलिक्सला कोणते भय जडले? त्याने कसे प्रत्युत्तर दिले?

४. किती दिवस पौलाला बंदिशाळेत ठेवण्यात आले?

५. काय पौला करिता हया वेळा साठी बंदिवासात देवाची काही इच्छा होती?

६. काय तुम्ही आपल्या जीवनांत कठिण जागी आहांत? जे तुमच्या सभोवती आहेत ते तुमच्यासाठी कशी प्रार्थना करु शकतात?

दिवस ६

प्रकरण १४ : "परिषद आणि फेलिक्स समोर पौलाचा बचाव"

पाठ : अध्याय २३-२४

मुख्य वचन : प्रेषित २३:११, "धीर धर, जशी तू यरुशलेमेत माझ्याविषयी साक्ष दिली तशी रोम शहरातही तुला दयावी लागेल."

विषय वाक्य : विरोध, दंगा आणि सापळा पौलाच्या विरोधांत जातात.

जिवन तत्व : वाट बघण्याच्या कालावधीत विश्वासयोग्य धिर शक्य आहे.

सारांश :- परिषदे समोर उभे झाल्यानंतर पौलाच्या मुखातून निघालेल्या पहिल्या शब्दांनीच त्याच्यावर संकट ओढावले. त्याने देवाबरोबर पूर्ण सद्भावाने वागत असल्याची ग्वाही दिली तेव्हा

प्रमुख साजकाने त्यांच्या तोडांत मारण्याची आज्ञा केली तेव्हा न जाणता की, तो प्रमुख याजक आहे. त्याला रागाने त्याच्या हया दुष्कृत्याबद्दल देव त्याला मारिल असे म्हटले. तरीही जेव्हा त्याच्या लक्षात आणण्यात आले की, त्याने लोकांच्या शासकासोबत वाईट केले, तेव्हा लगेच क्षमा मागितली आणि निर्गम २२:२८ चा उल्लेख केला, " तु आपल्या लोकांच्या अधिकाऱ्या विरुध्द वाईट बोलू नको." हे फार विलक्षण आहे की, पौला जवळ प्रत्येक कारण होते की, तो त्यांना आव्हान देऊ शकत होता. तरीही तो मर्यादेत होता. त्याने "चौकशी" बाबतीत सरदारांस आव्हान केले होते. नंतर हयाच अध्यायांत तो यहुदयांला त्याला रोमन मनुष्य म्हणुन मारण्याविषयी टाळतो. मग अध्याय २५ मध्ये, जेव्हा फेस्तासमोर आपला बचावपक्ष मांडतो तेव्हा तो कैसरास विनंती करतो.

संधी प्राप्त झाल्यास पौल स्वत:चा बचाव रोमी नागरिक म्हणून करतो आणि यहुदयांच्या चुका लक्षात आणतो, परंतु ते फलिकसला लाच देण्यास इंकार करतो. जरी ज्यामुळे तो सुटला असता आणि प्रमुख याजकासही वाईट बोलण्यामळे तो क्षमा मागतो. तो छळ सहन करण्यास तैयार होता आणि मरण्यास देखील परंतु पित्याच्य इच्छेपूर्ती साठी बद्ध होता. हया सर्व प्रकारांत पौलाने आपल्या त्रासाची धार नम्रतेने आणि विश्वासू पणाने राखली.

धार्मीक पुढाऱ्यांना शुभवर्तमान पाहिजेत सांगितल्यानंतर, पौलाने पुन्हा शुभवर्तमान सांगणे पसंत केले नाही. पंरतु सदुकी आणि परुश्यांमध्ये तंटा उत्पन्न केला. हयामुळे अतिउद्रेक घडला आणि पौलाला बंदिशाळेत नेऊन कैद करण्यात आले. त्याच रात्री प्रभु त्याच्या पुढे उभा राहुन म्हणाला, " धिर धर, जशी तू यरुशले मते माझ्याविज्ञयी साक्ष दिली तशी रोम शहरातही तुला दयावी लागेल." पौलास आपल्या प्रभू कडून अधिक दिलासा देण्यात आला की, त्याचा त्रास देवाचा उद्देश पूर्ण करीत आहे. आपणही हयाच ज्ञानाने आज सांत्वन प्राप्त करु शकतो.

दुसऱ्या दिवशी, काही यहुदी त्याला मारण्यासाठी कट रचित असल्याचे पौलास सांगण्यात आले. सरदारास हया कटाविषयी कळविण्यात आले आणि ठरले की, २०० शस्त्रधारी शिपायांच्या सुरक्षते मध्ये पौलास कैसरिया येथे हलविण्यात यावे. पौलासोबत सरदाराचे पत्र जे फेलिवस राज्यपाला करीता होते. त्यांत परिस्थितीचे वर्णन असून राज्यपालाची जबाबदारी नमुद होती

आणि म्हणून पौल व त्याची कृपेची कथा सुरक्षित रित्या कैसरिया येथे पोहचली जेथे यहुदयांच्या हस्तक्षेपाशिवाय त्याने सुवार्ता पसरविली.

अनेक दिवसानंतर, प्रमुख याजक हनन्या कैसरिया येथे आला व वडीलाद्वारे पौला विरुध्द आरोप आणले. त्यांनी राज्यपालास अपील केली पौलाने यहुदी आणि रोमी लोकांच्या शांतीच्या संबंधामध्ये विभाजन पसरविले. त्यांनी हे देशील गाऱ्हाने सांगितले की, सरदाराने फेलिक्सचा गर्व राखण्यासाठी अन्यायाची वागणूक केली. जेव्हा पौलाला आपली बाजू मांडण्यास संधी देण्यात आली तेव्हा त्याने व्यवस्थेविषयी संदेष्टयाविषयी आणी मृतांचे पुनरुधाना विषयी आपली धारणा व्यक्त केली. त्याने यहुदया विरुध्द आपल्या सोबत अन्यायासह कठोर वागणुकीचा आरोप लावला. फेलिक्स जवळ अधिक स्पष्ट ज्ञान होते आणि त्याच्या निर्णयास बाजुला ठेवले. तरीही दोन वर्ष फेलिक्सच्या अधिनतेत अनेक स्वातंत्र्यासह पौलास कैदेत पाठविण्यात आले. जरी हे प्रकट होत नाही की, पौलाच्या साक्षी फेलिक्स परीवर्तीत झाला होता तरीही तो त्यांच्या सहबोलायचा आणि त्याच्या मित्रांना त्याला भेटण्याची मुभा होती. हया दोन वर्षानंतर फेलिक्सच्या जागेवर फेस्त झाला आणि यहुदयांचा पक्ष मिळण्यासाठी त्यांची पसंतीचे काम करणार होता. फेलिक्सने पौलास बंदिवासातच सोडले. वरवर पाहता पौल आणि त्याच्या सुवार्तेतील संदेश फलिक्ससाठी मनोरंजनात्मक कथेशिवाय दुसरे काहीही नव्हते.

वाट बघण्याच्या कालावधीत विश्वासयोग्य धीर शक्य आहे.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण पंधरा : अध्याय २५-२६

विषय वाक्य : पौल राज्यपाल आणि राजांसमक्ष बोलतो.

दिवस १

वाचा प्रेषित २५ : १ - १२

१. प्रेषित २५ : २ - ३ आणि प्रेषित २३ : १२ - १५ मध्ये कोणत्या दोन समुहांनी पौलाचा वध करण्यास कट रचला?

२. अशा कटांविषयी देवाने काय केले?

३. पौलाने कैसरास का अपील केली असावी?

दिवस २

वाचा प्रेषित २५ : १३ - २७

१. फेस्त किंवा अग्रिप्पाला पौलासोबत काय करावे हे सुचलेले तुम्हास जाणवते काय? का?

२. पौलाचा निर्दोषपणा कोणते वचन सांगते?

३. पौलाने आपला खटला शासकाकडे मांडल्यामुळे, अग्रिप्पाला त्याला कोठे पाठावायचे होते? हे महत्वाचे का होते?

दिवस ३

वाचा प्रेषित २६ : १ - १५

१. पुढील वर्णन करणारी वचने सांगा

अ. पौलाचे येशुला मसिहा म्हणून सादरीकरण

ब. यहुदयांचे "अडखळण"

क. पौलाचे परिवर्तनपूर्व धारणा

ड. पौलाचे परिवर्तन आणि नेमणूक (आज्ञापालनासाठी त्याचे पाचारण)

दिवस ४

वाचा प्रेषित २६ : १६ - २८

१. पौलाचा दर्शना विषयी सांगा आणि त्याचा दर्शनाविषयी आज्ञाधारकपणा.

२. पौलाने कोठे उपदेश दिले?

३. पौलाला अग्रिप्पाचा जवाब काय होता ?

४. पौलावर विश्वास न करता अग्रिप्पाने (जो कोणी ख्रिस्ताचा नकार करतो) काय गमाविले?

दिवस ५

वाचा प्रेषित २६ : २९ - ३२

१. काय पौल बंदिवासात राहणे किंवा मृत्युस पात्र होता?

२. जेथे तो होता तेथे पौलास पाठविले?

३. काय हे त्याच्या पाचारणाची पुर्तता कोणती (प्रेषित ९ : १५ मध्ये मागे पहा)

दिवस ६

प्रकरण १५ : "फेस्त आणि अग्रिप्पापूढे पौलाचे आत्मसमर्थन"

पाठ : अध्याय २५ - २६

मुख्यवचन : प्रेषित २६ : १६, " तर उठ व आपल्या पायांवर उभा रहा, कारण मी तुला ह्यढयासाठी दर्शन दिले आहे की, तु जे माझ्याविषयी पाहिले आहे व ज्याबाबत मी तुला दर्शन देणार आहे, त्याचा सेवक व साक्षी असे तुला नेमावे."

विषयवाक्य : पौल राज्यपाल आणि राजांसमक्ष बोलतो.

जीवनतत्व : जेव्हा आपण आज्ञाधारकतेचा पाठलाग करतो तेव्हा आपण अधिक वाढतो.

सारांश : पुन्हा यहुदयांनी पौलास संपविण्याचा कट रचला. यहुदयांमधील प्रमुख मनुष्यांनी फस्तापुढे पौलाच्या विरोधांत आरोप आणले आणी प्रयत्न केला की, त्याला पुन्हा यरुशलेमेत परत आणले, हयासाठी की वाटेत त्याची त्या हव्या करावी, परंतु फेस्ताने पौलाला यरुशलेमेला परत करण्याचे नाकारले. यहुदीकैसरिया मध्ये आल्यानंतर त्यांच्या समक्ष पौलास उभे करावे असा त्याचा विचार होता. फेलिक्स समान फेस्ताची यहुदयांना खुश करण्याची इच्छा होती आणि पौलाला विचारले की, तो यरुशलेमेत चौकशीसाठी उभा राहील किंवा नाही पौलाने उत्तर दिले की, जर त्याने चुक केली असल्यास तो मृत्युची इच्छा बाळगते परंतु जे आरोप त्याच्यावर

लावण्यात आले त्याबाबद तो निर्दोष होता, आणि म्हणुन कैसरास आपले निवेदन पाठविले. कैसरासमोर आपली बाजू कशी मांडावी हे समजत नसल्यामुळे फेस्ताने पौलाला आपले मित्र अग्रिला राजा आणि बर्नीका समोर उभे केले. एका भव्य शोभायात्रेत त्यांनी इतर प्रमुख मनुष्यांसोबत शहरात प्रवेश केला. फेस्त लोकांपूढे बोलला आणि त्यांना पौलाचा खटला ऐकण्यास सांगितले आणि कैसरासमक्ष आपली बाजू कशी मांडावी हया विषयी चौकशी केली. जेव्हा फेस्ताने त्यांची बाजू निर्धास्त केली आणि त्यांचे म्हणजे ऐकुन घेतले, तेव्हा पौलाला पुन्हा प्रमुख मनुष्यांसमोर सुवार्ता सांगण्याची संधी लाभली त्याने आपले यहुदी संगोपन सांगत स्पष्ट केले की, ''देवाने आमच्या पूर्वजांना जे वचन दिले त्याची आशा धरल्याबद्दल माझा न्याय होण्याकरीता मी उभा आहे.'' (प्रेषित २६:६) त्याने दमिष्ठ वाटेवरील परिवर्तनापूर्वीची आपली ख्रिस्ती लोकांचा पाठलागविषयी वर्णन केले. त्याने स्पष्ट केले की, त्याने ख्रिस्ताद्वारे झालेले पाचारणास आज्ञाधारकपणा दर्शविला. त्याने पुढे वाद घातला की, यहुदयांनी मोशे व संदेष्टयांच्याद्वारे प्राप्त पूर्तता यहुदयांनी नाकारली. पौल ख्रिस्ताचे सत्य पुन्हा एकदा सांगण्यात विश्वासू होता. तरी त्यांनी त्याचा विरोध केला आणि म्हणून देवाने त्याला रोमकडे पुढे नेले.

जेव्हा आपण आज्ञाधारकतेचा पाठलाग करतो तेव्हा आपण अधिक वाढतो.

प्रेषितांची कृत्ये

प्रकरण १६ : अध्याय २७-२८

विषय वाक्य : पौलाचा रोमकडील प्रवास ज्यांत तुफान व नौक्काभंग आहे.

दिवस १

वाचा प्रेषित २७ : १-१०

१. तारवाच्या धन्याविषयी आपण काय जानतो ?

२. पौलासोबत जलप्रवासांत कोणते दोन मित्र गेले ?

३. पौलासोबत मित्रांची नावे सांगा आणि तुम्ही त्यांच्या मैत्रीपासुन काय शिकतां ? (कलस्सै ४ : १०, १४ आणि फिलेमोन २३, २४ देखील बघा.)

४. योहान १५ : १२- १७ तुम्ही मैत्री विषयी काय शिकाल ?

५. तो वर्षाचा कोणता काळ होता आणी समुद्र प्रवासाकरीता कोणत्या अटी होत्या ?

६. अधिकाऱ्यांना पौलाने कोणती ताकीद दिली होती ?

दिवस २

वाचा प्रेषित २७ : ११-४४

१. समुद्रातील वादळाचे वर्णन करा आणि जे तारवात होते त्यांच्या परिस्थिती विषयी सांगा ?

२. पौलाने कोणते शब्द म्हटले आणि त्याला त्याची माहिती कोठुन मिळाली ?

३. धेर्य धरा हयाचा अर्थ काय ?

४. स्तोत्र ११९ : ८९, २ तिमथ्याला ३ : १६-१७ पासुन देवाचा शब्द वर्णन करा.

५. तारवात किती लोक होती ?

६. तारवात कैद्यांची काय अवस्था होती ?

७. प्रेषित २७ : २३-२४ पासून पौलाचा देवासाठी शब्द कसा पुर्ण झाला ?

दिवस ३

वाचा प्रेषित २८ : १-११

१. नौकाभंग शेवटी कोठे येऊन पोहचला ?

२. मिलात बेटावर लोकांनी त्याला कसे स्वीकारले ?

३. बेटावरील लोकांवर देवाने स्वःताला कसे प्रकट केले ?

४. रोमकडे पुढे प्रवासाकरण्यापूर्वी ते किती काळ बेटावर थांबले ?

५. तुम्हास काय वाटते पौलाने आपला वेळ कसा काढला असावा ?

दिवस ४

वाचा प्रेषित २८ : १२ - २९

१. रोममध्ये पौलाला कोण भेटले आणि पौलाला कसे वाटले ?

२. रोम मध्ये पौल कोणत्या परिस्थितीत जगता ?

३. यहुदी पुढाऱ्यांना दिलेल्या आपल्या संदेशात पौलाने कोणत्या गोष्टी जोडल्या ?

४. संदेशाप्रती त्याचे प्रत्युत्तर कसे होते ?

५. यशयातील शास्त्र भागानुसार, व्यक्तीच्या अल्पविश्वासाकरीता कोण जवाबदार असणार ?

दिवस ५

वाचा प्रेषित २८ : ३० - ३१

१. रोम मध्ये तो किती दिवस राहीला आणि येशुच्या सुवार्तेकरीता कसा प्रतिसाद होता ?

२. १ तिमथ्याला ४ जे त्याच्या बंदिवासातुन लिहीले गेले होते, त्यानुसार पौलाची आध्यात्मिक अवस्था कशी होती ?

३. पौलाच्या हया जिवनचरीत्र अभ्यासातुन तुमच्यासाठी महत्वाचे काय ठरले ?

४. ज्या प्रमाणे तुम्ही जीवन जागता त्यावर हयाचा कोणता परिणाम घडणार ?

दिवस ६

प्रकरण १६ : "पौल रोमला पोहचतो"

पाठ : अध्याय २७ - २८

मुख्यवचन : प्रेषित २७ : २५, " म्हणून गृहस्थांनो, धैर्य धरा ; माझा देवावर भरवंसा आहे की त्याने मला जसे कळविले तसेच घडेल."

विषयवाक्य : पौलाच्या रोम येथील प्रवासात वादळ आणि नौकाभंग सहभागी होते.

जीवनतत्व : जीवनाच्या समुद्रीवादळांत आपला विश्वास प्रकट होतो.

सारांश : पौल ला बादशाही पलटणीच्या यूल्य नावाचा शताधिपतीच्या तारवाने इटली देशास पाठविले.

तो प्रवास पुर्णता त्रासदायक, कठीण होता. तरीही देवाने पौलस बुध्दी व संगती दिली. त्यांनी मुसळधार तुफानाचा सामना केला. तरीही येशुने पौलास दर्शन देऊन खात्री दिली की तो कैसराच्या समक्ष उभा राहील आणि तारवांतील जीव वाचवीली जातील. हया प्रभुच्या शब्दांव्दारे धैर्य प्राप्त झाले आणि सर्व जीव सुरक्षित राखण्यासाठी मनुष्यानां योग्य बुध्दी पुरविण्यात आली. जरी त्यांचे तारुचे नुकसान झाले आणि सर्व साहित्य जे त्यावर होते नाश झाले तरीही ते मिलात बेटावर पोहचले. पौलास विषारी सर्पाच्या दंशाने त्रास झाला तरीही प्राणहानी झालेली नाही. त्याने तेथे बरीच आश्चर्यकर्म घडविली. देवाने पौलाला तेथे ३ महिने राहण्यास मदत पुरविली आणि मग मृत्युलास पोहचला जेथे बंधुजनांव्दारे त्याला उत्साह मिळाला.

पुस्तकाचा शेवट पौलाचे रोम मध्ये वस्ती करणे हया व्दारे होतो. तो आपल्या भाडयाच्या घरात राहुन देवाच्या राज्याची घोषणा करीत होता. रात्रंदिवस रोमन सुरक्षतेच्या कठडयात राहुन देवाच्या राज्याची घोषणा करीत होता. रात्रंदिवस रोमन सुरक्षतेच्या कठडयांत राहुन बाहेर जाण्याची मुभा नसतांना, जगाच्या शेवटापर्यंत गाजविण्यास असमर्थ जसे त्याच्या अंत:करणात होते. तो मर्यादित, बेडया घातलेला, बांधलेला आणि तरीही जसे तो फिलिप्पैकरांस लिहीतो की, त्याचे अंतकरण उचंबळून आहे जरी तो बंधनात आहे पण देवाचे वचन नाही. शास्त्रातील एक

आश्चर्यकारक विलक्षण वचन आपण येथे वाचतो जेव्हा त्याने फिलिपै येथील आपल्या मित्रांना लिहीले, ज्या गोष्टी घडल्या त्यांच्या पासुन सुवार्तेला अडथळा न होता त्या तिच्या वृध्दीला साहणीभूत झाल्या, (फिलिप्पै १ : १२ ब). त्यांनी काहीही मर्यादित राखले नाही. त्यांनी काहीही मर्यादित राखले नाही. त्यांनी काहीही मागे राखले नाही. ही अडखळण आणि वरवर दिसणाऱ्या नैराश्याने गोष्टी थांबून राहील्या नाहीत त्यांनी निव्वळ सुवार्तेला सामोर नेले आणि मग तो त्या मार्गाना स्पष्ट करतो ज्या व्दारे ते घडले.

- एक तर रोमी सैन्य ज्यांत बादशाही पलटणीतिल शिपाई एक एक करुन ख्रिस्ता कडे आणले. प्रिटोरियन सुभेदारांस वचन सांगण्यात आले आणि तुम्हाला ठाऊक आहे ते कसे घडत होते. शासकाच्या आज्ञेत त्यांना आंत आणल्या गेले आणि सहा तासांसाठी पौलाला बेडयांत अडकविले गेले. बंदी प्रेक्षक देव त्या शासकाचा उपयोग करीत होता की, त्याचे सवौत्तम सैनिक पौलाकडे येतील आणि सहा तासांसाठी त्याला बेडयांत अडकवतील ज्यांत ते सहा तासांकरीता ख्रिस्ती सुवार्ता ऐकतील. हयांत काही आश्चर्य नाही जसे पौल पत्रात शेवटी लिहीतो, सर्व पवित्र जन व विशेषकरुन कैसराच्या घरचे तुम्हाला सलाम सांगतात (फिलिप्पै ४ : २२)
- दुसरी गोष्ट म्हणजे, कारण पौलाला अटक झाली. बंधुजन शहरांत सुवार्ताप्रसाराच्या कार्यात गुंतलेली होती, तेव्हा कारण तो बंदिवासात होता म्हणुन संपूर्ण रोमभर सुवार्ता अधिक प्रसारित झाली कारण तो जर मोकळा असता तर ती जास्त प्रसारित झाली नसती.
- पण तेथे तिसरा फायदा होता जो प्रेषित बघु शकले नाही. जे स्वप्न त्याने कधी पाहिले नाही ते होत होते. आपण आता मागे फिरुन पाहु शकतो की, पौल आपल्या जीवन काळात सुवार्ता प्रसार करुन मंडळी स्थापन करण्यामागेच राहीला नाही जसा त्याने विचार केला असावा. परंतु सर्वोत्तम प्राप्त म्हणजे जर तो बंदिवासात नसता तर त्याने पत्र कधीही लिहिली नसती. त्या पत्रांमुळे, ख्रिस्ती जीवनाच्या २०शतकांतुन मंडळीची सेवा झाली नसती आणि पुरविण्यात येऊन बळ प्राप्त झाले नसते.

आपण प्रेषितांच्या पुस्तकातील पुनर्चक्र आणि पौलाचे जीवन आज कोणत्याही आध्यात्मिक कार्यात जे आम्हांस महत्वाचे वाटते ते पाहतो. प्रथम ख्रिस्ताविषयी पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यांने

बोलणे परिणाम कारक असते. (१ करिन्थ २ : ३-५) तरीही इतरांना त्याच्या आंतःकरणात ते बसण्याकरीता आणि निर्णय घेण्याकरीता त्यांना देवाचा शब्द अनेक वेळा ऐकण्याची गरज आहे. दुसरे सैतानाव्दारे अडखळण हे न टाळता येण्याजोगे आहे. हे केवळ प्रार्थनेच्या सामर्थ्यांने आणि आपल्या पदाव्दारेच दुर केले जाऊ शकते. (मार्क ११ : २२-२५). १ करिन्थ १०:३-५ नुसार देवामध्ये आम्हासाठी असलेल्या अभिवचनावर हक्क दाखविलयास देखील ते दुर केले जाऊ शकते. कधीकाळी त्रास दुर केला जात नाही. जसे आपण पौलाच्या जीवनात बघतो, पंरतु तो आम्हास सांगतो की, त्याव्दारे स्थलांतरण न करता आपण कसे विजयी होऊ शकतो. तिसरे, परीक्षा आणि छळाच्या मधात देव आम्हास सांत्वन पुरवितो. (फिलिपै. ३ : ८-११) ख्रिस्ताच्या देहामध्ये आनंद आणि सौख्य आहे. ख्रिस्ताच्या संगती सोबतची तीव्र जाणीव आणि त्याच्या पुरकपणास समाधान असते. अशा प्रकारच्या मृत्युने इतरांसाठी जीवन हे जाणण्याचे समाधान असते. शेवटी देव आम्हाला परीक्षेमध्ये विश्रांती, ताजेतवाने होणे आणि नविणीकरणाच्या दिवसांत देखील आणतो. नव्या जिवनाकरीता तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवणार काय आणि एकमेकांना आपल्या त्रासांत, सांत्वनेत असतांनाही उचलुन धरणार काय ?

प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक विनासमाप्तीचे आहे. ते कधीही पूर्ण झालेले नाही. पवित्र आत्म्याने जाणुन असे केले - ते अजुनही लिहीले जात आहे. प्रेषितांची कृत्ये हा जे येशुने करण्यात व शिकविण्यात आरंभीले त्याचा लेख आहे. काय तो हयाने पुर्ण आहे ? नाही. तो अद्याप कार्य करीत आहे, होय किंवा नाही ? जेव्हा हे महान पुस्तक पूर्ण होईल, आणि गौरवांत जाईल, तेव्हा तुम्हास वाचावयास मिळेल - त्यांत तुमचा सहभाग कोणता असणार ? पवित्र आत्म्याव्दारे सामर्थ्याने जसे इतरांनी आपले कार्य पुर्ण केले तसे देव करो की, आपणही आपले कार्य पूर्ण करु शकु. आपणही आपल्या तरणाऱ्या तर्फे असे ऐकू शकु "शाब्बाश, भल्या व विश्वासू दासा".

जीवनाच्या समुद्रीवादळांत देव आमचा गलबत आहे. तो आपली प्रतिज्ञा राखतो.

याकोब : क्रियेतील विश्वास

लेखक

याकोब हे नव्या करारातील ग्रंथात जुळलेले शेवटचे पुस्तक आहे आणि प्रेषितांमध्ये मंडळी स्थापन केल्यावर जवळ जवळ (गलती १:१९) २५ वर्षानंतर लिहीले गेले आहे. हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की नव्या कराराचे लिहीले गेलेले हे सर्व प्रथम पुस्तक जुना व नव्या करारातील ४०० वर्षाच्या शांत काळाला मोडतो. याकोब जो येशुचा भाऊ होता शक्यतो लेखक आहे, जरी तो आपल्या पुस्तकात परिचयामध्ये स्वतःची ओळख प्रकट करत नाही. देव मनुष्याचा नातेवाईक हया पृथ्वीवरील आपल्या पदाच्या दलाली ऐवजी तो नम्रपणे स्वतःचा परिचय एक देवाचा आणि प्रभू येशू ख्रिस्ताचा सेवक म्हणून देतो. त्याच्या नम्रतेचा काही अंश कदाचित हयापासून येतो की नेहमी विश्वासी नव्हता, जसे योहान ७:५ मध्ये नमूद आहे. पुनरुत्थीत झालेल्या ख्रिस्ताच्या सामन्यामुळे त्याचे अंतःकरण बदलते (१ करिंथ १५:७) आणि प्रेषित १:१४ मध्ये जसे आढळून येते तो विश्वासणाऱ्यांच्या क्रमवारीत येऊन बसतो. नंतर तो हे पत्र यरुशलेमेत प्रारंभिक मंडळीचा पाळक हया नात्याने लिहीतो.

वेळ

असा विश्वास व्यक्त केला जातो की याकोबाने हे पत्र मंडळीच्या प्रारंभिक वर्षामध्ये जेव्हा तो काळ मसिहाद्वारे स्थापीत यहूदीपना हया दृष्टीतून बघीतला गेला, तेव्हा लिहीले. तो डळमळणारा काळा होता. यरुशलेम मंडळी आपल्या राष्ट्राप्रती निष्ठा आणि आपल्या देवाच्या सुटकेतील योजनेत ज्यामध्ये विधर्मी लोकांचे तारण गुंफलेले होते - हयामध्ये अडकली होती. यहूदी देशभक्ती जोर पकडत होती, पौल गर्वाने विधर्मी जगामध्ये शुभवर्तमान पसरवित होता, आणि याकोब ख्रिस्ताच्या त्वरीत दुसऱ्या आगमनाविषयी सांगत होता. यरुशलेमेत धार्मिक पुढाऱ्यांमध्ये हयाचा ताळमेळ बरोबर बसला नाही. त्यांनी आपला सर्वात मोठा धोका म्हणून याकोबावर बंदी आणली. ख्रिस्त पश्चात ६२ मध्ये प्रमुख याजक हनन्या २ (द्वितीय) हयाने एक औपचारिक सेन्हेद्रिद चौकशी घडविली आणि याकोबावर नियम भंग करण्याचा गुन्हा दाखल केला. तो

अन्यायी क्रुर आणि प्राणघातक होता. ख्रिस्ताचा भाऊ विश्वासाची क्रियेमध्ये रखवाली करणारा हुतात्म्याद्वारे जी पित्याची सिद्ध आणि चांगल्या इच्छेनुसार होता सन्मानित करण्यात आली. याकोबाच्या मृत्यूनंतर यहुदी ख्रिस्तीपणा फार बदलून गेला. जेव्हा पौल इकिसकरांना, फिलिप्पैकरांना आणि कलस्सैकरांना पत्र लिहीत होता त्यावेळी निरो रोममध्ये स्वतःच्या राजवाडयाला आग लावत होता. त्याने ख्रिस्ती लोकांचा भयानक छळ सुरु केला त्यांने स्वतःच्या कार्यसिध्दीसाठी त्यांस बळी ठरवित होता. त्याचसमयी यरुशलेमेतील यहुदयांनी रोम विरोधात बंड पुकारला आणि रक्तरंजित युध्दास प्रारंभ झाला जो चार दिर्घ वर्ष चालला. शेवटी रोमने पूर्ण विजय मिळवला. याकोबाच्या मृत्यूनंतरच्या चार वर्षानंतर मंदिराचा नाश झाला आणि यहुदी बंदीवान मारुन टाकण्यात आले. याकोबाचे साहित्य ख्रिस्ताचे स्वर्गारोहन आणि विधर्मी मंडळीची स्थापना हयातील कालावधीचे वर्णन करते. म्हणून याकोबाचे पत्र यहुदी ख्रिस्तीजनांच्या इतिहासातील दुवा समजला जातो.

प्रेक्षक

१:१ पासून याकोब सुचवितो की तो जे कधिकाळी यरुशलेम मंडळीचे भाग होते अशा बारा वंशातील पांगलेल्या लोकांस तो लिहीतो. स्तेफनाच्या मृत्यू नंतर (प्रेषित ८:१४, ११:१९-२०) प्रारंभिक मंडळीच्या विरोधात छळाचा बांध फूटला आणि नवे परिवर्तीत लोक विखूरले. ते आपल्या सोबत सूवार्ता संदेश घेऊन गेले आणि अशा प्रकारे ख्रिस्ताची आज्ञा "जा" पूर्ण केली (प्रेषित १:७-९) हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की याकोबाचे हे पुस्तक यहुदी दृष्टीकोणातून यहुदी लोकांकरीता लिहीले गेले.

घोषवाक्य

काही लोक याकोबाचे पत्र हयाला नवे कराराचे नीतिसुत्र म्हणवितात. हे पत्र धर्मसिध्दांत पसरविण्याकरीता नसून आध्यात्मिक ज्ञान आणि प्रायोगिक चांगुलपण एक समान जाते हे कळविते. याकोबाकरीता हया दोन गोष्टी एका वाक्यात घडून येतात : "म्हणून सर्व मलिनता व उचंबळून आलेला दुष्ट भाव सोडून तूमच्या जिवाचे तारण करावयास समर्थ असे मूळाविलेले वचन सौम्यतेने स्विकारा. वचनाप्रमाणे आचरण करणारे असा केवळ ऐकणारे असू नका. अशाने

तुम्ही स्वतःची फसवणूक करीता'' (याकोब १:२१-२२) ख्रिस्तामध्ये आम्ही कोण आहो हे आमच्या कृतीतून आणि शब्दातून प्रकट होते. विश्वास आणि कार्य एक समान चालतात. हे त्याचे सर्वात महत्वाचे घोषवाक्य आहे : क्रियेतील विश्वास. तो पुढे लिहीतो की आमचा स्वभाव जर विश्वासाच्या बैठकीत बसत नाही तेव्हा आमचा विश्वास खरा असू शकत नाही. दुसऱ्या शब्दात आपल्या क्रिया आपल्या शब्दापेक्षा जास्त उंच स्वराने बोलतात. जसे याकोब २:१७ सांगते, ''विश्वासा बरोबर जर क्रिया नाहीत तर तो जात्या निर्जीव आहे.''

याकोबाच्या पत्रातील दूसरे घोषवाक्य हे परिक्षेत आनंद साजरा करण्याविषयी आहे. खरा विश्वास त्रासातून मिळविलेला असतो आणि शेवटी देव विश्वासयोग्य आढळतो. हया गोष्टी समजण्याकरीता कठीन आहे. परिक्षेच्या आपल्या प्रतिउत्तरास आपण अडखळतो याकोब आपल्या प्रश्नांची उत्तरे सरळ, नम्र आणि मजबूतीने देतो. त्याच्या शब्दांनी अस्वस्थता जानवू शकतो परंतू तेथे थोडीशी जागा गैरसमजाकरीता देखील आहे. वारंवार तो आम्हाला नम्र होण्यास आणि सहन करण्यास सांगतो. याकोब आपल्या दोन्ही घोषवाक्यांना मनुष्याचे पाप आणि सांसारिकतेकडे मोकळे केलेले मार्ग आणि असा मनुष्य जो आपल्या जिवनात नम्रतेने आणि आज्ञाधारकतेने त्रासांना सहन करतो - या दोघांमध्ये तुलना करतो. देव त्याच्यावर आश्रयीतांना आशिर्वाद आणि कृपा पूरवितो. तरीही जो मनुष्य हया पृथ्वीवरील वस्तूंकडे आपला विश्वास टाकतो त्याला केवळ निंदा आणि न्याय हयाचेच फळ मिळेल. उठाठेवीच्या संदर्भात याकोब देवामागे अरुंद मार्गाने जाने केवळ त्याच्या धार्मिकतेकडेच नव्हे परंतु आपल्या हया जीवनात आणि नंतरच्या जिवनात आवश्यक असलेल्या पूर्णतेकडे नेतृत्व करण्याचे सादरीकरण करतो.

याकोब : क्रियेतील विश्वास

प्रकरण १ : अध्याय १

विषयवाक्य : खरा विश्वास आपल्या आज्ञाधारकपणाद्वारे प्रकट आहे.

दिवस - १

वाचा याकोब १:१-८

१. आम्ही परिक्षांना "आनंदच" का मानावा ?

२. वचन ५-८ बघा देवापासून ज्ञान मिळविण्याकरीता आम्हास काय आवश्यक आहे ?

दिवस - २

वाचा याकोब १:९-११

१. दीन स्थितीतील बंधूने आपल्या कोणत्या "उच्चस्थिती विषयी" अभिमान बाळगावा ?

२. धनवान विश्वासणाऱ्यांना कोणते ताकीद आणि उत्साह देण्यात आला आहे ?

३. गलतीकरांस ३:२६-२९ आणि इफिस. १:३-५ ची तुलना याकोबाच्या ह्या भागा सोबत करा.

दिवस - ३

वाचा याकोब १:१२-१८

१. ह्या भागानुसार परिक्षेच्या वाढीचे वर्णन करा.

२. १ करिन्थ १०:१३ नुसार सर्व विश्वासणाऱ्यांकरीता कोणती मदत उपलब्ध आहे.

३. एक विश्वासी जो परिक्षेचा सामना करतो त्या विषयी हा शास्त्रभाग कसे वर्णन करतो ?

४. परिणाम काय आहेत ?

दिवस - ४

वाचा याकोब १:१९-२७

१. आम्हास ऐकावयास तत्पर, बोलावयास धिमा, रागास मंद असे सांगण्यात आले आहे. ते आम्ही कसे करतो ?

२. वचन २५ पासून देवाचे वचन "स्वातंत्र्याचे परिपूर्ण नियम" कसे आहे ?

३. वचन २६-२७ नूसार खोटे आणि खऱ्या धर्माचरणास कोणती गूण वैशिष्टे आहेत ?

दिवस -५

उजळणी

१. याकोब १ मधील कोणती शिकवण तुम्हा करीता धोक्याची सूचना देते ?

२. कोणती शिकवण तुम्हाला उत्साहित करणारी आहे ?

३. देव तुम्हाला जे शिकवत आहे त्या करीता आभार मानण्यास वेळ काढा.

दिवस -६

प्रकरण १ : "परिक्षेतील विश्वास"

पाठ : अध्याय १

मुख्यवचन : "वचनाप्रमाणे आचरण करणारे असा केवळ ऐकणारे असू नका अशाने तुम्ही स्वत:ची फसवणूक करीता."

विषयवाक्य : खरा विश्वास आपल्या खऱ्या आज्ञाधारकतेतून प्रकट होतो.

जिवनतत्व : देवाला ज्ञान मागण्याद्वारे परिक्षेतील वेळेत आनंद निवडा.

सारांश : याकोब १२ वंशातील पांगलेल्या लोकांस सलाम सह सुरुवात करतो आणि यहुदी ख्रिस्ती ज्या अडखळनांचा सामना करतात त्यांची पूणर्रचना करतो. तो परिक्षांमधील आवश्यक विश्वासाचे वर्णन करतो. तो आपल्या छळलेल्या भावांना आणि बहिनींना संकट समयी, त्याच्या कृपेद्वारे देवावर अवलंबून राहण्याकरीता उत्साहित करीतो. परिक्षा आमच्या

विश्वासाला दृढ बनविते. वाढीच्या आणि परीपक्वतेच्या प्रक्रीयेत समस्या आणि दु:ख आवश्यक असतात आणि ते टाळले जाऊ शकत नाही. खरे तर याकोब परिक्षेमध्ये पळून जाण्याच्या मार्गाविषयी प्रार्थना करण्यापेक्षा ज्ञानासाठी प्रार्थना करणे सूचवितो.

हे आम्ही चांगल्या प्रकारे समजतो जेव्हा आम्ही लहान लेकरांना वाढतांना पाहतो. उबडे होणे, रांगणे, चालणे आणि बोलणे देखिल शिकणे वैताग अणणारे आव्हान ठरु शकते. त्यामुळे विनाकारण दु:खणे किंवा इजा होऊ शकते परंतू ते विकासाकरीता आवश्यक आहेत. त्याच प्रमाणे आमच्या जिवनातील परिक्षा तसेच कृपा आणि सामर्थ्य मिळविण्याकरीता हेतू आहे. येशूने आपल्या शिष्यांना हा उत्साह योहान १६:३३ मध्ये दिला आहे, ''जगात तुम्हाला क्लेश होतील तरी धीर धरा मी जगाला जिंकले आहे.'' त्याचप्रमाणे याकोब आम्हाला याकोब १:१२ मध्ये एक प्रतिज्ञा देतो, ''जो माणूस परिक्षेत टिकतो तो धन्य..... जिवनाचा मुकूट..... त्याला मिळेल.''

उदाहरणा दाखल, जे बंधू आणि बहिणी दीन अवस्थेत जगत आहेत त्यांच्या दैनावस्थेविषयी तो चर्चा करतो तो स्तोत्रसंहिता आणि नितिसूत्राच्या लेखकांसोबत मान्य करतो की श्रीमंत गवताच्या फुलासारखा नाश होईल. त्यांचे भाग्य ही निंदाच आहे पण नम्र परिस्थितीद्वारे आनंद आणि समाधान हयातील देवासोबत श्रीमंती अनूभव करणे होय. ते ख्रिस्ताचे आहेत आणि ख्रिस्तामध्ये ''उच्च पदावर'' आहेत. आपल्या महान निर्माणकर्त्या आणि चालविणाऱ्या देवासह सन्मान आणि किंमत प्राप्त आहेत.

ठेका न गमविता याकोब आंतरिक समस्या : परिक्षा हयाकडे पौल वळतो. देव पापाचा विधाता नाही आणि म्हणून पापाने आमची परिक्षा घेणार नाही. प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो आणि पापात पडतो. कोणताही गोंधळ होऊ न देता याकोब आमच्या समोर स्पष्ट भेद ठेवून फसविले न जाण्याकरीता धोक्याची सूचना देतो. देव आमच्याकरीता जे चांगले व सिध्द तेच पूरवितो तरीही पापाद्वारे मृत्यूच पूर्वील्या जाते हा विरोधाभास आहे की अनेक ख्रिस्ती देवाला परिक्षेचा स्त्रोत समजतात परंतू विजयाचा स्त्रोत म्हणून आलींगन घालत नाहीत. तरीही याकोब हया अध्यायात परिक्षेवरील विजयाबद्दल चर्चा करीत नाही, संपूर्ण शास्त्र स्पष्टपणे शिकवते की पाप आणि परिक्षेवर देवच विजयाचे वरदान पूरवितो. तोच एकमात्र आम्हाला नितिमत्त्व आणि

पवित्रिकरण पूरवीतो. आपल्या शक्तींनी कोणते स्वार्थी हेतू तुम्ही नियंत्रण राखण्याचा प्रयत्न करता आणि विजयाचे वरदान गमाविता ? आपण दु:ख किंवा परिक्षेचा सामना कदाचित करीत असू परंतू नैतिक जवाब आज्ञाधारकामध्येच आहे. आम्ही ऐकण्यास तत्पर असावे आणि देवाच्या शब्दाच्या सत्यास समर्पित असावे. वचन २२ चांगल्याप्रकारे समापण करते आणि आम्हाला पत्राच्या आठवणीचा परिचय करुन देते. ''वचनाप्रमाणे आचरण करणारे असा केवळ ऐकणारे असू नका..... स्वत:ची फसवणूक करतात.'' जर आमचा विश्वास खरा आहे तेव्हा आम्ही देवाचे वचन ''उत्कृष्टपणे ऐकणारे'' आणि स्वतृप्ततेने फसविलेले नाही किंवा जगा सोबत कलंकित नाहीत असे ठरु. आम्ही देवाच्या शब्दाला आपल्या अंत:करणात खोलवर उतरवू देवू जेणेकरुन त्याने आम्ही आंतुन बाहेर परावर्तीत व्हावे. शेवटी देवाचे वचन तुम्हास कसे बदलत आले आहे ? काय तुम्ही आपले दु:ख आनंदाने सहन करत आहात काय तुम्ही आपल्या परिक्षा देवाला सोपवित आहात ?

देवाला ज्ञान मागण्याद्वारे परिक्षेतील वेळेत आनंद निवडा.

याकोब : क्रियेतील विश्वास

प्रकरण पहिले : अध्याय २

विषय वाक्य : खरा विश्वास चांगल्या क्रियांच्या फळाने प्रकट होतो.

दिवस -१

वाचा याकोब २:१-७

१. आम्ही कोणामध्ये विश्वास ठेवतो ?

२. अध्याय २ चे पहिले वचन तुमच्यासाठी कसे महत्त्वाचे आहे ?

३. काय तुम्ही कधी याकोबाने वर्णन केल्याप्रमाणे भेदभाव अनुभवला किंवा पाहिला आहे ?

४. विशेष आशिर्वादांना प्राप्त करण्याकरीता देवाने कोणत्या लोकांना वारस म्हणून निवडले आहे ?

दिवस -२

१. पुढील वचनानुसार भेदभाव का टाळण्यात यावा ?

अ. मत्तय २०:२५-२८

ब. मार्क १२:४१-४४

क. लुक १४:१२-१४

दिवस -३

वाचा याकोब २:८-१३

१. मानवी संबंधाकरीता नियमांचा संबंध एका वाक्यात तुम्ही कसा सांगणार ?

२. पुढील भागातून कोणती पाप आम्हास दोषी ठरवितात ?

अ) निर्गम २०:१७

ब) मत्तय ५:२१-२२

क) मत्तय ७:१-४

दिवस -४

वाचा याकोब २:१४-१९

१. योहान २०:३१ नुसार आपल्या विश्वासाचा विषय कोण आहे ?

२. याकोबानुसार खरा विश्वास कसा दिसून पडतो ?

दिवस -५

वाचा याकोब २:२०-२६

१. उत्पत्ती १५:१-६ नुसार अब्राहाम नितिमान का ठरविण्यात आला ?

२. उत्पत्ती २२:१-१८ आणि इब्रि ११:१७-१९ नुसार, अब्राहामाने देवाकडून काय अपेक्षा केली ?

३. अब्राहामाच्या कृतीने विश्वास कसा प्रकट केला ?

दिवस -६

प्रकरण २ : "क्रियेतील विश्वास"

पाठ : अध्याय २

मुख्यवचन : २:१४, "विश्वासाबरोबर जर क्रिया नाहीत तर तो जात्या निर्जीव आहे."

विषयवाक्य : आपला विश्वास चांगल्या क्रियांच्या फळाने प्रकट होतो.

जिवनतत्व : विश्वासावाचून त्याला प्रसन्न करणे अशक्य आहे.

सारांश : विश्वासाच्या परिक्षेचे वर्णन केल्यानंतर आणि विजयाचा मार्ग निश्चित केल्यानंतर याकोब खऱ्या विश्वासाचे वैशिष्टये सांगतो. अध्याय २ मध्ये याकोब चर्चा करतो की विश्वास प्रितीतून आणि इतरांबद्दल आपल्या वागणूकीतून प्रकट होतो. उदाहरणासह तो धनी आणि दरिद्री जनांच्या तुलनेने आपले विचार मांडतो की बाहेरील स्वरुप पाहून प्रतिष्ठा आणि पद हयावरुन आपण न्यायीपणाच्या स्वभावातून सुटावे. अंदाजाच्या स्वरुपात बोलण्याऐवजी तो थेट आणि अंत:करणास आव्हान देणारे वचन १ मध्ये सांगतो, "गौरवशाली प्रभू म्हणजे आपला

प्रभु येशू ख्रिस्त हयाच्यावर विश्वास ठेवणारे तुम्ही तोंड पाहून वागू नका'' त्याचे शब्द थेट आहेत आणि श्रोत्यांना त्यांना आळेपिळे देण्याकरीता काहीही जागा नाही. त्यांचा दोष त्यांच्या खांदयावर मांडीत तो म्हणतो, पृथ्वीवरील नफ्याचा पक्ष मिळविण्याच्या हेतूने ''तुम्ही दरिद्रयाचा अपमान केला आहे.'' शास्त्र स्पष्ट सांगते की परमेश्वर दीनांना आपली कृपा पुरवितो, तरीही गर्विष्ठांचा त्याला वीट आहे. तो अशक्तांना बळ देतो आणि दु:खीतांना सांत्वना.

मत्तय ५ सांगते की जे आत्म्याने दीन ते धन्य, दुसरे करिन्थ १२:९ सांगते अशक्तपनातच शक्तीपूर्णतेस येते. देवाची अर्थव्यवस्था मनुष्याची योग्यता किंवा साधनांवर अवलंबून नाही. त्याऐवजी जशी स्वत:वर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रिती करीत शाही व्यवस्थेस आपण पूर्ण करण्याकरीता आहोत. काय देवाची आपण कोणती व्यवस्था पालन करावी हे निवडू शकतो ? जर आपण एकीचे पालन करण्यास अपयशी झालो तर आपण सर्वांबद्दल आज्ञा मोडल्याचे दोषी ठरतो. त्याच प्रमाणे आपण कोणत्या शेजाऱ्यांवर प्रिती करावी हे निवडू शकत नाही. कारण व्यवस्था आम्हास सर्वांवर प्रिती करण्यास आज्ञा करते. बंधूप्रिती बद्दल येशू आमचे उदाहरण आहे. त्याने स्वर्गातील आपले वैभव बाजूला ठेवून आपल्या निर्मितीवर त्यागपूर्ण प्रिती केली आहे. मत्तय २०:२५ मध्ये जसे तो म्हणतो "परराष्ट्रीयांवर त्यांचे अधिपती प्रभूत्व चालवितात व मोठे लोकही अधिकार करतात हे तुम्हास ठाऊक आहे. तसे तुम्हामध्ये नाही तर जो कोणी तुम्हामध्ये श्रेष्ठ होवू पाहतो तो तुमचा सेवक होईल आणी जो कोणी तुम्हामध्ये पहीला होवू पाहतो तो तुमचा दास होईल हया प्रमाने मनूष्याचा पुत्र सेवा करुन घ्यावयास नाही तर सेवा करावयास व पुष्कळांच्या खंडणीसाठी आपला प्राण अर्पण करण्यास आला आहे." देवाची दया आणि कृपेद्वारे जे स्वातंत्र्य आम्हाला मिळाले हया करीता आम्ही देखील इतरांना ते देण्यास सांगण्यात आलो आहे. त्याची कृपा आम्हास दयाळू बनविते. काय भेदभावामूळे तुम्ही लोकांना टाळता ? ख्रिस्ताने तुम्हावर दाखविलेले प्रेम आणि दया तुम्ही त्यांना कसे दाखविणार ?

आपला लय न गमविता याकोब पुन्हा क्रियेतील विश्वास हया घोषवाक्याकडे वळतो. ऐतिहासीक दृष्टीने, याकोब अध्याय २:१४-२६, रोम अध्याय ४ च्या विरोधात खिंड पाडते, परंतु ते दोघेही एकाच नाण्याच्या दोन बाजूंसमान कार्य करतात. जेव्हा पौल देवासमक्ष आपल्या न्यायीपणावर

जोर देतो तेव्हा याकोब मनूष्यांसमक्ष न्यायीपणावर जोर देतो. आपल्या अंत:करणाची अवस्था आपल्या व्यवहारातून प्रगट होते. ख्रिस्तावरील आपले अवलंबून राहण्यातील फळ दिसून पडावे. येशूने आपल्या शिष्यांना म्हटले की फळ आनण्याकरीता त्यांनी त्यामध्ये असावे. याकोब अध्याय १७ मध्ये म्हणतो, ''विश्वासा बरोबर जर क्रिया नाहीत तर जात्या निर्जीव आहे.''

अब्राहाम एका उदाहरणासमान देण्यात आला आहे ज्याचा ''विश्वास क्रियासहीत कार्य करीत होता आणि क्रियांनी विश्वासपूर्ण झाला.'' इब्राहामाने देवावर विश्वास केला. त्याची देव कोण आहे हयाबद्दल मर्यादित, मानवी समज होती, तरीसुध्दा त्याने स्वत:ला देवाच्या हातात विश्वासाद्वारे, त्याच्या चांगूलपणावर भरवसा ठेवीत, प्रिती आणि विश्वासयोग्यतेसह समर्पित केले. आम्ही जाणतो अब्राहामाने देवावर विश्वास केला कारण तो आपला देश सोडून विनायोजनेने देवाच्या मागे चालण्यास तयार होता. आम्ही जाणतो अब्राहामाने देवावर विश्वास केला कारण तो आपला प्रतिज्ञा पूत्र अर्पण करण्यास तयार होता आणि तरीही देवाचे चांगूलपण त्याने प्राप्त केले. विश्वासाने त्याने देवाची आज्ञा पाळली आणि त्याच्या क्रियेद्वारे त्याचा खरा विश्वास प्रमाणित झाला. राहाब हे विश्वास प्रमाणित करण्याचे दूसरे उदाहरण होय. जे स्वत:मध्ये परिवर्तन प्राप्त करते यरीहोच्या वेश्येने इस्त्राएलाच्या जासूदांचा जिव वाचविण्याकरीता स्वत:ला जोखीम मध्ये टाकले कारण तिने त्यांच्या देवावर एक मात्र परमेश्वर असा विश्वास राखला. तिने आपला विश्वास आपल्या क्रियांनी प्रकट केला. जर आमच्या क्रिया खऱ्या विश्वासाला प्रगट करत नाही तेव्हा याकोब म्हणतो की आपला विश्वास निर्जीव आहे. संदेशात जसे लिहीलेले आहे, ''ज्याक्षणी प्राण आणि देह विभक्त होतात, तेव्हा तुमचा शेवट शव असा होतो. विश्वास आणि क्रियांना वेगळे करा आणि तुम्हास मिळेल ते म्हणजे शव (मृत शरीर).''

तुमच्या विश्वासाचे प्रमाण कोणते ? इतरलोक कसे ओळखतात की तुम्ही कसे ख्रिस्ताचे अनुयायी आहात ?

विश्वासावाचून देवाला प्रसन्न करने अशक्य आहे.

याकोब : क्रियेतील विश्वास

प्रकरण पहिले : अध्याय ३

विषय वाक्य : खरा विश्वास देवाच्या ज्ञानातून प्रकट होतो.

दिवस १

वाचा याकोब ३:१

१. १ करिंथ १२:२८ नुसार कोणी एक शिक्षक कसे बनतो ?

२. रोम १२:७ नुसार शिकवणे हे आत्म्याचे दान आहे. याकोब असे का म्हणतो शिक्षकांचा न्याय अधीक कठोरपणे होईल ? (बघा लूक १२: ४७-४८)

दिवस २

वाचा याकोब ३:२-८

१. याकोब जिभेतील सामर्थ्याचे वर्णन करण्याकरीता वेगवेगळे उदाहरण देतो. तुमच्या शब्दात त्याचा अर्थ काय ?

२. जिभ एका मनुष्याचे काय करु शकते (६) ?

३. जिभेवरील आपल्या नियंत्रनाबद्दल याकोब काय म्हणतो ?

दिवस ३

वाचा याकोब ३:९-१२

१. रोम ७:१८-२५ मध्ये पौलानुसार जिभेवर नियंत्रण राखणे कठीन का आहे ?

२. याकोब ३:९-१२ मध्ये दिलेल्या उदाहरणाद्वारे जिभेचा विरुध्द स्वभाव वर्णन करा.

३. जिभेला प्रकट करण्यातील स्त्रोत विषयी मार्क ७:२०-२२ काय सांगते ?

४. योहान १७:१७ आणि इब्री ९:१४ नुसार जिभेचा स्त्रोत कसा शुध्द राखल्या जावू शकतो ?

दिवस ४

वाचा याकोब ३:१३-१८

१. खोटे ज्ञान कसे दिसते ?

२. तिचे परिणाम कोणते ?

३. खरे ज्ञान कसे दिसते ?

४. तिचे परिणाम कोणते ?

दिवस ५

उजळणी

१. खऱ्या ज्ञानाविषयी याकोबाचे वर्णन, इतर जे तुम्हामध्ये पाहतात ते आहे काय ?

२. अध्याय १ मध्ये याकोब आम्हाला म्हणतो, ''जर तुम्हा पैकी कोणी ज्ञानाने उना असेल तर त्याने ते देवाजवळ मागावे ते त्याला मिळेल कारण तो कोणास दोष न लावता सर्वांस उदारपणे देणग्या देतो.'' प्रार्थनेसाठी थोडा क्षण काढा आणि संशयरहित विश्वास देवाला मागा.

दिवस ६

प्रकरण ३ : "विश्वास आणि जिभ"

पाठ : अध्याय ३

मुख्यवचन : ३:६ ''जिभ ही आग आहे ती अनितिचे भूवन आहे.....''

विषय वाक्य : विश्वास देवाच्या ज्ञानातून प्रगट होतो.

जिवनतत्व : देवाला समर्पित जिभ आशिर्वादांच्या बि ला पेरनी करते.

सारांश : शब्दांवरुन क्रियेवर भर देण्याच्या बदलावर याकोब आता सांगतो की खरा विश्वास जिभेस नियंत्रित करतो. प्रभाव टाकणारे व निर्देश देणारे हयांकडे तो विशेष लक्ष पूरवितो. आम्ही जरी पुष्कळदा अडळखळतो परंतू शिक्षकाचा न्याय त्यांच्या शिक्षणाच्या परिणामाच्या प्रभावामुळे जे सत्यातिल उत्साहाऐवजी ढोंग आणि खोटी शिक्षा आहे. एका दुष्ट

शब्दाची ठिनगी विश्वासनाऱ्यांच्या संपूर्ण समूदायाला नाश करु शकते. आपल्या मुखात शांतीरहित आणि प्राणघातक विष भरलेले आहे. नितिसूत्रानूसार मृदू उत्तराने कोपाचे निवारण होते व कठोर शब्दाने क्रोध उत्तेजित होतो, जिभेच्या हाती मृत्यू व जिवन ही आहेत. (नितिसुत्र १५:१ आणि १८:२१) खरोखर जिभेमध्ये विरोधी स्वभाव आहे. याकोब हया चित्र स्वभावाला मालिकेत सांगतो. तो म्हणतो जिभ आग आहे, कहयांत न राखता येणारे पशू आहे, ती ताजे आणि / किंवा खारे पाण्याचा झरा आहे आणि ती अंजीराचे झाड आणि दाक्षवेल आहे.

वचन ५-६ पाहता नरकाच्या आगीसमान तिचा उपयोग होऊ शकतो हयास्तव याकोब स्विकार करतो की तिला लगाम घातले जावू शकत नाही. ती अनियंत्रीत पशूसमान आहे. तरीही पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यांने तीच्यावर नियंत्रण घालता येईल.

जर आपण प्रेषित ३-४ बघू तेव्हा आत्म्याच्या भरपूरीने विश्वासनाऱ्यांच्या जिभा शुध्द केल्या गेल्या. जीभ आपल्या प्राणाची खिडकी आहे. जे काही आम्हामध्ये वस्ते ते सर्वकाही ती प्रगट करते, जे काही आध्यात्मीक तसे दैहिक आहे. जी जीभ स्वार्थी महत्वाकांक्षेने आणि ईर्षेने भरलेली असते ती देहाद्वारे नियंत्रीत असून नाय करण्याकरीता वैऱ्याचे साधन असते. परंतू ज्यांनी आपली स्वार्थी महत्त्वकांक्षा आणि ईर्षा पवित्र आत्म्यास सोपविली त्यांचे अंतकरण स्वच्छ पाण्याने आणि जी ''मुळांत शुध्द, शांतीप्रिय, सौम्य, समजून घेण्याजोगे, दया व सत्फले हयांनी पूर्ण, अपक्षपाती, निर्दंभ आहे'' - असते. खरे ज्ञान जे परमेश्वर देतो जेव्हा आपण त्याला विश्वासाने मागतो ते म्हणजे आपल्या जिभेला अंतकरणातील वाईट विचार वाटण्यापासून राखून ठेवणे होय.

विश्वासाचे जिवन जगणाऱ्या शिक्षकास अशी जिभ लाभते जी देवाची आज्ञा आणि अंतकरणापासून ज्ञान प्रगट करते. देवाला प्रार्थना करा की त्याने तुम्हाला नितिमत्त्वाचे आणि शांतीचे बी पसरविण्याकरीता ज्ञानी अंत:करण आणि जिभ दयावी. काय तुमची जिभ आणि तुमच्यातील प्रभाव पवित्र आत्म्याला समर्पित आहे ? तुमचे शब्द उत्साह वाढवितात की निराश करितात ? काय ते कडूपनाचे आहेत की गोड ? "हे परमेश्वरा, माझ्या दुर्गा माझ्या उध्दारका, माझ्या तोंडचे शब्द व माझ्या मनचे विचार तुला मान्य असोत." (स्तोत्र १९:१४)

देवाला समर्पित जिभ आशिर्वादाच्या बी ला पेरनी करते.

याकोब : क्रियेतील विश्वास

प्रकरण १ : अध्याय ४

विषय वाक्य : खरा विश्वास देवाला नम्रपणे समर्पित होण्यास प्रकट होतो.

दिवस १

वाचा याकोब ४:१-५

१. ख्रिस्तीजनांमध्ये भांडण कशातून उत्पन्न होते ?

२. उत्तरा शिवाय प्रार्थनेतील कारणे कोणती ?

३. याकोब म्हणतो "जगाची मैत्री देवाबरोबर वैर आहे" (४:४) खालील वचने काय म्हणतात.

अ. इफि. २:१-५

ब. फिलीप्पै. ३: १८-१९

क. १ योहान २:१५-१६

ड. मत्तय ६:१९-२१

४. आपण देवाबरोबर आणि हया जगाबरोबर एकाच वेळी प्रिती का राखू शकत नाही ? याकोबाचे वाक्य हयास "जो आत्मा आपल्या ठायी वस्ती करितो त्याला आपल्या विषयी ईर्ष्या वाटते " हयातून कसे स्पष्ट करतो ?

दिवस २

वाचा याकोब ४:६-१०

१. गर्व विषयी सविस्तर वर्णनांस, वाचा यशया १४:१३-१४. देव अशा लोकांना कृपा का पुरवित नाही, पुरविणार नाही ?

२. मत्तय ११:२५ मध्ये येशू जे बालकासमान नम्र अशांविषयी काय म्हणतो ?

३. गर्वावरिल याकोबाचा उपाय कोणता ?

दिवस ३

याकोब ४:७-१२

१. वाचा रोम १२:१-२ आणि १४:१५,२३ आम्ही देवाला कसे समर्पित होतो ?

२. मत्तय ४:१-११ नुसार आपण सैतानाचा कसा सामना करतो ?

३. याकोबातील आपल्या हया भागातून, आम्ही कोणाचाही न्याय का करु नये ?

दिवस ४

वाचा याकोब ४:१३-१७

१. फुशारकी मारणे हयाचे याकोब कसे वर्णन करतो ?

२. १ करिंथ १:२६-३१ मध्ये पौल जगिक फुशारकी बद्दल काय सांगतो ?

३. कोणत्या प्रकारचा गर्व त्याच्यानुसार योग्य आहे ?

दिवस ५

१. हया आठवडयांत तुम्ही जे काही वाचले त्यावर आधारीत, जगाच्या कोणत्या वागणुकी किंवा विचार तुम्ही बाळगता आणि तुमच्या जीवनातून काढून टाकण्याची गरज आहे ?

दिवस ६

प्रकरण ४ : "विश्वास आणि जगिकपणा"

पाठ	**:**	अध्याय ४
मुख्यवचन	**:**	४:८, "देवाजवळ या म्हणजे तो तुम्हाजवळ येईल"
विषय वाक्य	**:**	विश्वास नम्रतेने देवाला समर्पित होण्यातून प्रकट होतो.
जीवनतत्व	**:**	आम्ही देवासह घनिष्टतेकरीता रचले गेले आहोत.

सारांश : अध्याय ४ मध्ये याकोब अशा पापाचे वर्णन करतो जे आम्हामध्ये आंत व बाहेर जोर धरते, ज्यामुळे देवास वाईट वाटून त्यापासून आपण विभक्त होतो. जगीकपणाची आम्हावर तिव्र ओढ असते. जेव्हा आपण तिच्या आकर्षकपणाला ओढले जातो तेव्हा आपण नाशाच्या परिणामास प्राप्त करतो. तेव्हा आपण वैरभाव राखनारे, भांडखोर, कामुक आणि हत्यारे

देखील..... बनतो आणि हे सर्व पोकळ व तात्पुरत्या लाभाकरीता. आमच्या अतृप्त इच्छांमधून केवळ आमचा नाशच नव्हे परंतु आपली साक्ष वाईट करुन, ख्रिस्ताचे देह बिघडविल आणि हे सर्व आम्हांस देवाचे वैरी बनवितील. जगिक मोहामागे धावणे हे देवाच्या मागे धावण्याच्या विरोधात आहे. जसे याकोब धाडसाने घोषित करतो की, ''अहो अविश्वासू लोकांनो, जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हास ठाऊक नाही काय?''

काय आपणास ठाऊक नाही की आपण ईर्ष्यावान देवाचे आहोत जो आमच्या सर्व गरजा पूर्ण करु शकतो ? हया धोक्याच्या खोटेपणाला की जग आम्हाला तृप्त करु शकते, विश्वास करु नये. याकोब अशा अस्तित्वाला ''द्विबुद्धीचे'' म्हणतो. तो यशया ५४:७ चा वापर करतो. ''केवळ क्षणभर मी तुला सोडीले,तरी मोठया कऋणेने मी तुला जवळ करिन". लोभाचे मूळ पाप होय. देवाने जे दिले आहे त्यापेक्षा जास्त असण्याची इच्छा म्हणजे लोभ आणि ते मिळविण्याकरीता भांडणे, जनुकाही त्यास आपण पात्र आहोत हे निव्वळ गर्विष्ठपणाच नाही तर मूर्तिपुजा होय.

याकोबाचा उपाय म्हणजे पश्चातापासह आणि नम्र अंत:करणाने देवाला समर्पित होणे आहे. तो देवाला अधीन व्हा, सैतानाला अडवा आणि देवाजवळ या असे सांगतो. तो आमच्या डोक्यांवरुन सांसारीक पडदा दूर करील आणि त्याचे सत्य पाहण्यास मदत पुरविल. तो आम्हास पश्चातापासाठी कृपा पुरविल. वचन ८-९ आम्हास ईश्वरीय पश्चात्तापाविषयी सांगते. ''हात निर्मळ करा, अहो द्विबुद्धी लोकांनो आपली अंत:करणे शुद्ध करा.'' हि शुद्धता आपल्या पापांना कबुल करण्यापेक्षा जास्त आहे आणि देवाला क्षमा मागण्यापेक्षाही जास्त आहे. त्यामध्ये देव जो आत्मासह सहभागीता आहे तो विषारी मुळांना उघड करतो, जे आमच्या पापाचे मुळ असते हयासाठी की आम्ही शुद्धिकरण मिळवावे. केवळ पवित्र आत्मा प्रगट करु शकतो हया सर्व सुक्ष्म गोष्टी ज्या आकर्षणामुळे आमच्या अंत:करणात बसल्या आहेत. एक शुध्द अंत:करण केवळ एकाच गोष्टीची आशा बाळगते. ''कष्टी व्हा, शोक करा, रडा तुमच्या हसण्याचा शोक होवो व तुमच्या आनंदाचा विषाद होवो, प्रभू समोर नम्र व्हा म्हणजे तो तुम्हास उच्च करील.'' देवाची पापाची खात्री प्रभावी दोष पूरविते. ती पापाविषयी योग्य दृष्टी ज्यामुळे दु:ख उद्भवते तरी सुध्दा

देवाच्या हया खात्रीत लज्जा नाही. जेव्हा आम्ही पश्चाताप करतो तेव्हा तो आरोग्य देतो आणि आपल्या आशेला आणि भरवशाला पुन्हा स्थापित करीतो.

पित्यासह घनीष्टते करीता आम्ही रचीले गेले आहो. सृष्टीतील जुळवाजुळव कितीही प्रकट असो परंतु आमचा उद्देश हयांसोबत तीची तुलना होवू शकत नाही. आमच्या निवडीचा देवपित्यासह घनिष्टतेवर परीणाम येतो आणि नम्रता हीच एक मात्र निवड आपण करु शकतो. याकोब १ : ५ सांगते, ''जर तुम्हा पैकी कोणी ज्ञानाने उणा असेल तर त्याने ते देवाजवळ मागावे म्हणजे ते त्याला मिळेल कारण तो कोणास दोष न लावता सर्वांस उदारपणे देणग्या देतो.'' देवाचे ज्ञान जे स्विकारोक्ती आणि नम्र अंतकरण उत्पन्न करते त्या विषयी प्रार्थना करा.

आम्ही देवासह घनिष्ठते करीता रचीले गेले आहोत.

याकोब : क्रियेतील विश्वास

प्रकरण १ : अध्याय ५

विषय वाक्य : आशावान असणे आणि धैर्य बाळगणे ह्यातुन आपला विश्वास प्रगट होतो.

दिवस १

वाचा याकोब ५ : १-६

१. याकोबा नुसार अशांसोबत काय होणार ज्यांनी आपली प्राथमिकता धन मिळविण्याकरीता दिली आहे?

२. जे श्रीमंत आहेत आणि पुढील वचनानुसार स्वार्थी आहेत अशांविषयी देवाची वागणूक कशी आहे?

अ. अनुवाद २४:१४-१५

ब. लुक १२ : १५-२१

३. ख्रिस्तीजनांकरीता, २ करिंथ ९ : ६-१४ नुसार पैसे बाळगण्यातील "आशिर्वाद" कोणता ?

दिवस २

वाचा याकोब ५ : ७-११

१. धैर्याकरीता शेतकरी का म्हणुन चांगले उदाहरण आहे ?

२. प्रभुच्या आगमनाची वाट पाहतांना याकोब आम्हास धैर्य बाळगण्यास का सांगत आहे ?

३. या शास्त्र भागानुसार कोण धन्य आहे ?

४. धैर्या करीता मत्तय ५:१२ मध्ये संदेष्टे उत्तम उदाहरण का आहे ?

दिवस ३

वाचा ईयोब १ - २ : १०, ४२

१. ईयोब धैर्यवान होता, परंतु ते त्याला परमेश्वरास प्रश्न विचारल्या वाचुन राखु शकले नाही. ईयोब ४२: १- ६ मधील ईयोबाचा शेवटचा अंगीकार वाचा.

२. धैर्या करीता ईयोबाचा कोणता प्रतिसाद प्रकट आहे ?

दिवस ४

वाचा याकोब ५ : १२

१. शपथ वाहण्याविषयीच्या विरोधात याकोब कोणत्या कारणांची ताकीद देतो ?

२. पुढील शास्त्र भागात मुर्खपणातील शपथ वाहण्याचे कोणते परीणाम दिले आहे ?

अ. शास्त्रे ३०-३५

ब. यहोशवा ९: ३-२१

क. मत्तय १४: ६-९

३. मत्तय ५ : ३४-३७ मध्ये येशू शपथ वाहण्या विरोधात कोणती सुचना देतो ?

दिवस ४

वाचा याकोब ५: १३-१८

१. २ करिन्थ १२ : ७-१० आम्हास याकोब ५:१५ समजण्यास कशी मदत पुरवितो ?

२. याकोब ५ : १९-२० नुसार कोणी विश्वासी आजारी असल्यास आणि प्रार्थनेची गरज असल्यास, आम्ही काय करावे ?

३. या वचनांनुसार एकमेकांबद्दल आमची जवाबदारी कोणती ?

दिवस ५

उजळणी

याकोब म्हणतो की, येशुमधील आमचा विश्वास आमच्या दैनंदिन जिवनातुन प्रकट व्हावा. जेव्हा आम्ही विश्वासात देवाच्या आज्ञेचे पालन करतो तेव्हा काहीतरी घडते. आम्ही सभोवतालच्या

लोकांकरीता साक्षीदार ठरतो. हीच २ करिन्थ ३:३ वचन मध्ये पौल म्हणतो की, ''ख्रिस्ताचे पत्र असे तुम्ही प्रसिध्द आहा.'' तुमच्या जिवनात विश्वासाचे कोणते प्रमाण आहे ?

दिवस ६

प्रकरण ५ : "विश्वास आणि सराव "

पाठ	: अध्याय ५
मुख्यवचन	: ५ : ८, ''तुम्ही ही धिर धरा आपली अंतकरणे स्थिर करा. कारण प्रभुच्या आगमणाची वेळ आली आहे. ''
विषय वाक्य	: आशावान असणे आणि धैर्य बाळगणे हयातुन आपला विश्वास प्रगट होतो.
जिवनतत्व	: विश्वासाने केलेल्या प्रार्थनेचे परमेश्वर उत्तर देतो.

सारांश : अध्याय ५ मध्ये याकोब संपुर्ण पत्रातील फरक आपसात विणतो आणी दोन वेगवेगळया विषयांच्या परीणामाचा शेवट दाखवितो. अध्याय ५ मधील पहिली सहा वचने याकोब समापण करतो की, एक मनुष्य मुर्खतेने सपंत्ती चा साठा करीतो दारिद्रयावर अत्याचार करीतो आणि लहरी सुखात उडवितो त्याचा न्याय होईल. ''अहो धनवानांनो जे क्लेश तुम्हाला होणार आहे त्या विषयी रडुन आकांत करा.'' (याकोब ५ : १) जो या पृथ्वीवर गैरप्रकाराने, मनोरंजना करीतो आणि वाईट माध्यमातुन साठा जमविल त्याचे धन नासले जाईल व वस्त्रांना कसर लागेल व सोनेरुपावर जंग चढेल.

''हयास्तव", त्रासातील तो आपल्या बंधुना म्हणतो, "धीर धरा..... कारण प्रभुच्या आगमनाची वेळ आली आहे.'' तो चांगले फळ आणील. याकोब ईयोबाच्या गोष्टीतुन उत्साहीत करतो. त्याने कठीन दु:ख, त्रास सहन केला तरीही तो नितिमान होता. आणि त्याच्या चिकाटीमुळे देवाने त्याच्यावर आपली दया करुणा प्रकट केली. याकोब ह्याला ''दुसरा पावसा समान '' म्हणतो. प्रभु ज्या हंगामाचे फळ आणेल त्या अपेक्षेने आपण धिरामध्ये वाढुया.

याकोब प्रार्थना, आरोग्य आणि पाप अंगिकार विषयी प्रायोगीक शब्दांविषयी समापण करतो. सर्व गोष्टीं बाबतीत देवाचे स्मरण करावे एकमेकांसोबत जुळावे जेव्हा आपण त्याचा धावा करतो. आनंदासमयी एकत्र मिळवून स्तुती स्तोत्रे गावी. जेव्हा आजारी किंवा त्रासात आहो तेव्हा एकमेकांसाठी प्रार्थना करावी एकमेकांना आपली पातके कबुल करावी हयासाठी की, त्यांना क्षमा होईल, आणि देव पुन्हाः स्थापीत करील ज्याप्रमाणे देवाने आपला संदेष्टा एलिया हयाच्या प्रार्थनेचा सन्मान केला, तो आमची देखील प्रार्थना ऐकतो हे जाणुन की देव चांगल्या गोष्टींचा परमेश्वर आहे.

विश्वासाने प्रार्थना करुया.

समापण

याकोबाचे पुस्तक आध्यात्मिक वैदयकीय तपासनी समान आहे. विश्वासातील पुराव्यांना जे तो लिहीतो बघुया आणि आमची कृती व वागणुक हयांमधुन आपला विश्वास समजुया.

१. दुःख व परिक्षांना तुमचे प्रतिउत्तर काय आहे ? काय तुम्ही नम्रतेने आणि देवाच्या इच्छेला स्वाधिन असा जवाब देता?

२. वचन आणि कृत्य हया करीता काय देवाचे शब्द तुमचे मापक आहे ?

३. जे भिन्न सामाजीक वर्गात लोक आहेत अशांना तुमचे प्रतिउत्तर कसे आहे ? काय तुम्ही भेदभाव बाळगता ?

४. खऱ्या देवाच्या ज्ञानाने उत्पन्न होणारी नम्रता तुम्ही दर्शविता काय की जगीक ज्ञान आणि स्वार्थी वागणुकीतुन प्रगट होणारी ? काय जग तुमचे मित्र आहे ?

५. तुमच्या अंतःकरणाविषयी तुमची वाचा काय प्रकट करते ? काय तुमच्या संपत्तीचा दुखाःतील धैर्याचा दृष्टीकोण आणि तुमचे प्रार्थना जिवन सार्वकालीकते मध्ये क्रेंद्रित असुन आशावान आहे ?

विश्वासात अर्पीलेली प्रार्थना देव ऐकतो